# श्रीउपासनी महाराज

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. 9309



-चरित्रमाला

REFBK-0010964
REFBK-0010964

ॐ
शांतिः शांतिः
शांतिः

[illegible] [illegible]
[illegible] [illegible]

# श्रीउपासनी महाराज

## [साकोरी]

संतचरित्र माला : १५

अनुक्रम २६७०४
विभाग चरित्र
क्रमांक ८७७
नों. दि. १८/१२/६०.

के. ल. पुराणिक,
बी. ए.

ग्रं. क्र. १०९६४

मूल्य सव्वा रुपया

REFBK-0010964
REFBK-0010964

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २

श्री : २७८

●

संतचरित्र माला : १५

●

© १९६०
वोरा अ‍ॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई २

●

आवृत्ति पहिली
शके १८८२
सन १९६०

●

मूल्य रु. १–२५

●

पृष्ठसंख्या ८८

●

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा अ‍ॅण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रोड,
मुंबई २

●

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ,
पुणें २

*संतचरित्र-माला*

१. श्रीवासुदेवानंद सरस्वती
अर्थात् टेंबेस्वामी
२. श्रीगजानन महाराज – शेगांव
३. श्रीमाणिकप्रभु – माणिकनगर
४. श्रीबीडकर महाराज – पुणें
५. श्रीगुलाबराव महाराज
वऱ्हाड
६. श्रीगुते-गजानन महाराज
नाशिक
७. श्रीसिद्धारूढ स्वामी – हुबळी
८. श्रीअक्कलकोट स्वामी
९. श्रीगोंदवलेकर महाराज
१०. श्रीमाधवनाथ महाराज – इंदूर
११. महिपति ताहराबादकर इ.

महाराष्ट्रांतील अलीकडच्या काळांतील
अशीं अनेक श्रेष्ठ संतांचीं चरित्रें

मूल्य प्रत्येकीं रु. १–२५

● ●

तसेंच महाराष्ट्रांतील आधुनिक
विद्यमान संतश्रेष्ठ

श्रीमत् प. प. श्रीधरस्वामी महाराज
यांचें चरित्र : भाग पहिला : साधना
मूल्य रु. १–५०

पाहिल ११५७
१०/११/८८

# निवेदन

**“ जसें शुद्ध सोनें तसा तूं ( उपासनी महाराज ), जेथें बसला तेथें सांई-मौला ”**

**“ त्याच्यांत ( उपासनी महाराज ) व माझ्यांत फरक नाहीं. त्याची सर्व जोखीम माझ्यावर आहे. ”** – श्रीसांईबाबा

श्रीउपासनीबाबा महाराज, साकोरी, यांचें हें छोटें चरित्र आहे. श्रीबाबांच्या एकाहत्तर वर्षांच्या आयुष्यांतील साधकावस्था संपेपर्यंतचीं पहिलीं सुमारें सेहेचाळीस वर्षें वजा केलीं, तर उरलेल्या पंचवीस वर्षांत त्यांनीं हजारों लोकांना परमार्थाचा खरा मार्ग दाखवून, त्यांना ज्ञानबोधामृत पाजून व शेवटीं एका विशिष्ट परंपरेच्या धर्मपीठाची स्थापना करून अद्वितीय धर्मकार्य केलेलें आहे. धार्मिक अवनतीच्या हल्लींच्या काळांत ब्राह्मण्याचा व स्त्री-धर्माचा थोर आदर्श समाजापुढें ठेवून, राष्ट्राच्या उद्धाराची एक नवी दिशाच त्यांनीं विचारवंतांना दाखविली आहे.

श्रीउपासनी महाराजांच्या चरित्राचा व त्याच्या अनुषंगानें त्यांच्या सर्व प्रवचनांचा पद्धतशीर अभ्यास करून, त्यांचें तत्त्वज्ञान – वैदिक तत्त्वज्ञानाची त्यांनीं केलेली मांडणी – समजून घेणें हें एक स्वतंत्र कार्य होईल. ‘ मी काय सांगतों हें लोकांना पक्कें समजण्यास आणखी चाळीस वर्षांचा काळ गेला पाहिजे ’, असें ते स्वतः म्हणत असत.

एकदां श्रीबाबा प्रवचनांत म्हणाले, “ जगांतील सर्व वस्तु तुमचें मन बनत असतें, मग काय तें सत्पुरुष बनणार नाहीं ?...असा व्यवहार कां शिकत नाहीं ? बायका-पोरांत, धनांत जीव ठेवून याल तर काय उपयोग ? **इतकें स्पष्ट सांगणारा हजार जन्म घेतले तरी मिळणार नाहीं.** तुकाराम, रामदास यांनीं इतकें लिहून ठेवलें, परंतु कोणी एखादाच तयार झाला असेल. मी तुम्हां सर्वांस तयार करण्यास बसलों आहें; परंतु तुम्हीं व्याप तर सोडला पाहिजे ना ? ”

या चरित्रांत थोडें सांगितलें व पुष्कळ सांगावयाचें राहून गेलें आहे. त्या दृष्टीनें श्रीबाबांचें हें चरित्र एकश्लोकी श्रीरामायणासारखेंच आहे ! श्रीसती गोदावरी माता यांच्याकडून त्यांचा व श्रीबाबांचा आशीर्वाद मिळाल्यावर लेखनास प्रारंभ होऊन हें पुस्तक त्यांच्याच कृपेनें आज समाप्त झालें.

हें पुस्तक लिहितांना श्री. भैरवनाथ तु. वाघ, व्यवस्थापक, कन्याकुमारी-स्थान, साकोरी, यांचें अतिशय साहाय्य झालें. सर्व हस्तलिखित आपलेपणानें वाचून त्यांनीं अनेक महत्त्वाच्या सूचना केल्या व दुरुस्त्याहि सुचविल्या, याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहें. तसेंच 'श्री-उपासनी-लीलामृत' प्रकाशक श्री. रं. गो. वकील, साकोरी; 'उपासनी-बाबा महाराज, संक्षिप्त चरित्र' लेखक श्री. गुरुपदसेवक व 'श्रीसद्गुरु सती माताजी' ले. श्री. गुरुपदसेवक, या तीन पुस्तकांचाच* मीं प्रामुख्यानें उपयोग केला आहे; म्हणून या पुस्तकांच्या लेखकांचे आणि प्रकाशकांचे मी मनःपूर्वक आभार मानतों. श्रीबाबांचे एक परमभक्त व माझे अनेक वर्षांचे मित्र श्री. ज. आ. बडवे, पुणें, यांच्या बहुमोल साहाय्याचा निर्देशहि अवश्य केला पाहिजे.

श्रीसद्गुरु सांईबाबा, श्रीउपासनी महाराज व श्रीसती गोदावरी माता या परंपरेच्या त्रिमूर्तींचें स्मरण करून हें संत-चरित्र वाचकांच्या हातीं देतों.

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

आषाढ वद्य १३, शके १८८२
गुरुवार, दि. २१ जुलै १९६०
पुणें २.

**के. ल. पुराणिक**


---

* हीं पुस्तकें व्यवस्थापक, श्रीकन्याकुमारी-स्थान, सांकोरी, पो. राहता, जि. अहमदनगर येथें विकत मिळतात.

* * *

## अनुक्रम


१. चौदा वर्षांचा वनवास
२. गृहस्थाश्रमांतील परवड
३. शिर्डीस आगमन
४. महाराजांचा 'निकाल' झाला !
५. अतींद्रिय दिव्य ज्ञानलाभ
६. खड्गपुरांतील गूढ जीवनक्रम
७. मध्यंतर आणि तीर्थयात्रा
८. श्रीबाबांचें गुरुकार्य
९. श्रीसती गोदावरी व 'कन्याकुमारी स्थान'
१०. महासमाधि
११. ग्रंथरचना आणि शिष्यसंप्रदाय
१२. यात्रिकांसाठीं माहिती



श्री उपासनी महाराज–साकोरी



श्रीसद्गुरु साईबाबा–शिरडी

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः ।

श्रीमद्दत्तात्रेयगुरुचरणारविंदाभ्यां नमः ।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. १०९६४

## चौदा वर्षांचा वनवास : १

* * * * * * * * * * * *

श्रीउपासनी महाराजांचा जन्म ज्या थोर ब्राह्मण कुळांत झाला त्याची मागील सात पिढ्यांची माहिती सुदैवानें उपलब्ध आहे. शुक्ल-यजुर्वेदी, माध्यंदिन शाखेच्या या घराण्याचें गोत्र गौतम असून, कुलदैवत कोल्हापूरची महालक्ष्मी हें होतें. महाराजांचे ज्ञात मूळ पुरुष विठ्ठलभट हे शके १६१५ मध्यें जन्मले. त्यांचें वास्तव्य कोल्हापुरास असून ते उत्तम घनपाठी होते. त्यांनीं गायत्रीपुरश्चरण केलें होतें. यांचे चिरंजीव लक्ष्मणभट्ट उत्तम वैदिक व ज्योतिषी होते. हे देवीपुढें नित्य सप्तशतीचा पाठ नियमानें करीत. लक्ष्मणभट्टांचे चिरंजीव शिवरामशास्त्री हे कोल्हा-पुराहून नाशिक जिल्ह्यांतील सटाणें गांवीं श्रीमंत मल्हारराव देशमुख यांच्या पदरीं जाऊन राहिले. त्यांनीं मुल्हेरच्या श्रीउद्धव महाराजांचा भागवत संप्रदाय स्वीकारला व श्रीरामोपासना सुरू केली. यांचे पुत्र दयारामशास्त्री हे महाराजांच्या आजोबांचे आजोबा. दयारामशास्त्री महापंडित असून व्याकरण, धर्मशास्त्र इत्यादींचा त्यांचा व्यासंग दांडगा होता. श्रीगणपतीच्या आराधनेनंतर त्यांना जो पुत्र झाला त्याचें नांव त्यांनीं 'चिंतामणि' असें ठेवलें. यांनीं सार्थ वेदाध्ययन केलेलें होतें व हे शुक्ल यजुर्वेदावर प्रवचनें करीत असत. यांच्या सदाचारसंपन्नतेमुळें लोक यांना साधूसारखा मान देत. चिंतामणिभट्टांना गोपाळ, यदुपति व राम-कृष्ण असे तीन पुत्र झाले; पैकीं गोपाळ हेच महाराजांचे आजोबा. यांच्या विद्वत्तेची व सदाचरणाची कीर्ति बडोद्यास सयाजीराव महाराजांच्या कानांवर गेल्यामुळें महाराजांनीं त्यांना बडोद्यास बोलावून घेतलें व त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांच्याकडे कांहीं अधिकारहि सोंपविला. गोपाळ-शास्त्र्यांची सर्व दिनचर्या जुन्या धार्मिक परंपरेप्रमाणें चालत असे;

त्यामुळें आणि त्यांच्या विद्वत्तेमुळें बडोद्यास त्यांच्या प्रवचनाला थोर थोर मंडळी उपस्थित असत.

कांहीं दिवसांनीं बडोद्यास रहाणें त्यांना रुचेनासें झालें, म्हणून तेथील मंडळींचा निरोप घेऊन गोपाळशास्त्री सटाण्यास आपल्या घरीं परत आले. बडोद्याहून गोपाळशास्त्री परत जाणार हें पाहून तेथील नागरिकांनीं त्यांचा सन्मान करून त्यांना वस्त्रालंकार व कांहीं द्रव्यहि अर्पण केलें; परंतु त्यांतील कशाचाहि स्वीकार न करतां स्वतःच्या साध्या कपड्यांनिशींच ते घराकडे परतले! श्रीउपासनी महाराजांच्या अंगीं जें आत्यंतिक कडक वैराग्य बाणलेलें दिसून आलें तेंहि इतर सद्‌गुणांबरोबर कुलपरंपरेनेंच त्यांच्याकडे आलेलें होतें हें या गोष्टीवरून स्पष्ट होईल. महाराजांची पारमार्थिक अवस्था फार उंच असल्यामुळें त्यांची भारतभर कीर्ति झाली; परंतु त्यांच्या अगोदरच्या कित्येक पिढ्यांतील पुरुषांनीं शास्त्रशुद्ध सदाचरणानें, विद्येच्या आराधनेनें व भगवंताच्या एकनिष्ठ उपासनेनें एका महापुरुषाच्या आगमनाची जणुं पूर्व-सिद्धताच करून ठेवली होती. पिढ्यान् पिढ्यांची ही अमाप पुण्यफलसंपत्तीच जशी कांहीं उपासनी महाराजांच्या रूपानें साकार झाली असें म्हणावयास हरकत नाहीं.

सटाण्यास परत आल्यावर गोपाळशास्त्री आपला काळ स्नान-संध्या वगैरे धर्मकृत्यांत घालवीत आणि अनाथ विद्यार्थ्यांचा उदरनिर्वाह स्वतः चालवून त्यांना विद्यादान करीत. थोडक्यांत म्हणजे त्यांचें आचरण एखाद्या पूर्वकालीन ऋषींसारखें असून ते अत्यंत समाधानानें आनंदांत असत. शास्त्रीबुवांकडे अनेक विद्यार्थी विद्याभ्यास करण्यासाठीं रहात व त्यांना लावलेली कडक शिस्त शास्त्रीबुवांच्या नातवालाहि – महाराजांना – पाळावी लागे. या शिस्तीचा व आजोबांच्या आचरणाचा परिणाम महा-राजांवर विशेष झालेला आहे.

गोपाळशास्त्र्यांचे दुसरे पुत्र गोविंदशास्त्री हे महाराजांचे वडील होत. यांनीं गणित व ज्योतिष या शास्त्रांचा अभ्यास करून त्यांत प्रावीण्य संपादन केलें आणि त्यामुळें त्यांना धुळें येथें न्यायाधिशांच्या कार्याल-यांत नोकरी मिळाली. यांच्या पत्नीचें नांव रुक्मिणीबाई, याच महा-राजांच्या मातुःश्री होत. गोविंदशास्त्र्यांना एकंदर पांच मुलगे व एक

मुलगी अशी संतति झाली. त्यांतील दुसरे पुत्र काशीनाथ म्हणजेच उपासनी महाराज होत.

सौ. रुक्मिणीबाईंना वैशाख वद्य द्वितीया शके १७९२ ( दि. १५ मे १८७० ) या दिवशीं प्रदोषकाळीं चंद्रोदयाच्या वेळीं पुत्रलाभ झाला व आजोबांनीं या नातवाचें नांव काशीनाथ असें ठेवलें. महाराजांच्या जन्माच्या अगोदर थोडे दिवस रुक्मिणीबाई श्रीउद्धवस्वामींच्या दर्शनास मुल्हेर येथें गेल्या असतांना, तेथें त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रकाशाचें दिव्य दर्शन झालें होतें ही सूचक घटना ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. उत्तरायुष्यांत रुक्मिणीबाईंना मोठी पारमार्थिक योग्यता प्राप्त झाली. महाराज मातुःश्रींना अतिशय मान देत व त्यांच्याशीं सदैव नम्रतेनें वागत.

काशीनाथाला पांचव्या वर्षींच आजोबांनीं घरीं शिक्षण देण्यास प्रारंभ केला. वयाच्या आठव्या वर्षीं सटाण्याचे सुप्रसिद्ध सत्पुरुष श्रीयशवंतराव महाराज म्हणजे देव मामलेदार यांच्या आदेशाप्रमाणें गोपाळशास्त्र्यांनीं नातवाची मुंज केली. वेदविद्या व इतर शास्त्रें यांच्या अध्ययनाची सोय घरीं होतीच, तथापि त्या वेळच्या रीतीप्रमाणें व्यावहारिक शिक्षणासाठीं काशीनाथाला सरकारी शाळेंत दाखल करण्यांत आलें. तेथ शिकत असतांना एकदां क्षुल्लक कारणावरून शिक्षकांनीं काशीनाथाला छडीनें झोडपून काढलें; त्याचा राग येऊन पोरवयाच्या काशीनाथानें रडत रडत शाळेला रामराम ठोकला व घर गांठलें. यानंतर पुन्हां आयुष्यांत कधींहि काशीनाथ शाळेची पायरी चढला नाहीं ! शाळा सुटली तरी काशीनाथाचा घरीं जुन्या शास्त्रीपद्धतीचा अभ्यास चालूच होता. त्या वयांत सुद्धां आपलें नित्याचें कामधाम करून जो कांहीं वेळ उरत असे त्याचा उपयोग काशीनाथ उपासनेसाठीं व ईश्वरचिंतनाकरितां करी. अशा परिस्थितींत काशीनाथाला पुढच्या जीवनक्रमाचें जणु काय निदर्शक परंतु फार भयंकर असें एक स्वप्न पडलें, व त्यानें काशीनाथाच्या अंतर्बाह्य जीवनाला जबरदस्त हादरा बसला.

हें भयंकर स्वप्न पाहिल्यामुळें काशीनाथाला फार भीति वाटूं लागली व त्यामुळें तो दररोज कोठेंतरी जाऊन रडत बसूं लागला. रडण्याचें कारण वडील माणसांनीं विचारल्यावरहि भीतीमुळें तो

सांगेना. पुढें कांहीं कालानें आजोबांना काशीनाथानें तें स्वप्न सांगितलें. तो म्हणाला "एक अनोळखी घर असून त्यांत होमकुंड होतें. त्या कुंडांत धगधगीत अग्नि असून त्याच्या मध्यभागीं मी उभा होतों व अग्नीच्या ज्वाळा सगळीकडून उंचच उंच जात होत्या. अग्निकुंडाच्या बाजूला एक भयंकर धिप्पाड पुरुष उभा होता व तो मला आसुडानें एकसारखे फटके मारीत होता. मी कुंडांत उभा राहून मार खात होतों व एकसारखा ओरडत होतों!" नातवाची हकीकत ऐकून आजोबांनाहि चिंता वाटली असेल; तेव्हां त्यांनीं पुढील श्लोक रोज झोपण्यापूर्वी म्हणण्यास काशी-नाथाला सांगितलें :

**अगस्तिर्माधवश्चैव मुचकुंदो महामुनिः ।**
**कपिलो मुनिरास्तीकः पंचैते सुखशायिनः ॥**

या श्लोकाच्या पठनानें कांहीं दिवसांनीं काशीनाथाची भीति पुष्कळ कमी झाली.

यानंतर सुमारें पांच-सहा वर्षांनीं काशीनाथाला एक मुलगी सांगून आली व आजोबांनीं लोकरीतीप्रमाणें या मुलीशीं काशीनाथाचें लग्न लावून दिलें. अशा रीतीनें वयाच्या चौदाव्या वर्षाच्या सुमारास अंगीं कोणतीहि विद्या नसतांना, प्रपंचाची जबाबदारी अंगावर पडल्यानें विचारी काशी-नाथाच्या मनाला निराळीच टोंचणी लागली. बाहेर जाऊन कोठेंतरी उद्योगधंदा करावा, तपश्चर्या करावी किंवा कांहीं न जमल्यास देह-त्यागच करावा असल्या विचारांनीं त्याच्या मनांत काहूर उठलें. आजोबांना हा बेत कळतांच त्यांनीं नातवाला कोठेंतरी निघून जाण्याच्या प्रयत्ना-पासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला, पण तो निरुपयोगी ठरल्यानें त्यांनीं काशीनाथाला धुळें येथें त्याच्या वडिलांकडे — गोविंदरावांकडे — पाठवून दिलें. तेथें काशीनाथ कांहीं दिवस स्वस्थ होता, पण 'उदासीन हा काळ कोठें न कंठे।' अशी त्याची मनःस्थिति झालेली असल्यानें, एके दिवशीं रात्रीं काशीनाथानें गृहत्यागाबाबत वडिलांना एक पत्र लिहून घरीं ठेवून दिलें, व दुसरें दिवशीं पहांटेसच, कोणी झोपून उठण्याच्या अगोदर त्यानें घर सोडलें! काशीनाथानें धुळ्याहून चाळीसगांवचा मार्ग धरला व कोणी

आपणांस पाहील या भयानें तो सारखा पळत सुटला. उजाडल्यावर काशीनाथाच्या मातापितरांना मुलाचें पत्र पाहून ब्रह्मांड आठवलें असेल; पण शोध करूनहि त्या दिवशीं काशीनाथाचा पत्ता लागला नाहीं. या वेळीं त्याचें वय सुमारें पंधरा वर्षांचें असावें.

वाटेंत चाळीसगांवला थोडा मुक्काम करून काशीनाथ नाशिकला पोहोंचला. वडिलांच्या ओळखीचे एक गृहस्थ रामकृष्णपंत दीक्षित यांच्या घरीं रहावें, गंगेवर स्नानसंध्या करावी, भिक्षा मागून उदरनिर्वाह करावा आणि एकनाथशास्त्री या विद्वानाच्या सान्निध्यांत काळ घालवावा अशी या तापसी मुलाची दिनचर्या होती. काशीनाथानें घरीं एक खुशालीचें पत्रहि टाकलें. कांहीं महिन्यांनीं मातुःश्री आजारी असल्याबद्दल घराहून पत्र आल्यामुळें काशीनाथ धुळ्याला परत गेला; तेव्हां वडिलांनीं 'आम्हांस त्रास होईल अशा रीतीनें जाऊं नये' असें त्यास बजावलें.

पुढें आजोबांनीं बोलाविल्यावरून काशीनाथ धुळ्याहून सटाण्यास गेला. तेथें रहात असतां थोड्याच दिवसांनीं काशीनाथाची पहिली पत्नी अल्पशा आजारानंतर स्वर्गवासी झाली. पण वडील मंडळींनीं लगेच खटपट करून काशीनाथाचा दुसरा विवाह केला! मात्र या घटनांनीं काशीनाथाच्या उदासीन वृत्तींत काडीमात्र फरक पडला नाहीं. विवहानिमित्त वडील-मातुःश्री सुद्धां सर्व मंडळी जमलेली असल्यानें काशीनाथानें घर सोडून विद्याभ्यासाकरितां पुण्यास जाण्याची परवानगी मागितली. वडील माणसांचा अगदीं नाइलाज झाल्यानें ही परवानगी त्यांना द्यावी लागली व काशीनाथ यथाकाल पुण्याला येऊन पोहोंचला.

पुणें येथें काशीनाथाचा मुक्काम बहुधा मुठा नदीच्या कांठीं स्मशानभूमीला लागून असलेल्या ॐकारेश्वराच्या मंदिरांत असे. घरीं कांहींतरी कळवावयास पाहिजे म्हणून प्रथम तो पुणें येथें एक-दोघां शास्त्री पंडितांच्या सहवासांत असे. तरी पण अभ्यासाचा कंटाळा असल्यामुळें व ईश्वरी स्थिति जाणण्याची ओढ वाढत असल्यामुळें निराहार स्थितींत एकान्तांत राहून स्नानसंध्या, ध्यानधारणा, तपश्चर्या अशा गोष्टींत काशीनाथाचा काळ जाऊं लागला. फारच भूक लागल्यास एखादे ठिकाणीं भिक्षा मागून कांहीं खावें व पुन्हां आपल्या उद्योगाला लागावें असा प्रकार चालू होता. तथापि या

स्थितींतहि ' पुसतांहि देऊं नये ओळखी आपुली ' या समर्थ-वचनाप्रमाणें काशीनाथाचें वागणें असे. निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या पद्धतीनें रहावें व कोठेंहि विशेष ओळख पडूं देऊं नये अशा धोरणानें त्याचा कार्यक्रम चाले. या काळांत कडुनिंबाचा पाला खाऊन रहाण्याचीहि काशीनाथाची तयारी झाली. पुण्याला एकंदर रहाणें किती वर्षें झालें हें नक्की समजण्यास मार्ग नाहीं.

पुण्याला असतांना रास्ता पेठेंतील एक विधवा ब्राह्मण बाई काशीनाथाच्या स्थितीची कांहीं कल्पना आल्यानें त्याला नियमानें थोडें अन्न देत असे. पुढें त्या बाईकडून रोज खूप पोळ्या मागून आणाव्यात व त्या भिकाऱ्यांना वांटून टाकाव्यात असा क्रम काशीनाथानें कांहीं दिवस चालविला. त्याचा कंटाळा आल्यावर गांवाबाहेर एका शिवालयांत एका ब्रह्मचाऱ्याच्या संगतींतहि तो कांहीं दिवस राहिला. पुढें त्याचाहि कंटाळा आल्यानें घरीं खुशालीचें पत्र टाकून एक दिवस मध्यरात्रीं काशीनाथानें मुंबईला जाणाऱ्या रेल्वे-रस्त्यानें प्रवास सुरू केला. हा प्रवास अनवाणी व खडीच्या रस्त्यानें चालू होता. थकल्या-भागल्यावर रस्त्याच्या कडेला पडून रहावें व थोडी हुशारी वाटली कीं पुढें जावें, अशा रीतीनें जातां जातां, सोवळें-भांडें, अंथरुण-पांघरूण असलेल्या सामानाचाहि त्याला उबग आला व त्या सगळ्याचें गांठोडें करून तें काशीनाथानें वाटेंतील एका दरींत फेंकून दिलें. नेसलेल्या धोतराचा अर्धा भाग खांद्यावर टाकून चालतां चालतां तो कल्याणास पोहोंचला. भयंकर भुकेनें प्राण व्याकुळ होऊं लागल्यानें काशीनाथ दुपारीं एका ब्राह्मण अधिकाऱ्याच्या दारांत गेला व त्यानें कांहीं अन्न वाढण्याबद्दल विनवणी केली; पण भिक्षेच्या-ऐवजीं अपशब्द ऐकून घेऊन त्याला पुढें जावें लागलें. पुढच्या घरींहि असाच अनुभव आल्यानें काशीनाथ गांवाबाहेर जाऊन, थोडें पाणी पिऊन, आपल्या दुर्दैवाचा विचार करीत बसला. सायंकाळीं रस्त्यावरून जाणाऱ्या एका म्हाताऱ्या मराठा बाईचें त्याच्याकडे लक्ष गेल्यामुळें ती जवळ आली व ममतेनें काशीनाथाची विचारपूस करूं लागली. तिचे कनवाळूपणाचे शब्द ऐकतांच काशीनाथाला रडूं कोसळलें व त्यामुळें बोलणेंहि अशक्य झालें. त्याच्या परिस्थितीबद्दल

थोडासा खुलासा हातांच म्हातारीनें 'आपल्या कर्मांत असेल तें भोगलें पाहिजे' असें सांगून त्याला दोन आर्या म्हणून दाखविल्या. त्यांचें तात्पर्य इतकेंच होतें कीं, कर्मदशा भोगतांनाहि हरिभक्ति जोडावी व विषयांची आशा सोडून सदैव सत्संगति धरावी. आलेली वेळ कशी-तरी निभावून न्यावी. पुढें आयुष्यभर हा उपदेश काशीनाथानें पक्का ध्यानांत ठेवला होता. म्हातारीच्या घरीं गेल्यावर, तिच्या सांगण्याप्रमाणें काशीनाथाला ज्या घरीं दुपारीं भिक्षा मिळाली नव्हती त्याच घरांच्या मागील दारानें जाऊन रात्रीं भिक्षा मिळाली व जें काय मिळालें तें खाऊन काशीनाथ म्हातारीच्या ओटीवर झोपून राहिला.

दुसऱ्या दिवशीं काळोख असतांनाच काशीनाथानें त्या म्हातारीचा निरोप घेतला व तो नाशिकच्या सडकेनें निघाला. वाटेंत उपासमारीनें व पावसानें फार हाल झाले. प्रवासांत असतांना, आपण काय सांगून घरांतून निघालों व काय झालें आणि तपश्चर्या करण्याच्या निर्धारानें निघालों तरी अद्याप तपश्चर्येला योग्य अशी जागाच सांपडत नाहीं, असल्या विचारांनीं त्याचें मन अगदीं अस्वस्थ झालें. इतक्यांत घरची मंडळी काळजी करीत असतील या कल्पनेनें, एकदां घरीं जाऊन यावें व मग कोठेंतरी एकान्तांत तपश्चर्येसाठीं बसावें असा त्याचा बेत ठरला व त्यामुळें काशीनाथानें चांदवडचा रस्ता धरला. नाशिक टाकून पुढें चांद-वडच्या मार्गानें जात असतां कांहीं वेळानें त्याला रस्त्यापासून जवळच एक पाण्याचा प्रवाह व पलीकडच्या बाजूला दोन देवालयें दिसलीं. काशी-नाथानें प्रवाहांत स्नान केलें, दोनहि देवळांत जाऊन पूजा केली व जवळ असलेले फुटाणे वगैरे खाऊन देवळाच्या पारावर बसून तो पुढें जावें कीं रात्र येथेंच काढावी असा विचार करीत बसला. इतक्यांत समोरच्या डोंगराची शोभा पहातां पहातां निवान्त बसण्यासाठीं जणुं मुद्दामच तयार करून ठेवलेली अशी एक जागा काशीनाथाच्या दृष्टीला पडली. ती जागा आपल्या सोयीची आहे कीं नाहीं हें पाहून सूर्यास्तापूर्वीं देवळांत परत यावें असें ठरवून काशीनाथ जलदीनें निघाला, परंतु तो तेथें पोहोंचेपर्यंतच सूर्यास्त होण्याची वेळ येऊन ठेपली. तरी धीर न सोडतां कपारीजवळ वाढलेल्या जंगली पिंपळाच्या फांद्यांना धरून तो त्या दीड

पुरुष उंचीवर असलेल्या कपारींत जाऊन पोहोंचला. त्या निर्जन व अवघड स्थळांतील ती एकान्ताची अरुंद जागा त्याला फार आवडली व येथेंच बसून रहावें कीं काय अशा विचारांत तो असतांनाच हां हां म्हणतां सगळीकडे काळोख पसरला.

रात्र पडली असें पहातांच काशीनाथानें तेथेंच मांडी ठोकली. दुसरा दिवस उजाडला तरी तेथून उठून परत जावें असें त्याला वाटेना. सध्यां बसूं, नंतर काय तें ठरवितां येईल अशा मनःस्थितींत तो असतांनाच दिवसामागून दिवस जाऊं लागले व कांहीं काळानें काशीनाथाचें देहभानच नाहींसें झालें. तथापि आंत जिवाची जाणीव होती; झोप लागल्यासारखें किंवा स्वप्न पाहिल्यासारखें असें कांहींतरी वाटे. देहपतन तरी होईल किंवा ईश्वरप्राप्ति म्हणून जी कांहीं आहे ती तरी होईल अशा विचारांचा जोर वाढत गेला व बैठक पक्की झाली. ईश्वरावर एकनिष्ठेनें असा भार घातल्यावर अनुभव आला नाहीं तरच नवल!

कपारींत बसून कांहीं महिने झाल्यावर (हा काळ साधारणतः अकरा-बारा महिन्यांचा असावा असें श्रीबाबांच्या बोलण्यांत पुढें केव्हां केव्हां येत असे.) काशीनाथाला एक विलक्षण दृश्य दिसलें. स्वतःच्या शरिरांत त्याला एका दिव्य ज्योतीचें दर्शन झालें व नंतर कोणीतरी जवळ येऊन आपल्या शरिरावरची जाड चामडी सोलून काढीत आहे असेंहि त्याला दिसलें. बाहेरची चामडी सोलून काढल्यावर त्याच्या आंत असलेलें शुभ्र व दिव्य शरीर त्याला दिसलें! या दृश्याचा मनाला धक्का बसून काशीनाथ देहभानावर आला आणि पहातो तों पूर्वीं ज्या ठिकाणीं बसला होता त्याच ठिकाणीं कपारींत जसाच्या तसा बसलेला आहे. मात्र मध्यंतरीं बराच काळ लोटला असावा असें त्याला वाटलें. सर्व शरीर वाळून जाऊन त्याची लाकडासारखी स्थिति झाली होती व फक्त उजव्या हातालाच काय ती थोडी हालचाल करतां येत होती! देहभानावर आल्यावर लुप्त झालेले क्षुधा व तृषा हे विकार अत्यंत प्रबळ झाले आणि तहानेनें जीव कासावीस होऊं लागला. पाण्यावांचून आतां प्राण जाणार असें वाटूं लागलें, पण जिथें जागचें हालणेंहि अशक्य तिथें पाणी मिळण्याची तर कांहींच शक्यता दिसेना. अशा स्थितींत आतां आपल्याला मरण

येऊन आपोआप देहाची उपाधि संपेल या विचारानें काशीनाथाच्या मनाला थोडें समाधान वाटलें व डोळे मिटून घेऊन तो मनांत देवाचा आठव करूं लागला. मनुष्याच्या प्रयत्नांची परिसीमा झाली; म्हणून देवाला त्या कामांत लक्ष घालावें लागलें. एकाएकीं सगळीकडून ढग भरून आले व विजांचा कडकडाट आणि मेघगर्जना चालू होऊन मुसळधार पावसानें थोड्याच वेळांत सगळीकडे पाणीच पाणी झालें! डोंगरावरून वहात आलेल्या पाण्याचें एक डबकें काशीनाथाच्या समोरच तयार झालें!! ईश्वरी लीलेचें कौतुक करीत काशीनाथानें उजव्या हातानें त्या डबक्यांतलें थोडें थोडें पाणी पिऊन आपली तहान भागविली व मोकळ्या हातानें जखडून गेलेलें शरीर ठिकठिकाणीं चोळून रुधिराभिसरण सुरू करण्याचा प्रयत्न त्यानें चालू केला. दोन-तीन दिवसांनीं थोडी हुशारी वाटून कांहीं चलनवलन करण्याची शक्ति आल्यामुळें, कपारींतून खालीं उतरण्याचा विचार तो करीत आहे इतक्यांतच मागल्यासारख्याच दुसऱ्या एका दृश्यानें काशीनाथाला देहाची विस्मृति झाली.

एका महादेवाच्या मूर्तीजवळ काशीनाथ उभा असून बाजूला सुंदर पाण्याचा झरा वहात आहे. त्यांतील पाणी ओंजळींत घेऊन तो तें पीत आहे इतक्यांत तेथें दोन पुरुष प्रकट झाले; त्यांतील एक हिंदु व दुसरा मुसलमान होता. त्या दोघांनीं काशीनाथाला घट्ट धरलें व त्याच्या सर्व अंगाचें कातडें सोलून त्याचें आंतील दिव्य शरीर त्याला दाखविलें. त्या आंतील शरिराकडे बोट करून ते दोघे म्हणाले, “ तूं मरण्यासाठीं बसलास, पण आम्ही तुला थोडेंच मरूं देतों. आम्ही तुझ्या पाठीशींच आहोंत ! ” हीं दृश्यें म्हणजे स्वप्नें नव्हतीं, तर चांगल्या जागृतींत असतांना सर्व प्रकार प्रत्यक्ष घडल्यासारखा दिसत असे.

आतां आपणाला मृत्यु येण्याचा संभव नाहीं याची काशीनाथाला खात्री वाटूं लागली. कपारींतून पुढें सरकून त्यानें पिंपळाच्या फांद्यांना धरून आपलें शरीर खालीं झोकून दिलें; दगडांवर अंग सडकून निघालें खरें, पण देवदयेनें विशेष इजा वगैरे झाली नाहीं. खालीं उतरल्यावर काशीनाथ खुरडत-खुरडत पुढें गेला. रात्रींच्या वेळीं वाटेनें जाणाऱ्या भिल्लिणींनीं काशीनाथाची ती भयंकर दशा पाहून त्याला आपल्या

वाडीवर नेलें व त्याला पिण्यास दूध आणि रहाण्यासाठीं निवाऱ्याची जागाहि दिली. आपला भार त्यांच्यावर नको म्हणून काशीनाथ त्या गरीब लोकांबरोबर कधीं कधीं लाकडांच्या मोळ्या डोक्यावर घेऊन नाशकास जाई व येणारे पैसे त्या भिल्लांस देत असे !

हा क्रम सुमारें एक महिनाभर चालला असेल. नंतर काशीनाथानें भिल्लांचा निरोप घेतला व त्यांनीं दिलेल्या नाचणीच्या भाकरी, अंगावर घेण्यासाठीं एक तरटाचा तुकडा व हातांत एक काठी एवढ्या सामग्रीनिशीं काशीनाथानें सटाण्याचा मार्ग धरला. या भागांत ओळखीची मंडळी भेटण्याचा संभव अर्थातच फार; तेव्हां या विचित्र अवस्थेंत आपल्याला कोणीं न पाहिलेलें बरें या बुद्धीनें दिवसभर जंगलांत पडून रहावें व रात्रीचाच प्रवास करावा. अशा रीतीनें कांहीं दिवसांनीं काशीनाथ सटाण्यास येऊन पोहोंचला.

♣ ♣ ♣

## गृहस्थाश्रमांतील परवड : २

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

काशीनाथ सटाण्यास आला त्या दिवशीं शके १८२२ ची श्रावण शुद्ध पंचमी ( इ. स. १९०० : ३१ जुलै ) होती; म्हणजे काशीनाथपंतांचें वय वेळीं तीस या वर्षाचें होतें. पंधराव्या वर्षींच्या पहिल्या गृहत्यागानंतर एक वर्ष घरीं रहाणें हिशेबांतून काढल्यास, या वेळीं सटाण्यास परत येईपर्यंत मध्यें सुमारें चौदा वर्षांचा काळ गेला. यांपैकीं पुण्यांत रहाणें किती, अन्य ठिकाणीं किती व कपारींतील बैठकीचा काळ किती याबद्दल निश्चित असें कांहींहि सांगतां येण्यासारखें नाहीं. मात्र माहीत असलेल्या हकीकतींवरून इतकें अनुमान निघतें कीं, या काळांत कपारींत बसण्यापूर्वींहि पुण्याहून निघाल्यावर वा तत्पूर्वी काशीनाथपंतांनीं कोठेंतरी बरीच कडक तपश्चर्या केलेली असावी. पुणें सोडल्यापासून दीड-दोन वर्षांनीं काशीनाथपंत घरीं पोहोंचले असा उल्लेख एका चरित्रांत आहे.

रात्र पडून अंधार होईपर्यंत काशीनाथपंत नदीच्या वाळवंटांतच राहिले व मध्यरात्रींच्या सुमारास घरासमोर आले. तेथें वडील बंधु बाळकृष्णशास्त्री समोर दिसल्यानें पंतांनी त्यांना 'दादा' म्हणून हळूच हांक मारली. काशीनाथपंतांची ती स्थिति पाहून शास्त्रीबुवांना गहिंवरून आलें. त्यांनीं पंतांना गाईच्या गोठ्यांत नेऊन बसविलें व त्यांना चांगले कपडे आणून देऊन, 'काशीनाथ घरीं आल्याची वार्ता' हळूहळू सर्वांच्या कानांवर घातली. मध्यंतरीं घरच्या परिस्थितींत बराच फरक पडला होता. आजोबांनीं वर्षापूर्वीं संन्यास घेतला होता व अलीकडे त्यांना अर्धांगाचा विकार होऊन ते पराधीन झाले होते. गोविंदशास्त्री या वेळीं घरींच रजेवर आले होते. इतक्या वर्षांनीं काशीनाथपंतांची भेट झाल्यानें सर्व मंडळींना अर्थातच फार आनंद वाटला; पण आपल्या नातवाच्या तपश्चर्येची हकीकत ऐकून संन्याशी आजोबांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागले. काशीनाथपंतांचें शरीर तपश्चर्येच्या कष्टामुळें अगदीं वाळून गेलें होतें, पण त्यांच्या तोंडावर व डोळ्यांत मात्र तपस्तेज झळकत होतें. आतां कुटुंबांत जरा स्थिरस्थावर होणार असें दिसलें, पण ती वादळापूर्वींची शांतता होती.

आजोबांचे दुखण्याचे हाल आपण कमी करूं शकत नाहीं हें पाहून काशीनाथपंतांना फार वाईट वाटलें व आपलें इतकें आयुष्य आपण वाया घालविलें, आतां तरी कांहीं विद्या शिकावी अशा विचारानें त्यांनीं घरींच आजोबांजवळ वैद्यकीचा अभ्यास चालू केला. पंतांना घरीं येऊन पंधरा-वीस दिवस होतात तोच त्यांचें वडील गोविंदशास्त्री यांना एकाएकीं जुलाब व वांत्या होऊन ते दुसऱ्याच दिवशीं वारले. त्यानंतर सुमारें सव्वा वर्षानें वृद्ध आजोबाहि समाधिस्थ झाले, व आजोबांच्या मागोमाग कांहीं दिवसांनीं काशीनाथपंतांच्या दुसऱ्या पत्नीनेंहि स्वर्गाची वाट धरली ! इतकें झालें तरी लगेच घरांतील वडीलधाऱ्या मंडळींनीं पंतांच्या तिसऱ्या लग्नाचा विचार चालविला. तो न आवडून काशीनाथपंत प्रवासाला निघून गेले व लग्नसराई संपल्यावर जेष्ठाच्या अखेर घरीं परतले. तरीहि मंडळींनीं अत्याग्रह करून शके १८२३ च्या आषाढ शुद्ध एकादशीस ( दि. २७ जून इ. स. १९०१ ) वयाच्या बत्तिसाव्या वर्षीं काशीनाथपंतांना तिसऱ्यांदां चतुर्भुज केलें ! पंतांच्या या कुटुंबाचें नांव सौ. दुर्गाबाई असें होतें.

यानंतर मात्र वैद्यकशास्त्राचा अभ्यास करण्याचें नक्की ठरवून काशीनाथपंतांनीं घर सोडलें, व सौ. दुर्गाबाईंना पुण्यास वडील बंधु श्री. बाळकृष्णशास्त्री यांच्याकडे ठेवून ते सांगलीला गेले. तेथें विद्वान् व साधुवृत्तीचे पुरुष म्हणून प्रसिद्ध असलेले श्री. व्यंकटरमणाचार्य यांच्याजवळ राहून पंतांनीं तीन-चार वर्षेंपर्यंत व्याकरण व वैद्यक या शास्त्रांचें उत्तम अध्ययन केलें. या काळांत कृष्णाकांठावरील एकान्तांत असलेल्या श्रीदत्तमंदिरांत त्यांनीं निष्ठेनें अनेक अनुष्ठानें पार पाडलीं असें सांगतात. अध्ययन संपल्यावर आचार्यांचा आशीर्वाद घेऊन पंत पुण्याकडे निघाले, पण जवळ पैसा नसल्यानें हा प्रवास पायींच सुरू झाला. वाटेंत एका म्हाताऱ्या गाढवाला ठार मारल्याच्या आरोपावरून काशीनाथपंतांवर बदमाश व लोभी कोल्हाटी लोकांनीं कुभांड रचलें व त्यांच्या डोक्यावर भलें मोठें ओझें देऊन त्यांना आपल्याबरोबर जबरीनें चालवीत दुसऱ्या गांवीं नेलें ! इतके हाल करूनहि हा पैसे देत नाहीं असें पाहून नंतर त्या लोकांनीं काशीनाथपंतांना मोकळें केलें व ते पसार झाले. अत्यंत सात्त्विक व धर्मशील अशा काशीनाथपंतांना या आपत्तीनें केवढा धक्का बसला असेल याची कल्पनाच करावी. दैव फिरतांच हरिश्चंद्रासारख्या राजर्षीलाहि डोंबाघरीं राबावें लागलें, तसलाच हा जबरदस्त फटका दिसतो.

पुण्याहून कुटुंबाला बरोबर घेऊन काशीनाथपंत सटाण्याला गेले व तेथें त्यांनीं वैद्यकी चालू केली. धंदा बरा चालूं लागला व आसपास प्रसिद्धीहि मिळूं लागली, तेव्हां त्यांनीं जळगांवास आपला दवाखाना चालू केला. येथें असतांना त्यांना दुर्दैवाचा एक निराळाच विलक्षण तडाखा बसला. एका गृहस्थाच्या सांगण्यावरून मारुतीपुढें ठेवलेली साखर काशीनाथपंतांनीं जमलेल्या लोकांना वाटली. पण ती विषमिश्रित असल्यानें प्रसाद खाणारे कांहीं लोक मृत्यु पावले व त्यानिमित्त पंतांवर फौजदारी खटला भरला गेला ! तथापि न्यायाधीशानें खटल्याच्या कामांत नीट लक्ष घातल्यानें सुदैवानें पंतांना अगदीं सौम्य शिक्षा मिळाली व हें संकट एकदांचें टळलें. असल्या दुःखांनींहि पंतांचें मन अधिकाधिक उदासीन व अधिकाधिक अंतर्मुख होत गेलें असेल.

आपला धंदा मोठ्या प्रमाणांत चालवावा म्हणून जळगांव सोडून काशीनाथपंत अमरावतीला गेले व तेथें त्यांनीं 'रामाश्रम' नांवाचा दवाखाना चालू केला. उत्कृष्ट नाडीपरीक्षा, स्वच्छ रोगनिदान व अचूक औषधयोजना यांमुळें आणि विशेषतः पंतांच्या धार्मिक आचरणामुळें दवाखान्याचा जम थोडक्या काळांतच चांगला बसला व पंतांचा लौकिकहि त्याबरोबर वाढत चालला. पुढें त्यांनीं सौ. दुर्गाबाईनाहि अमरावतीला बोलावून घेतलें व तेथें पंतांचा आदर्श गृहस्थाश्रम चालू झाला. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या उत्तेजनानें काशीनाथपंतांनीं 'भेषज रत्नमाला' नांवाचें एक मासिक चालू केलें व तेंहि लोकप्रिय ठरलें. रोगानिदान व औषध-योजना इत्यादि विषयांबरोबर तत्कालीन सामाजिक व धार्मिक स्थितीबद्दलहि ते या मासिकांत लिहीत. 'आपणांस जी निकृष्ट स्थिति प्राप्त झाली आहे, तिचा उगम मुसलमानी अमदानींत आहे. गेल्या शंभर वर्षांत तिचा कळस झाला आहे', 'शरीर सुस्थितींत ठेवण्यास व आयुष्य वाढविण्यास एक स्वधर्म हेंच मुख्य औषध आहे', 'विरुद्ध आचार-विचार-व्यवहार व सहवास यांचीं पुटांवर पुटें बसून आमचें अंतःकरण जर ... अमंगल बनलें आहे, तर मग तद्देशीय विरुद्ध बुद्धीस अनुसरून आम्हीं अनेक संकटें भोगावीं यांत नवल तें काय?', 'हल्लींच्या सुशिक्षित मंडळींत व्यवहारज्ञान, शारीरिक मानसिक जोमदारपणा, स्वतंत्र विचार-शक्ति आणि ईश्वराविषयीं पूज्य बुद्धि ... यांचा बहुतेक अभावच आहे', असले स्वतंत्र व स्वाभिमान जागृत करणारे विचार या मासिकांत लोकांना वाचावयास मिळत. दवाखाना व मासिक उत्तम चालूं लागलें, पैसा बराच मिळूं लागला व त्यामुळें व्यापहि वाढला. आतां हें सर्व ठीक चाललें आहे असें पति-पत्नींना वाटूं लागतें न लागतें तोंच आगामी संकटांची काळी छाया दिसूं लागली. 'देव भक्तालागीं करुं नेदी संसार। स्वयें वारासार त्याची करी॥' हें संतवचन काशीनाथपंतांच्या बाबतींत पुन्हां एकदां प्रत्ययाला आलें.

सौ. दुर्गाबाई या स्वभावतःच मनानें पवित्र, अत्यंत पतिनिष्ठ व ईश्वरभक्तिपरायण होत्या. भगवद्गीता व व्यंकटेशस्तोत्र यांच्या नित्य-पाठाशिवाय त्यांचा एकहि दिवस जात नसे. शिल्लक पडलेला

कांहीं पैसा काशीनाथपंतांनीं ग्वाल्हेर संस्थानांतील मालगुजारी विकत घेण्यासाठीं खर्च केला होता, पण त्या व्यवहारांत त्यांची फसवणूक होऊन मोठें नुकसान झालें. अर्थातच ही फसवणूक व नुकसान पंतांना मूळ ध्येयाकडे — देवाकडे परत ओढण्यास कारण झालें. नुकसान झालें तरी अधिक पैसा मिळवण्याकरितां पंतांचा उद्योग उत्साहानें चालूच होता. अशा स्थितींत एकदां थकून ते स्वस्थ पडून राहिलेले असतांना, इतका त्रास करून पैसे मिळविण्याची जरूर नाहीं, असें दुर्गाबाईनीं त्यांना सुचविलें. त्यावर ते म्हणाले, "मला तरी पैशाची काय गरज आहे? पण कदाचित् तूं जर माझ्यामागें राहिलीस तर तुझ्यासाठीं सांचवितां येतील तितके पैसे सांचवून ठेवतों!" पतीचे हे उद्गार ऐकून दुर्गाबाईना अत्यंत वाईट वाटलें. "असें असेल तर आग लागो त्या पैशाला" असें म्हणून "मी तुमच्या मागें रहात नाहीं" असेंहि त्यांनीं पंतांना निक्षून सांगितलें. याच संभाषणांत शेवटीं काशीनाथपंत असें म्हणाले कीं, "अग, परमेश्वरी सुख काय असेल तें मिळविण्याचाहि मला लोभ नाहीं; मग पैशाची व इतर गोष्टींची काय कथा?"

काशीनाथपंतांच्या मनांत अ-लिप्तपणा किती परिपूर्ण बाणला होता याचें हें स्पष्ट प्रत्यंतरच आहे. परमेश्वरी सुखहि नको असें म्हणणाऱ्या साधकाची बौद्धिक उंची व उदासीनतेची पातळी अत्यंत असामान्यच म्हटली पाहिजे. पुढें पंतांना प्राप्त झालेल्या अति उच्च पारमार्थिक अवस्थेचें हें प्रसादचिन्हच होय.

अशा तऱ्हेच्या विचारांनीं पंतांचें मन एकान्तवासाकडे व तपश्चर्येकडे पुन्हां जोरानें ओढ घेऊं लागलें. दुर्गाबाईंचीहि परमार्थानुकूल वृत्ति पहातांच संसाराचा पसारा आवरण्यास काशीनाथपंतांनीं लगेच सुरुवात केली व दवाखाना बंद करून चैत्र शुद्ध प्रतिपदा, शके १८३२ ( दि. १० एप्रिल १९१० ) या दिवशीं ते पत्नीसह तीर्थयात्रा करण्याकरितां बाहेर पडले! या वेळीं त्यांना चाळिसावें वर्ष चालू होतें. उभयतांच्या मतानें ॐकारमांधाता येथें जाण्याचें ठरलें व त्याप्रमाणें तीं लवकरच तेथें जाऊन पोहोचलीं. तेथील नर्मदेचा गंभीर प्रवाह व कांठावरील रम्य वातावरण पाहून त्या दोघां सात्त्विक साधकांचीं मनें आनंदानें बहरून आलीं आणि त्यांनीं

तेथेंच तपाचरण करण्याचा निश्चय केला. पहिल्या दिवशीं डोंगरास प्रदक्षिणा घालीत असतां वाटेंत त्यांना एक भव्य शिवमंदिर दिसलें. माणसापेक्षांहि अधिक उंचीचें असें तेथील प्रचंड शिवलिंग पाहिल्यावर एकान्तांत बसण्यास ही जागा उत्तम आहे असें ठरवून, पंतांनीं प्रदक्षिणा पुरी केली व दुसऱ्या दिवशीं ते तेथेंच रहावयास गेले. या ठिकाणीं उभयतांची उपासना व ध्यानधारणा चालू असतां एक दिवस एक विलक्षण संकट त्यांच्यावर कोसळलें, आणि त्याच्या तडाख्यानें काशीनाथपंतांना सांसारिक जीवनांतून कायमचेंच उठवलें.

एके दिवशीं पंत नित्याप्रमाणें ध्यान करीत बसले असतां त्यांच्या शरिराला एकाएकीं कसला तरी जबरदस्त धक्का बसला व त्यांचा श्वासोच्छ्वास एकदम बंद होऊन ते बेशुद्ध पडले. या कठीण प्रसंगीं दुर्गाबाईंनीं प्रसंगावधान राखून मोठ्या प्रयासानें पंतांना सावध केलें, पण त्यांचा श्वास परत येतांना एक मोठ्या व्याधीला बरोबर घेऊन आला ! त्यांचीं फुप्फुसें आतां काम करीनाशीं झालीं व बळेंच कृत्रिम श्वासोच्छ्वास करीत रहाणें त्यांना अत्यंत आवश्यक झालें. पोटाच्या साहाय्यानें हा श्वासोच्छ्वास ते करीत, परंतु क्षणभरहि या क्रियेकडे दुर्लक्ष झालें तर श्वास बंद पडल्यामुळें लगेच प्राण कासावीस होई. यामुळें नैसर्गिक देहधर्महि बंद पडत जाऊन सगळें लक्ष श्वासक्रियेकडे लागून राहिलें. या उपाधीमुळें काशीनाथपंतांना अतीव त्रास होऊं लागला खरा, परंतु योगसाधनेंतील एक विशेष उच्च अवस्था त्यांना एकाएकीं प्राप्त झाल्याचा हा परिणाम होता. म्हणून यापुढें पंतांना 'महाराज' असें म्हणणें अधिक योग्य ठरेल.

पुढें कांहीं वर्षांनीं महाराजांनीं एकदां या प्रसंगाची हकीकत सांगितली ती अशी : "मी आसनप्राणायाम कांहीं करीत नसे; परंतु त्या वेळीं ईशचिंतनांत असतां मनाची सर्व क्रिया बंद होऊन तें निश्चल झालें. इकडील किंवा परमेश्वराकडील सर्व विचार बंद झाले. देहभान नाहीं अशी स्थिति किती वेळ होती हें माहीत नाहीं. परंतु देहभानावर आल्यावर पहातों तों श्वासोच्छ्वास-क्रिया बंद झाल्याचें लक्षांत येऊन जीव घाबरला आणि एकदम धसका बसून बळेंच पोटाच्या मदतीनें श्वासोच्छ्वास करण्याचा प्रयत्न करून राहिलों."

या नव्या कटकटीनें महाराज अगदीं हैराण झाले व कांहींतरी उपचार करण्यासाठीं ते दुर्गाबाईसह नागपुरास येऊन पोहोंचले. तेथें डॉक्टर-वैद्यांचे उपचार सुरू केले, पण गुण येईना. योगशास्त्राची माहिती असलेले तेथील डॉ. परांजपे यांनीं महाराजांना तपासून कांहीं औषध-योजना करून दिली व ते म्हणाले, "घाबरूं नका ... हल्लीं तुमच्या श्वासाची गति सुषुम्नेंत होत आहे. त्याची पूर्णता होऊन श्वासगति पुन्हां पूर्ववत् झाल्यावर तुम्हांस त्रास न होतां समाधि-अवस्थेचा अनुभव येऊं लागेल व कांहीं दिवसांनीं आपोआपच चांगलें होईल." नागपुरास असतांना एकदां महाराज केडगांवच्या श्रीनारायण महाराजांच्या दर्शनाला गेले होते. त्या वेळीं नारायण महाराजांनीं आपल्या गळ्यांतील हार काढून महाराजांच्या गळ्यांत घातला; तेव्हां महाराजांना मोठी धन्यता वाटली.

पुढें नागपूर सोडून महाराज धुळें येथें बाळकृष्णशास्त्र्यांच्या बिऱ्हाडीं आले. तेथें मातुःश्री व इतर घरचीं माणसें यांच्या गांठीभेटी होऊन सर्वांना आनंद वाटला, पण महाराजांचें कृश शरीर व श्वासाच्या त्रासानें होणारी त्यांची दैना पाहून सगळ्याच मंडळींना रडूं कोसळलें. उपाय काय करावा हें अर्थातच कोणाला सांगतां येईना. झोप येत असूनहि सतत जागें राहण्याची खबरदारी महाराजांना घ्यावी लागे; कारण किंचित् झोप लागून श्वासाकडे दुर्लक्ष झाल्यास बेशुद्ध पडण्याचा धोका असे! खाणें-पिणेंहि यामुळें झपाट्यानें कमी होऊं लागलें. त्यांना इतर कांहींच शारीरिक व्याधि नव्हती, पण श्वासाच्या त्रासानें प्राणवायु बंद होऊन नाडीहि बंद पडल्या-सारखें वाटे व अशा वेळीं 'थोड्या वेळांत माझा प्राण जाणार' असें ते सर्वांना सांगत! पुढें साकोरी येथें एकदां प्रवचनांत महाराजांनीं या स्थितीविषयीं थोडें स्पष्टीकरण केलेलें आहे. ते म्हणाले, "मला हें सर्व समजत असे. जीव घाबरा होई व नंतर पाठीच्या कण्यांतून वायु डोक्यांत जाऊन तेथें स्थिर होतो न होतो तोंच परत येई. फुप्फुसांऐवजीं पोट वर-खालीं होत असे. ... ही व्याधि जडली यांत काय ईश्वरी नेमानेम आहे कळत नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं समजलें कीं, दोन वायूंचें ऐक्य होऊन नंतर सुषुम्ना चालू झाली. सुषुम्ना एकदां का चालू झाली म्हणजे तशीच रहाते. त्या वेळीं ती बनत होती. हठयोगी प्रयत्नानें ती बनवितात.

पूर्वजन्मींचा कांहीं योग असेल किंवा सर्व सत्पुरुष-महात्म्यांना कृपा करणें असेल, अगर त्यांना तेथें वास करणें असेल, म्हणून त्यांनीं आंतून प्रयत्न करून शरीरनाश न होऊं देतां, तशीच साध्यता करून दिली. आतां या शरिरांत तो पूर्वीचा जीव नाहीं; ते महात्मे वास करून आहेत. ”

यांतील शेवटचीं वाक्यें फार महत्त्वाचीं आहेत. “ मी म्हणजे ‘ कांहीं नाहीं ’ अशी स्थिति आहे. ज्या कोणा महात्म्यांना आपापल्या भक्तांचें वा अन्य कांहीं काम करावयाचें असतें ते या ठिकाणीं ( मांझ्या शरिरांत ) येऊन रहातात व काम झालें कीं निघून जातात ” असें महाराज पुढें वारंवार म्हणत. अशी ही विशिष्ट अवस्था येण्यासाठीं वरील काळांत सिद्धता चालू होती असें महाराजांच्या उद्गारांवरून स्पष्ट होतें.

डॉक्टर-वैद्यांचे उपचार व इतर उपाय करतां करतां धुळ्यास सुमारें एक वर्ष निघून गेलें, पण दुखण्याला उतार म्हणून पडेना. आतां अशा हालांनीं आपणांस मरणच येणार असें महाराजांना वाटूं लागलें, त्यांना तसे अनुभवहि येऊं लागले. आपल्या देहाहून आत्मा भिन्न – निराळा आहे, व मरण येतें म्हणजे काय अवस्था होते हें सर्व त्यांना दिसूं लागलें.

या ठिकाणीं महाराजांच्या लहानपणीं घडलेल्या दोन घटनांचा उल्लेख करणें जरूरीचें आहे. ते सटाण्यास रहात असतांना त्यांच्या घराशेजारीं रहाणारा एक धष्टपुष्ट माणूस कॉलऱ्यानें एकाएकीं मरण पावला. त्याचें प्रेत पाहून महाराजांना असें वाटलें कीं, ज्या शरिराची आपण इतकी काळजी घेतों तें जर आपल्या इच्छेविरुद्ध वाटेल तेव्हां नाश पावणारें आहे तर त्याला ( शरिराला ) खाऊं-पिऊं घालण्यांत काय अर्थ आहे ? तसेंच लहानपणींच एकदां महाराजांनीं देहाहून आत्मा निराळा आहे तो कसा हें पहाण्यासाठीं फिरत्या रहाटांत आपलें बोट घातलें व तें रक्तबंबाळ होईपर्यंत काढलें नाहीं. यावरून महाराजांच्या मनाची घडण कशी होत आली होती हें स्पष्ट होईल.

कांहीं दिवसांनीं एका ज्योतिष्याच्या सांगण्यावरून, महाराजांना बरें वाटावें म्हणून दुर्गाबाईंनीं औदुंबराचें एक रोप आणून अंगणांत लावलें व त्या अतिशय निष्ठेनें औदुंबराला प्रदक्षिणा घालूं लागल्या. कांहीं दिवसांनीं तें नवीन रोप उन्हानें करपून पार वाळून गेलें व त्याचा



दा. क. १०९५८

दुर्गाबाईंना मोठा धसका बसला. तथापि महाराजांच्या वचनावर पूर्ण विश्वास ठेवून दुर्गाबाईंनीं आपला नेम अगदीं निर्धारानें चालूच ठेवला. लवकरच त्या वाळलेल्या झाडाच्या मुळाशीं एक अंकुर दिसूं लागला व त्यानें दुर्गाबाईच्या आशेलाहि पालवी फुटली. त्यांचा विश्वास दुणावला व त्यांनीं आपला सव्वा लक्ष प्रदक्षिणांचा नेम पूर्ण केला. महाराज यांतून वांचतील असें त्यांना आतां वाटूं लागलें. पण प्रदक्षिणांच्या उपासनेनें खाणें, पिणें इत्यादि लौकिक गोष्टी सुटल्या व शरीर शुष्क होऊन गेलें. त्यांना त्या झाडाला आपण प्रदक्षिणा घालीतच आहोंत असें दृश्य जागेपणीं सतत दिसूं लागलें. महाराजांनीं सांगितलें कीं, हा एकनिष्ठेचा परिणाम आहे. मन सूक्ष्म शरिराच्या द्वारें प्रदक्षिणा घालीत आहे !

या परिस्थितींत गृहत्याग करून कोठेंतरी देह विसर्जन करावा व हा त्रास एकदांचा संपवावा अशा विचारांनीं महाराजांच्या मनांत एकदम उचल खाल्ली, आणि हवापालट करण्यास जातों अशी घरच्या माणसांची कशीतरी समजूत घालून ते शके १८३३ च्या चैत्र शुद्ध प्रतिपदेला ( ३१ मार्च १९११ ) चाळीसगांवाला येऊन पोहोंचले. हा महाराजांचा शेवटचा गृहत्याग होय. यानंतर महाराज कधींहि परत घरीं गेलेले नाहींत व सौ. दुर्गाबाईंनाहि यानंतर आपल्या पतिदेवाचें पुन्हां कधीं दर्शन झालेलें नाहीं.

♣ ♣ ♣

## शिर्डीस आगमन : ३

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

चाळीसगांवाहून औषधोपचार करण्यासाठीं पैठणास जाण्याचें ठरलें, परंतु ऐन वेळीं बेत बदलून त्यांनीं नगरचें तिकिट काढलें. रामनवमीच्या नवरात्रांत महाराजांनीं नगराला एका दत्तमंदिरांत मुक्काम केला व राहुरी येथें योगाभ्यास करणारे कुलकर्णी महाराज म्हणून कोणी योगी आहेत असें तेथें लोकांनीं सांगितल्यावरून ते राहुरीला आले.

कुलकर्णी महाराजांनीं उपासनी महाराजांना पहातांच सांगितलें कीं, "मी योगाचा अभ्यास करीत आहें व तुमचीं अभ्यास संपल्याचीं लक्षणें दिसत आहेत. हीं अवस्था आणण्यासाठीं शेंकडों योगी लोक प्रयत्न करीत असतात आणि तुम्हांला खटपट न करतां ही अवस्था कशी साध्य झाली याचेंच आश्चर्य वाटतें. ही कांहीं व्याधि नाहीं. याचा परिणाम पुढें फार चांगला होईल." कुलकर्णी यांनीं महाराजांना स्वतःच्या हातानें तेल लावून, गरम पाण्यानें स्नान घातलें व नंतर पुढें होणारी महाराजांची 'दिगंबर अवधूत' अवस्था जाणून महाराजांच्या पायांवर गंध-फुलें वाहून त्यांना नमस्कार केला. दुपारीं भोजनोत्तर "तुम्ही शिर्डीस गेलां होतां काय ?" असें कुलकर्णी यांनीं विचारलें असतां, "मला तें ठिकाण माहीत नाहीं" असें उत्तर महाराजांनीं दिलें. त्यावर कुलकर्णी म्हणाले, "तेथें सांईमहाराज हे अवलिया रहातात. त्यांच्याकडे गेल्यास पुष्कळ उपयोग होईल." परंतु सांईबाबा मुसलमान व आपण ब्राह्मण तेव्हां त्यांच्याकडे न गेलेलेंच बरें असें महाराजांना वाटूं लागलें.

राहुरीला महाराजांचा मुक्काम दोन-तीन दिवस होता. एकदां सायंकाळीं गांवाबाहेर काठी टेकीत टेकीत महाराज फिरत असतां त्यांना एक म्हातारा भेटला. महाराजांच्या प्रकृतीची हकीकत विचारून घेऊन तो त्यांना म्हणाला, "तुला कांहीं झालेलें नाहीं, नुसता वात आहे. ... नुसतें ऊन पाणी पीत जा; गार पाणी पिऊं नको. तहान लागल्यावर जितकें सोसवेल तितकें ऊन पाणी पीत जा. असा क्रम ठेव, म्हणजे जाईल सगळें." पण या त्याच्या बोलण्याचें महाराजांना तेव्हां अर्थातच कांहीं महत्त्व वाटलें नाहीं.

नंतर कुलकर्णी महाराज व त्यांचे एक मित्र यांच्या सहमतानें मोरगांव येथील योगी विनायक महाराज फाटक यांना भेटून प्रकृतीस कांहीं उपाय करावा असें ठरलें. जातांना जेजुरी येथील मोरोपंत बेलसरे यांच्या नांवाचें एक ओळखपत्र घेतलें, व बेलसरे यांच्या साहाय्यानें पुढें जावें असें ठरवून महाराज पुणें-मार्गानें आगगाडीनें जेजुरी स्टेशनावर येऊन उतरले. पण वाटेंत महाराजांचे विचार पुन्हां बदलले व ते एकान्तवासाकरितां निवान्त जागा शोधूं लागले. जेजुरी गांव बाजूला टाकून महाराज

पुढें जातात तों त्यांना तेथें निवडुंगाची एक बरीच मोठी जाळी व त्याच्या मध्यावर कांहीं मोकळी जागा दिसली. लगेच शक्य तितके दिवस येथेंच बसून रहावें व होईल तें होऊं द्यावें असें ठरवून महाराजांनीं तेथेंच मुक्काम ठोकला. चैत्राच्या उन्हांत ते त्या उघड्या जागीं आठ-दहा दिवस ( कदाचित् अधिकहि ) पडून राहिले. होतां होतां त्यांना सर्व बाह्य परिस्थितीची, देहाची सुद्धां जाणीव नाहींशी झाली व 'मी आहें' एवढेंच ज्ञान राहिलें. देहाची जाणीव नाहीं पण 'मी'पणाची आहे त्या अर्थी देहपात झाला कीं काय असेंहि त्यांना मधून मधून वाटे! या अवस्थेंत शारीरिक सुखदुःख कांहींच नसल्यानें त्यांत कष्ट नव्हते. पण ही अवस्था किंवा जगाची जाणीव असल्याची अवस्था या आळीपाळीनें यदृच्छेनें येत, महाराजांना आपल्या इच्छेनें त्यांत कांहीं बदल करतां येत नसे. असे कांहीं दिवस गेल्यावर महाराज एकदां सावध झाले असतां त्यांना भयंकर तहान लागली व म्हणून ते त्या जाळींतून खरडत खरडत बाहेर येऊन जवळच्या एका ओढ्यावर येऊन पोहोंचले. ते पाणी पिण्याचा विचार करीत आहेत तोंच राहुरीच्या वेशीबाहेर दिसलेला म्हातारा त्यांना समोर दिसूं लागला व तो रागानें म्हणाला, "तुला सांगितलें ना कीं तूं गार पाणी पिऊं नको, ऊन पाणी पिण्याचा नियम धर म्हणून!" त्यामुळें महाराजांनीं समोरचें पाणी पिण्याचा विचार बदलला व ते काठी टेकीत हळूहळू जेजुरी गांवांत चिंतोपंत बेलसरे यांच्या घरीं येऊन पोहोंचले. तेथें गेल्याबरोबर ऊन पाणी पिण्यासाठीं मागून घेतलें व तेथूनच ऊन पाणी पिण्याचा नियम सुरू झाला. तेथेंच प्रथम महाराजांना पहांटेच्या वेळीं थोडी झोप मिळूं लागली. दहा-पंधरा दिवसांनीं बैलगाडीनें ते मोरगांवास गेले, परंतु फाटक महाराज परगांवीं गेल्याचें समजल्यावरून त्यांनीं तेथील एका विठ्ठलमंदिरांत मुक्काम केला. या वेळीं महाराजांचें शरीर अत्यंत खंगलेलें असतांहि त्यांच्याबद्दल लोकांना पूज्य बुद्धि उत्पन्न होऊन लोक त्यांचा सन्मान करूं लागले. पुढें फाटक महाराज येत नाहींत असें पाहून महाराज केडगांवास येण्यास निघाले. वाटेंत सुपें येथील गांवकरी मंडळींनीं महाराजांना सात-आठ दिवस आग्रहानें ठेवून घेतलें व त्यांची उत्तम व्यवस्था ठेविली.

या ठिकाणीं घडलेल्या दोन गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. गांवाबाहेर पिराच्या दर्ग्यांत महाराज दर्शनाला गेले असतां बरोबर बरेच लोक होते. पिरासमोर वाहण्यास कापूर वगैरे कोणाजवळच नाहीं हें पहातांच समोर कोनाडे दिसतात त्यांत शोधा असें महाराज म्हणाले; तोंच एका कोनाड्यांत ऊद, नारळ, उदबत्ती वगैरे सामान खरोखरच सांपडलें. तेथून जवळच एका पेशवाईकालीन शिवालयांत ते दर्शनाला गेले, पण तेथें देवाजवळ पूर्ण अंधार असल्यानें देव कांहीं दृष्टीला पडेना. त्यामुळें महाराजांना वाईट वाटलें व देव पाहिल्याशिवाय कसें परतावें असें ते म्हणाले. इतक्यांत गाभाऱ्यांतला दिवा लागला, पण सर्वांचीं दर्शनें होतांच लगेच तो प्रकाश नाहींसा झाला! तथापि हे चमत्कार आपल्यामुळें होतात असें महाराजांनीं कधीं मानलें नाहीं; कारण त्यांचा अहंकार संपला होता. शेवटीं महाराजांचा जाण्याचा आग्रह पाहून मंडळींनीं त्यांची केडगांवास रवानगी करून दिली. पण केडगांवाला महाराज आले तेव्हां श्रीनारायण महाराज तेथें नसून मुंबईला गेले आहेत असें समजलें, म्हणून दुसऱ्या दिवशीं ते आगगाडीनें पुण्यास येऊन तेथून मुंबईला गेले व थेट अंजनीबाईच्या 'श्रीनारायणाश्रम' बंगल्यांत नारायण महाराजांच्या दर्शनासाठीं येऊन पोहोंचले.

तेथें एक-दोन खेपा झाल्यावर श्रीनारायण महाराजांची स्वस्थपणें गांठ पडली, पण तेव्हांहि ते म्हणाले, "मला बोलण्यास देखील वेळ नाहीं. सारखे लोक येत असतात; निवान्त वेळच नाहीं." इतक्यांत नारायण महाराजांनीं आपल्या चांदीच्या डबींतून एक विड्याची पट्टी काढली व 'ती माझ्यासमोर येथेंच खा' असें त्यांनीं महाराजांना सांगितलें. त्यांचा आग्रह पाहून महाराजांनींहि पट्टी तेथेंच खाल्ली. त्यांना नारायण महाराज म्हणाले, "आंत-बाहेर पूर्ण रंगून गेलेलें आहे. आतां तुम्हांलाहि कांहीं बोलण्याचें कारण राहिलें नाहीं व मलाहि नाहीं." दुसऱ्या दिवशीं पुन्हां महाराज दर्शनाला गेले तेव्हां नारायण महाराज म्हणाले, "तुमचें आतां येण्याचें कांहीं कारण मला दिसत नाहीं. तुमचें काम होऊन गेलें."

महाराज मुंबईहून निघाले ते थेट नगर येथें, राहुरीच्या कुलकर्णी महाराजांचे मित्र श्री. बाळासाहेब देशपांडे यांच्या घरीं आले. येथें

मुक्काम असतांना महाराज एकदां तिसऱ्या प्रहरीं बापू शहा नांवाचे प्रसिद्ध अवलिया तेथें असत, त्यांच्या दर्शनाला गेले. हे अवलिया कोणाशींहि कांहीं बोलत नसत; परंतु महाराज त्यांचें दर्शन घेऊन समोर उभे राहिले तेव्हां, थोडा वेळ महाराजांकडे पाहून ते त्यांना म्हणाले, "जाव"; त्यावर कोणीकडे जावें अशी महाराजांनीं पृच्छा करतांच ते म्हणाले, "... अभी कायको खडे हो ? किधर बी जाव. इधर जाव, उधर जाव, किधर बी जाव. सब दिसा तुमको खुले हैं. जाव, अब खडे मत रहो." या संभाषणाबाबत नंतर बाळासाहेब देशपांडे महाराजांना म्हणाले, "ज्या अर्थीं ते तुमच्याशीं बोलले, त्या अर्थीं तुमच्यांत कांहींतरी विशेष महत्त्व आहे."

नगराहून महाराज कुलकर्णी महाराजांना भेटण्यासाठीं राहुरीस गेले. तेथें त्यांना मोरगांव, सुपें, मुंबई इत्यादि ठिकाणची हकीकत सांगून, घरून निघाल्याला तीन महिने होत आल्यामुळें धुळ्याला घरीं जावें असा विचार महाराजांनीं केला. यावर कुलकर्णी महाराजांनीं सांगितलें कीं, "धुळ्यास जावयाचें तर जा, परंतु शिर्डीस जा." सांईबाबांची कीर्ति त्यांच्या कानावर पूर्वींहि आलेली असली तरी, ते मुसलमान असल्यानें आपल्यासारख्या कर्मठ ब्राह्मणानें त्यांच्याकडे कशाला जावें असा विचार वारंवार महाराजांच्या मनांत येत असे. शिवाय महाराजांच्या या भ्रमन्तींत ईश्वरी ज्ञान वा कोणाची कृपा मिळविण्याचा उद्देश मुळींच नसून, जमेल तर श्वासाच्या त्रासावर औषध-योजना करणें व जमेल तर देहत्याग करून सर्वच प्रकरण एकदांचें निकालीं काढणें असा उद्देश होता ! त्यामुळें या वेळींहि महाराजांचें मन द्विधा झालें. कुलकर्णी महाराजांचा निरोप घेऊन महाराज राहुरी स्टेशनावर आले व तिकीट काढावयास जाऊन उभे राहिले, तरी कोणत्या गांवचें तिकीट घ्यावें याबाबत त्यांचा कांहींच निश्चय होईना. शेवटीं एकदांचें शिर्डी रस्त्यावरच आहे तर तेथें जाऊन यावें असें ठरून महाराजांनीं तिकडे जाण्याकरितां चितळी स्टेशनाचें तिकीट काढलें व ते गाडींत बसले. हा शिर्डीस जाण्याचा निर्णय महाराजांनीं जेव्हां केला, किंबहुना त्यांच्याकडून हा निर्णय जेव्हां झाला, तो क्षण महाराजांच्या आयुष्यांत अत्यंत क्रांतिकारी ठरला. कारण या वेळीं ते जे शिर्डीला गेले ते कायमचेच शिर्डीचे-सांईबाबांचे होऊन बसले; इतके कीं

तेथून माघारीं जाण्याचा विचार करण्याचेंहि स्वातंत्र्य यानंतर त्यांना लाभलें नाहीं ! प्रथम ते हट्टानें एकदा शिर्डीहून निघून गेले; पण गुरु-वचनाप्रमाणें आठच दिवसांनीं त्यांना परत यावें लागलें.

शिर्डीला जाणारा रस्ता राहात्यावरून जातो. महाराज चितळी स्टेशनावर उतरले व राहात्याला जाण्याचें कोणतेंच साधन तेथें न मिळाल्यानें ते तेथेंच प्लॅटफॉर्मवर एका बाजूला भिंतीशीं टेकून पडून राहिले. ही स्थिति सतत दोन-तीन दिवस कायम होती व त्या अवधींत खाणें-पिणेंच नव्हे तर देहधर्महि बंदच होते. 'जसें असेल तसें' हें महाराजांच्या शिकवणींतलें एक प्रमुख तत्त्व आहे व त्याचा आचार महाराजांनीं अनेक वेळां करून दाखविला आहे. वरील प्रसंग हा त्यांपैकींच एक होता. येणारें दुःख धैर्यानें व हूं का चूं न करतां सोशीतच रहाणें हा महाराजांचा जणूं स्वभावच बनला होता. तिसऱ्या दिवशीं असिस्टंट स्टेशन मास्तर कोष्टी यांच्या बायकोनें आग्रहानें दिलेले थोडे दाणे व गूळ त्यांनीं घेतला व ते राहात्याकडे जाणाऱ्या बैलगाडींत बसले. त्या रात्रीं राहात्याच्या मुरलीधर-मंदिरांत त्यांनीं मुक्काम केला व जवळचे दाणे आणि शेजारच्या वृद्ध ब्राह्मण बिऱ्हाडकरूकडून घेतलेलें कढत पाणी यांवर त्यांनीं वेळ भागविली. त्या दिवशीं सोमवती अमावास्या होती. कुलकर्णी महाराजांच्या नादाला लागून आपण निष्कारण हा त्रास ओढवून घेतला असें त्यांना सारखें वाटतच होतें. दुसऱ्या दिवशीं पहांटेसच उठून, काठीच्या साहाय्यानें हळूहळू कष्टानें वाटचाल करीत, सकाळीं नऊ-दहा वाजण्याच्या बेताला ते शिर्डी गांवांत येऊन पोहोंचले. त्या दिवशीं शके १८३३ ची आषाढ शुद्ध प्रतिपदा ( २७ जून, १९११ ) होती. म्हणजे घरून चैत्री पाडव्याला निघाल्यापासून बरोबर तीन महिन्यांनीं महाराज आपल्या सद्गुरूंच्या चरणांजवळ येऊन दाखल झाले. या वेळीं महाराजांना बेचाळिसावें वर्ष सुरू होतें.

गांवांत शिरतांना प्रथम सांईभक्त श्रीदासगणू महाराज यांची गांठ पडली व त्यांच्या सांगण्यावरून महाराज दीक्षितांच्या वाड्यांत उतरले. थोड्या वेळानें सांईबाबा मशिदींतून लेंडीकडे जावयास निघाले तेव्हां, इतरांच्याबरोबरच रस्त्यावर सांईबाबांच्या पायांवर डोकें

ठेवून यांनींहि दर्शन घेतलें. पुन्हां दुपारीं पूजा-आरती होऊन सर्वांनीं सांईबाबांचें दर्शन घेतलें व सर्वांना सांईबाबांनीं उदीचा प्रसाद दिला. त्याप्रमाणें महाराजांनीं दर्शन घेतल्यावर त्यांनाहि उदी मिळाली. दुपारीं जेवणखाण झाल्यावर महाराजांनीं परत घरीं जाण्याचा विचार केला व तेथील रीतीप्रमाणें ते सांईबाबांची परवानगी मागण्यासाठीं मशिदींत गेले. पण सांईबाबांनीं "कशाला जातोस? जाऊन बैस वाड्यांत," असें सांगतांच महाराजांना कांहीं तें बरें वाटलें नाहीं. त्यांनीं फिरून जाण्याबद्दल विनंती केल्यावर सांईबाबा म्हणाले, "बरें जातोस तर जा, पण आठ दिवसांनीं परत ये." परंतु महाराजांनीं खुलासा केला कीं, आपण म्हणतां तर परत येईन, पण आठ दिवसांतच येईन अशी खात्री नाहीं. त्यावर सांईबाबा रागानें म्हणाले, "काय तुझें मन घोटाळ्यांत पडलें आहे? जावयाचें तर जा, मला जसें पहावयाचें तसें पाहून घेईन!" ही पडत्या फळाची आज्ञा घेऊन दुपारीं महाराज शिर्डी सोडून राहात्याला निघून गेले.

राहात्याहून दुसऱ्या दिवशीं चितळी स्टेशनावर आल्यावर घरीं जाण्याचा विचार बदलून, पुणतांबें ही पुण्यभूमि असल्यानें तेथें गोदावरीचें स्नान करून यावें असें ठरवून ते पुणतांब्याला गेले. तेथून दोन दिवसांनीं कोपरगांवाला कोणी एक ब्रह्मचारी आहेत असें समजल्यावरून त्यांच्या दर्शनाला गेले. दर्शन वगैरे झाल्यावर बोलतां बोलतां ब्रह्मचारीबुवा महाराजांना म्हणाले, "तुम्ही शिर्डीला गेला होतां, पण गेल्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं, तर पुन्हां जा." यावर महाराजांनीं 'माझें तेथें कांहीं काम नाहीं' असें सांगतांच ब्रह्मचारीबुवा म्हणाले, "तरी पण तुम्ही एकदां पुन्हां जावें असें माझें मत आहे." यावर 'बरें पाहूं' एवढेंच बोलून महाराज उठले व शेजारच्या दत्तमंदिरांत दर्शनाला गेले. दोन-तीन दिवसांनीं गांवाच्या बाहेर फिरत असतांना त्यांना सडकेला लागून एक छोटें पण निवान्त असें खंडोबाचें देऊळ आढळलें. एकान्तांत बसण्यास ती जागा सोयिस्कर आहे असें पहातांच ते तीन-चार दिवस अन्नपाण्याशिवाय तेथेंच पडून राहिले. नंतर एक दिवस भूक लागली म्हणून भिक्षा मागण्याच्या विचारानें ते बाहेर पडले. स्नान करून दत्तमंदिराकडे येतात तों तेथें त्या ब्रह्मचारीबुवांची गांठ पडली. अजूनहि महाराज पुन्हां शिर्डीला गेले

नाहींत हें कळतांच बुवांनीं पुन्हां सांगितलें, " जावयाला पाहिजे होतें तुम्हीं जावें हें चांगलें. "

इतक्यांत विंचूरची कांहीं मंडळी टांग्यांतून शिर्डीला जाण्याकरितां तेथें आली. त्यांच्याबरोबर महाराजांनींहि जावें म्हणून बुवा त्यांना आग्रह करूं लागले व ती मंडळीहि त्यांना माहीतगार म्हणून बोलावूं लागली. परंतु महाराजांनीं कांहीं कारणें सांगून त्यांना नकार दिला. तथापि शेवटीं हो-ना करतां करतां महाराजांना त्या मंडळींनीं तसेंच टांग्यांत बसविलें व तीन वाजण्याच्या सुमारास टांगा शिर्डीस पोहोंचला. महाराजांनीं मशिदींत जाऊन सांईबाबांचें दर्शन घेतलें व ते बाजूला उभे राहिले तेव्हां बाबांनीं विचारलें, " येथून तुला गेल्याला आज कितवा दिवस आहे ? " महाराजांनीं हिशेब करून पाहिला, तर तो बरोबर आठवाच दिवस होता ! सांईबाबांची ही लीला पाहून महाराजांना मोठा चमत्कार वाटला व आतां बाबा सांगतील त्याप्रमाणेंच वागावयाचें असें त्यांनीं मनाशीं ठरवूनहि टाकलें. यानंतर ओळीनें चार वर्षें महाराज शिर्डीला होते.

शिर्डी येथील महाराजांच्या वास्तव्यांत अनेक लहानमोठ्या गोष्टी घडल्या. तथापि सांईबाबांची आज्ञा सर्वतोपरी प्रमाण मानून त्याप्रमाणें वागणें हेंच महाराजांचें धोरण असे. या काळांत सांईबाबांच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं महाराजांनीं खंडोबाच्या देवळांत बसून रहाण्याचें जें अत्यंत खडतर तपाचरण केलें त्याला मात्र तोड नाहीं. साधुसंतांच्या चरित्रांतहि क्वचितच असें उदाहरण सांपडेल.

समोर भक्त-मंडळी बसली असतां संदिग्धपणें बोलावयाचें व ज्याच्यासंबंधीं तें असेल त्याला तें अचूक समजावयाचें अशी सांईबाबांची बोलण्याची विलक्षण रीत असे. एकदां बाबा म्हणाले, " आसन-प्राणायाम करणारे लोक त्यांतच बुडतात. माझ्याजवळील कळा कांही न्यारीच आहे. " त्यावर कोणीं विचारलें कीं, तुमच्याजवळील कळा कोणाला माहीत होईल का ? कीं ती तशीच रहाणार ? बाबांनीं उत्तर दिलें, " असें नाहीं. ज्याला मिळावयाची त्याला मिळून जाईल. " हें बोलणें अर्थातच महाराजांबद्दलचें होतें, परंतु त्या वेळीं तसें कोणाला वाटणें

संभवनीय नव्हतें. कारण महाराजांवर सांईबाबांचें विशेष लक्ष आहे ही गोष्ट अद्याप कोणाला ठाऊक नव्हती.

एकदां बाबांनीं दक्षिणा मागितल्यावरून महाराजांनीं आपल्याजवळचा सर्वांत काळा-हिरवा झालेला एक रुपया सांईबाबांना दिला; तो सर्वांना दाखवून ' किती जन्मांचा कळकटलेला रुपया ' मला यांनीं दिला असें बाबा म्हणाले. नंतर त्या गोष्टीची रुखरुख वाटून महाराजांनीं एक अगदीं स्वच्छ रुपया बाबांना दिला व नंतर बाबांच्या सांगण्याप्रमाणें उरलेले सर्व पैसे – चिल्लरसुद्धां – बाबांना देऊन टाकले. त्यावर बाबांनीं ते पैसे समोरच्या भक्तमंडळींना दाखविले व ते म्हणाले, " यांनीं आपल्याजवळचें सर्व – जें कांहीं होतें-नव्हतें तें – मला देऊन टाकलें. "

गांवाबाहेर पडून एकान्ताची जागा पहात रहाण्याच्या स्वभावामुळें महाराजांना लवकरच राहात्याच्या रस्त्यावर, शिर्डी गांवाच्या बाहेर, पण वेशीजवळच असलेल्या खंडोबाच्या छोट्या देवळाची माहिती झाली व देवळाच्या मालकाच्या ( म्हाळसापति ) परवानगीनें ते तेथें एकान्तासाठीं वारंवार बसूं लागले. ' ईश्वरासंबंधीं विचार करण्यास ही जागा सोयीची दिसते ' असें प्रारंभीं महाराज या जागेबद्दल म्हणाले होते. पुढें चार वर्षांच्या अवधींत महाराजांना येथें जे अलौकिक व श्रेष्ठ पारमार्थिक अनुभव आले त्यांवरून त्यांची जागेची निवड योग्यच होती असें ठरलें. आरंभींच्या काळांत त्यांची बैठक काकासाहेबांच्या वाड्यांत असे व वेळ सांपडला कीं ते खंडोबाच्या देवळांत जाऊन बसत. पुढें पुढें देऊळ हीच त्यांच्या कायम बैठकीची जागा झाली व तेथेंच त्यांनीं चार वर्षें रात्रंदिवस वास्तव्य केलें.

आरंभीं महाराज खाणावळींत जेवीत, पण जवळचे पैसे संपले व घरीं जाण्याची परवानगी तर मिळेना, तेव्हां ते रोज फक्त बाजरीची भाकरी व चटणी असा आहार घेऊं लागले. पण यामुळें त्यांना उष्णता होऊन शौचावाटे रक्त पडूं लागलें. त्याच वेळीं महाराजांबद्दल पोलिसांना कांहीं संशय उत्पन्न होऊन ते तेथें आले व महाराजांची बारीकसारीक माहितीहि विचारूं लागले. त्यामुळें महाराजांना वाटलें कीं, ही काय नसती पंचाईत आली. पुढें एकदां सांईबाबांनीं विचारल्यावरून

महाराजांनीं आपली भीति त्यांना सांगितली. तेव्हां बाबा म्हणाले, “ कांहीं घाबरूं नकोस. मी तुझ्याजवळ असल्यावर कशाला घाबरतोस ? ” इतकें आश्वासन मिळाल्यावर महाराजांनाहि खूप धीर आला आणि पुन्हां पोलिस व मामलेदार चौकशीला आले, तेव्हां महाराजांनीं धिटाईनें व आपल्या तर्कशुद्ध बोलण्यानें पोलिसांना निरुत्तर करून वाटेला लावलें. यानंतर त्यांना पोलिसांकडून कधींहि त्रास झाला नाहीं.

♣ ♣ ♣

## महाराजांचा ‘निकाल’ झाला! : ४

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

साईबाबांच्या रोजच्या संदिग्ध बोलण्यांत महाराजांच्या चरित्रांतील गतगोष्टींचा आडवळणानें वारंवार उल्लेख होऊं लागला व तें महाराजांच्या लक्षांतहि येऊं लागलें. एकदां बाबा म्हणाले, “ मी कोठें प्रवासांत जात होतों. जातां जातां मला एक गरोदर बाई भेटली. तिचें पोट खूप मोठें होतें. हातापायांच्या काड्या झालेल्या होत्या ... मी तिला म्हणालों, ‘ मला तर तूं इतक्या दिवसांची गरोदर दिसतेस कीं, कितीतरी वर्षें तुझ्या या गर्भारपणाला झालीं. अजून तूं बाळंतीण कशी होत नाहींस ? ... बरें, झालें तें झालें; आतां ऊन पाणी पिण्याचा नियम धर म्हणजे या गरोदरपणांतून तुझी सुटका होईल. ’ तरी ती एका ओढ्यावर पाणी प्यायला गेलीच. पुन्हां जवळ जाऊन मी तिला म्हणालों, ‘ अग ए बाई, तुला थंड पाणी पिऊं नको म्हणून सांगितलें ना ? ... गांवांत कोण्या एखाद्याच्या घरीं जा व कोणाच्या येथें तरी जाऊन ऊन पाणी पी. ’ तेव्हां-पासून ती ऊन पाणी पिऊं लागली. आतां बरें आहे. ” इतकें स्पष्ट बोलल्यावर राहुरी व जेजुरी येथें आपल्याला ऊन पाणी पिण्याचा उपाय सुचविणारा म्हातारा म्हणजे कोण हें महाराज मनांतल्या मनांत समजून चुकले ! याच बोलण्यांत शेवटीं बाबा म्हणाले कीं, “ हा वाताचा खेळ आहे. पोटाचें आतडें एकावर एक चढून गेलें म्हणजे असें होत असतें. ”

असल्या प्रत्यय देणाऱ्या बोलण्यानें महाराजांना सांईबाबांच्याबद्दल विशेष प्रेम वाटूं लागलें. एकदां बोलतां बोलतां सांईबाबा त्यांना म्हणाले, " अरे, तुझ्या वाडवडिलांचा आणि आमचा शेंकडों वर्षांचा ऋणानुबंध आहे. त्यामुळें तुझ्यांत व माझ्यांत कांहीं फरक दिसत नाहीं. " अशा गोष्टी निघाल्या कीं, महाराजांना मशिदींत सर्वांसमक्ष रडावयास येत असे. दुसऱ्या एका प्रसंगीं महाराजांकडे पाहून थोडें रागावल्यासारखा देखावा करून उजवा हात स्वतःच्या डोक्याच्या मागें मधोमध धरून सांईबाबा मोठ्या सपाट्यानें म्हणाले, " तुझें अर्धें डोकें मी घेतों व माझें अर्धें तुला देतों ! "

माधवराव देशपांडे नांवाचे सांईबाबांचे एक भक्त होते व ते बाबांशीं विशेष सलगीनें वागत असत. त्यांच्याकडून सांईबाबांना सांगवून, घरीं जाण्यासाठीं त्यांची परवानगी मिळविण्याची खटपट महाराजांनीं चालू केली; पण या खटपटीला मुळींच यश येईना. माधवरावांनीं महाराजांच्या घरीं जाण्याचा प्रश्न काढतांच सांईबाबांनीं म्हणावें, " मला सगळ्यांचा हिशेब पहावा लागतो. याचाहि हिशेब नाना आल्यावर पाहूं. नंतर एकदां पायापाशीं समोर बसलेल्या महाराजांना ते म्हणाले, " तीन दिवस उपास कर. चौथ्या दिवशीं भाकर खा. मग तुझा हिशेब पाहूं. नंतर मला तुला जें सांगावयाचें असेल तें सांगेन. " बाबांच्या शब्दावर आतां पूर्ण श्रद्धा बसल्यामुळें महाराजांनीं खरोखर तीन दिवस उपवास केला व चौथ्या दिवशीं एकादशी असतांहि, बाबांची आज्ञा म्हणून समोर आलेल्या भाकरीनेंच उपासाचें पारणें केलें ! पुढें नानासाहेब चांदोरकरहि आले आणि गेले, तरीहि महाराजांचा हिशेब होण्याचें कांहीं लक्षण दिसेना. त्याबाबत माधवरावांनीं ( यांना सांईबाबा 'शामा' म्हणत ) पुन्हां विचारल्यावर सांईबाबा प्रसन्न मुद्रेनें म्हणाले, " अरे शामा, पहा आतां मी याच्यासंबंधानें काय बोलतों, तें नीट लक्ष देऊन ऐक. याला दीड वर्ष, नाहीं नाहीं चार वर्षें येथें रहावयाचें आहे. चार वर्षें झालीं म्हणजे याला म्हाळसापति पावणार ! याचा एकंदर हिशेब सगळा झाला. " माधवरावांनीं विचारलें, " देवा, यांना का आतां चार वर्षें ठेवणार येथें ? " तेव्हां सांईबाबा म्हणाले, " हो हो, चार

वर्षे उगें-मुगें विठोबाच्या देवळांत ( खंडोबाच्या देवळास बाबा 'विठोबाचें देऊळ' म्हणत ) बसून रहावें. कोणाच्या भानगडींत पडूं नये. याचें पुढें फार चांगलें व्हावयाचें आहे. याच्यासारखें कोणाचेंच नाहीं. सगळी दुनिया एकीकडे व हा एकीकडे. दादाकडे पिठलें-भाकर खावी व विठोबाच्या देवळांत उगें-मुगें बसून रहावें. मला जें करावयाचें तें करून देईन." सांईबाबांचा हा खणखणीत व तितकाच अनपेक्षित हिशेब ऐकून महाराजांचें मन बावरून गेलें व खालीं मान घालून ते ढळढळां रडूं लागले ! माधवराव त्यांना म्हणाले, " झाला बुवा तुमचा निकाल ! "

महाराजांवरील सांईबाबांचें प्रेम जसजसें प्रकट होत गेलें, तसतसें कांहीं अज्ञानी मंडळी महाराजांचा द्वेषहि करूं लागली होती. सांईबाबांनीं महाराजांच्या योग्यतेसंबंधीं वर दिलेले उद्गार काढले ते पुष्कळांना अर्थातच आवडले नाहींत. त्यांच्यापैकीं मुंबईचे एक भक्त एकदम म्हणाले, " बाबा, हें काय ? ... त्यांना तुम्ही चार वर्षांत आपली पूर्ण कृपा करण्याचें आश्वासन देतां – आम्हीं काय आपल्या पायापाशीं इतके दिवस फुकट घालविले ? यांच्यावर पूर्ण कृपा केल्याबद्दल त्यांना ताम्रपट लिहून देतां काय ? " एवढें ऐकल्याबरोबर प्रश्न विचारणाऱ्या गृहस्थांकडे पहात बाबा जोरानें म्हणाले, " अरे, मी बोलतों तें खोटें समजतोस काय ? ही मशीद खोट्याची आहे काय ? अरे, मी जें बोललों तें बोललों. माझ्याजवळ व माझें जें कांहीं असेल-नसेल, तें सर्वस्व मीं याला देऊन टाकलें. ताम्रपट लिहून देतां काय असें तूं विचारतोस, परंतु मी त्याला सोन्याच्या पत्र्यावर लिहून दिलें, समजलास ? आतां काय बोलावयाचें तें बोल ? " थोडें बोलणें होऊन पुन्हां बाबा महाराजांना म्हणाले, " जसें शुद्ध सोनें तसा तूं, जेथें बसला तेथें सांईमौला. " एवढी महत्त्वाची बाजू आपल्याला नको असें म्हणून महाराजांनीं बाबांकडे घरीं जाण्याची परवानगी मागितली. त्यावर बाबांनीं उत्तर दिलें, " अरे, तूं आतां कोणत्याच गोष्टीचा विचार करूं नकोस. तुझा अधिकार काय आहे तो मीं पुरतेपणीं जाणून ठेविला आहे. मीं पुष्कळ वर्षांपासून तुझ्या मागें आहें ... माझ्या हृदयांत मी तुझा ध्यास करीत आहें. आतां कोठें जावयाचें व कोठें यावयाचें ! इतकें करूनहि तुझ्यानें नाहीं झालें तर तूं कांहीं करूं नकोस. ( आपल्या छातीला हात लावून व

ती ठोकून ) मी स्वतः बरोबर येऊन तुला तिकीट काढून देईन. माझ्या हातानें मी तुला गाडींत बसवून देईन आणि कोठेंहि ती गाडी थांबूं न देतां एकदम थेट ठिकाणावर मला जेथें पोहोंचवावयाचें तेथें पोहोंचवून देईन. पुन्हां मुंबईवाल्या भक्तानें शंका काढली त्यावर बाबा म्हणाले, " हो, हो. सर्वस्व देऊन टाकलें. तो कसाहि असला तरी माझा आहे. त्याच्यांत-माझ्यांत फरक नाहीं. त्याची सर्व जोखीम माझ्यावर आहे. "

सांईबाबा या वेळीं जें जें बोलले त्या अमृतमयी वाणींतील शब्दन् शब्द, अक्षरन् अक्षर त्यांनीं लवकरच खरें करून दाखविलें; महाराजांना कांहीं कालानंतर सांईबाबांच्या कृपेनें खरोखरीच पूर्ण परब्रह्म अवस्था प्राप्त झाली. धन्य ते सद्गुरु आणि धन्य ते सत्शिष्य.

चार वर्षें शिर्डीलाच रहावें लागणार हें पक्कें समजल्यावर महाराजांनीं सौ. दुर्गाबाईना शिर्डीला बोलावून घेण्याबद्दल सांईबाबांची परवानगी मागितली, पण ती मिळाली नाहीं. लवकरच मेधा नांवाच्या एका सांईभक्त ब्राह्मणाच्या सांगण्याप्रमाणें व स्वतः बाबांनींहि सुचविल्या-वरून, खाणावळींतलें जेवण बंद करून महाराज दादा केळकरांकडे रोज जेवावयास जाऊं लागले. सुमारें महिन्याभरानें, आपणाकरितां दादांना त्रास वाटतो असें समजल्यानें महाराजांनीं तेथील जेवण बंद केलें व दादा किंवा अन्य कोणी शिधा आणून देत त्याचीच भाकरी व आणखी कांहीं बनवून देवळांतच खाऊं लागले. फक्त सांईबाबांच्या आरतीच्या वेळीं मशिदींत जाऊन दर्शन करावें व बाकीचा सर्व वेळ खंडोबाच्या देवळांत बसून ईश्वरचिंतन करावें असा कार्यक्रम सुरू झाला. महाराजांच्याबरोबर गो. क. दीक्षित नांवाचे एक गृहस्थ त्या वेळीं रहात असत. एकदां दोघांनीं स्वयंपाक केल्यावर महाराज नैवेद्य घेऊन सांईबाबांकडे मशिदींत गेले. जातांना, बराच वेळपर्यंत स्वयंपाकाच्या आसपास घुटमळणाऱ्या कुत्र्याला कांहीं न देतां ते नैवेद्य घेऊन गेले. बाबांचें जेवणखाण झालें होतें. ते म्हणाले कीं, "इकडे नैवेद्य कशाला आणलास, मी तर तेथेंच बसलों होतों." महाराज म्हणाले, "तेथें फक्त एक कुत्रें मात्र होतें." त्यावर बाबांनीं उत्तर दिलें, " मीच तर:तो होतों !" पुन्हां एकदां अशाच तऱ्हेचा अनुभव

आल्यावर महाराज चकित झाले असतां बाबा म्हणाले, “मी तर भरून-पुरून उरलों आहें. तूं जिकडे पहाशील तिकडे मीच तर आहें!” या प्रसंगानंतर महाराजांचें विचारचक्र सर्वच बदलत गेलें. सर्व जग, सांईबाबा व महाराज या तिघांचें तादात्म्य कसें आहे याचा अनुभव महाराजांना अनेक प्रकारांनीं येऊं लागला.

शिधा आणून देवळांत स्वयंपाक करण्याचा क्रम दोन-तीन महिनेच चालू होता. पुढें काकासाहेब दीक्षितांच्या सांगण्यावरून व साईबाबांनींहि सूचना केल्यावरून महाराज व गो. क. दीक्षित दोघेहि काकासाहेब दीक्षितांच्या घरीं रोज जेवावयास जाऊं लागले. हा कार्यक्रम सुमारें दोन महिने चालला, व मग एक दिवस इतर मंडळींबरोबर महाराज पानावर बसणार इतक्यांत काकासाहेबांचें आलेलें एक कार्ड माधवराव देशपांड्यांनीं वाचून दाखविलें; त्यांत महाराजांनीं व दीक्षितांनीं यापुढें वाड्यांत जेवणासाठीं येऊं नये असें सुचविलें होतें! तें ऐकून महाराजांना अत्यंत वाईट वाटलें व असें जर होतें तर आम्हांस बोलावलेंच कशाला, असेंहि माधवरावांना त्यांनीं विचारलें. तसेंच पात्र टाकून ते उठले व तडक खंडोबाच्या देवळांत जाऊन बसले. त्याच वेळीं निश्चय केला कीं, ‘अन्नाचा संबंध नको; त्यामुळें पराधीनता येते. देह गेला तरी पत्करला, पण आतां खावयाचेंच नाहीं.’ या प्रसंगानें महाराजांचें जेवणखाण पूर्णपणें बंद झालें; यापुढें कांहीं वर्षें महाराज कोणत्याहि प्रकारच्या अन्नाशिवाय कसे जगूं शकले हें एक सांईबाबांना माहीत का देवाला माहीत.

याच काळांत एक महत्त्वाची गोष्ट घडली, ती म्हणजे अमरावतीचे श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांनीं महाराजांना मुकुंदराजकृत ‘परमामृत’ आणि विद्यारण्यस्वामींची ‘पंचदशी’ दे दोनहि ग्रंथ समजावून दिले. दादासाहेब हे सांईभक्त असल्यामुळें मधून मधून शिर्डीला रहावयास येत असत व बाबांनीं परत जाण्यास परवानगी देईपर्यंत त्यांचा मुक्काम शिर्डीला असे; मग कितीहि दिवस मुक्काम करावा लागो. त्यांना वेदान्तविषयाचा फार नाद असल्यामुळें शिर्डीला मोकळ्या वेळांत त्यांना वेदान्तासंबंधीं कांहीं वाचन-विचार करावा असें वाटूं लागलें, व पूर्वीच अमरावतीस त्यांच्या ओळखीचे झालेले शास्त्रीबुवा – म्हणजे महाराज – यांना त्यासाठीं ते आपल्याकडे

बोलावूं लागले. दादासाहेबांनीं पुष्कळ सांगावें पण महाराजांना त्यांतलें अक्षरहि समजूं नये, व त्याचें दुःख वाटून महाराजांच्या डोळ्यांना पाणी यावें असा प्रकार वारंवार होई. दादासाहेबांनीं महाराजांना सांगितलें कीं, साईमहाराजांची तुमच्यावर कृपा आहे, तर तुम्हीं हें ऐकून ठेवा, तें वाया जाणार नाहीं. त्यावर महाराज म्हणाले, " ते ( साईबाबा ) केवळ परब्रह्म आहेत ... मला कांहीं ज्ञान नाहीं ... अशा स्थितींत साईबाबांसारख्यांची कृपा होणें अशक्य आहे. आणि जरी तसें असलें तरी, मला ती परमेश्वरी कृपेची किंवा जी काय असेल ती अवस्था नको आहे. " हें ऐकल्यावर दादासाहेबांनीं हंसून म्हणावें कीं, नको म्हटलेंत तरी आतां तुमच्या पाठीमागें बळें होऊन ब्रह्म लागलें आहे. ... तुमच्या द्वारानें शेकडों-हजारों जणांना उपयोग होणें असेल, म्हणून साईमहाराजांनीं ती योजना केली असेल. शेवटीं दादासाहेबांच्या इच्छेला मान देऊन महाराजांनीं ऐकण्याचें कबूल केलें व 'परमामृत' हा मराठी ओवीबद्ध ग्रंथ वाचूनहि झाला. या वाचनाबद्दल स्वतःसंबंधीं महाराजांनीं 'पालथ्या घड्यावर पाणी' असें वर्णन केलें आहे ! अशा स्थितींतच दादासाहेबांनीं 'पंचदशी' हा वेदान्तपर उत्कृष्ट संस्कृत ग्रंथ वाचण्यास सुरुवात केली. 'मला यांतलें एक अक्षरहि कळत नाहीं' असें महाराज म्हणतच होते व 'हें ऐकलेलें केव्हां फुकट जात नाहीं. पुढें केव्हांतरी याचा परिणाम होईल' असें महाराजांचें समाधान करीत दादासाहेब त्यांना शिकवीतच होते.

पंचदशीचें वाचन चालू असतांनाच, महाराजांच्या धर्मपत्नी सौ. दुर्गाबाई या माघ शुद्ध एकादशी, मंगळवार, शके १८३३ ( ३० जानेवारी १९१२ ) या दिवशीं कैलासवासी झाल्या. थोडे दिवस अगोदर त्या आजारी पडल्याचें पत्र आलें, तेव्हांच महाराजांनीं घरीं जाण्यासाठीं बाबांची परवानगी मागितली. तेव्हां बाबा म्हणाले, " तूं जाऊन काय करतोस ? तुझ्याच्याने तांब्या तर उचलेना ! उगा-मुगा बैस आपला झालें. " पुन्हां पुन्हां विचारूनहि घरीं जाण्यास परवानगी न मिळाल्यानें महाराज फार कष्टी झाले. पत्नीच्या निधनाची बातमी आल्यावर तर महाराजांची उदासीनता फारच वाढली. आपलें सांत्वन करणाऱ्या माधवराव देशपांड्यांना महाराज म्हणाले, " साईबाबा, चार वर्षांनीं तुला खंडोबा पावेल वगैरे

म्हणाले, परंतु मी आतां एकटा राहिलों. मला आतां तो देव पावून तरी काय करावयाचें आहे ? मला परवानगी देववाना ? " एक-दोन दिवसांनीं पुन्हां परत विषय काढून देशपांडे यांनीं परवानगी मागितली, तेव्हां बाबा म्हणाले, " अरे, ती जव्हारची होती, ती माझ्याजवळच तर आलेली आहे. त्याचें मीं काय वाईट केलें ? " येथें हा विषयहि संपला, आणि त्याबरोबर महाराजांचा संसारहि कायमचाच संपला.

नंतर एकदां महाराज सांईबाबांना म्हणाले, " या देहाचें सार्थक व्हावें एवढेंच मागणें आहे. " त्यावर सांईबाबांनीं उत्तर केलें, " देहाचें काय सार्थक व्हावयाचें ? तो तर मातींत जावयाचा आहे; ज्याचें सार्थक व्हावयाचें तें तर होऊन राहिलें आहे ! " त्यावर महाराजांनीं ' आतां फक्त तुमची कृपा पाहिजे ' अशी विनंती केली असतां सांईबाबांनीं सांगितलें, " अरे कृपा कृपा काय ? तूं तर वरपांगी बोलत असशील ! पण मी बेंबीच्या देठापासून बोलून राहिलों आहें कीं, तुझ्यावर पूर्ण कृपा झाली आहे. पण पहा रे ! मी असा वेडा-वांकडा, जिथें बसला तिथें सांई-मौला ! " कांहीं वेळानें सांईबाबा म्हणाले, " अरे, तुला जें नको तें सर्व मी घेऊन राहिलों. आणि तुला व मला जें पाहिजे तेंच तर देऊन राहिलों. तुझ्याबद्दल सर्व प्रकारांनीं माझ्यावर जबाबदारी आहे. ... मी तुला चवाठ्यावर आणून बसवीन. तूं कशाचाच विचार करूं नकोस. सगळी दुनिया एकीकडे व तूं एकीकडे अशी तुझी योग्यता आहे. " एकदां दुपारचे सांईबाबा एकटेच खंडोबाच्या देवळांत आले असें महाराजांना समजल्यावरून, ते दीक्षितांकडे जेवण अर्धवट टाकून पळतच तेथें आले. तेव्हां बाबा म्हणाले, " तुझ्या ठिकाणीं कांहीं काम होतें म्हणून आलों. मला काय करावयाचें तें करून टाकलें. चल आतां माझ्याबरोबर मशिदींत. " तेथें सांईबाबांनीं त्यांना सांगितलें, " तुझ्या हातून पिंपळाचीं चौदा झाडें लागावयाचीं आहेत, तीं पिंपळाचीं झाडें तूं लाव. " महाराज म्हणाले, " बाबा, हें काय मला समजत नाहीं. " त्यांवर बाबांनीं उत्तर दिलें, " पुढें आपोआप समजेल. " ते पुढें म्हणाले, " आम्ही कधीं कधीं तुझ्याकडे आलों तर तंबाखू, चिलीम कांहींतरी देत जा. तंबाखू जाळीत जावी. तितकें लोकांचें पाप जळत असतें. "

एकदां पंचदशीचें वाचन संपवून महाराज देवळांत परत जात असतांना, लेंडीकडून मशिदीकडे चाललेल्या सांईबाबांनीं त्यांना पाहिलें व जवळ बोलावून, "तुझ्याजवळ कशाचें पंचांग आहे तें पाहूं" असें त्यांना म्हणाले. पुस्तक सांईबाबांच्या हातांत देत महाराज म्हणाले, "बाबा हें पंचांग नव्हे, पंचदशी नांवाचा ग्रंथ आहे." यावर सांईबाबा मोठ्या विनोदानें हंसत हंसत म्हणाले, "अरे, हो हो, मला माहीत आहे. तूं तर आत्तांच पहात आहेस, मी तर पूर्वीपासून पहात आहें. पंचदशी काय व पंचांग काय एकच!" नंतर पुस्तक उलटें हातांत धरून पानें चाळतां चाळतां बाबा म्हणाले, "अरे, आपल्याला जें पाहिजे तें सर्व यांतच आहे बरें!" पुढें म्हणाले, "अरे, कळावयाचें काय! आपल्यास कळून घेण्याचें एवढें फातरूक असतें. सगळेंच कांहीं उपयोगाचें नसतें. आपल्या उपयोगाचें एवढेंसें आहे." – असें म्हणून बोटाचें एक कांडें आंगठ्यावर ठेवून दाखविलें व म्हणाले, "येथून आतां सर्व कळेल." एवढें बोलणें झाल्यावर महाराजांनीं सांईबाबांच्या पायांवर डोकें ठेवलें व सांईबाबांनींहि महाराजांच्या डोक्यावर हात ठेवले. ही सर्व हकीकत महाराजांकडून खापर्ड्यांना समजली, तेव्हां ते म्हणाले, "बाबांच्या म्हणण्याप्रमाणें तुम्हांला आतां पुस्तक जवळ असो अगर नसो, सर्वच कांहीं कळेल." आणि खरोखर यानंतर लवकरच महाराजांना अतींद्रिय ज्ञान होण्यास प्रारंभ झाला.

♣ ♣ ♣

## अतींद्रिय दिव्य ज्ञानलाभ : ५

* * * * * * * * * * * *

एकदां अंधाऱ्या रात्रीं बारा वाजण्याच्या सुमारास थंडीच्या दिवसांत महाराज तोंडावरून पांघरूण घेऊन देवळांत पडले होते; झोंप येत नसल्यानें जागेच होते. इतक्यांत त्यांच्या मस्तकावर एक डोळा उघडला व त्या डोळ्यांतून त्यांना असें दिसलें कीं आपण बाहेर मोकळ्या जागेंत

उभे असून वर आकाशाकडे पहात आहेत! हळूहळू त्या आकाशाला मध्येंच एक भोंक पडलें व क्रमानें तें मोठें होत जाऊन त्यांतून महाराजांना त्या आकाशापलीकडचा एक निष्कलंक चंद्र दिसला. बराच वेळ महाराज त्या चंद्राकडे पहात होते. नंतर हळूहळू तें भोंक लहान होत गेलें व चंद्रहि दिसेनासा झाला! दुसऱ्या दिवशीं महाराजांच्या तोंडून या प्रसंगाची हकीकत ऐकल्यावर दादासाहेब खापर्डे म्हणाले, "तुम्हीं जें पाहिलें तेंच तें. सांईबाबांच्या कृपेनें यापुढें तुम्हांला असे पुष्कळ देखावे दिसतील."

श्रीरामनवमीच्या नवरात्रांत पंचदशीचें वाचन पूर्णपणें संपलें व बाबांनीं नवमी होतांच आपण होऊन दादासाहेबांना जाण्याची परवानगी दिल्यानें दादासाहेब गांवाला निघून गेले. जातांना ते महाराजांना एवढेंच म्हणाले कीं, माझ्यासमक्ष सर्व पंचदशी वाचून संपली, आतां माझ्या पाठीमागें तुम्हांला ती आपोआप कळेल.

या वेळीं शिर्डीच्या बड्या बड्या मंडळींपैकीं कांहींना महाराजांचा हेवा वाटूं लागला होता, तर पुष्कळ सरळ हृदयाचे भोळे भाविक लोक त्यांना सत्पुरुष मानून त्यांची यथाशक्ति सेवा करूं लागले होते. महाराज कांहींच खात-पीत नाहींत हें समजल्यानें, भाई नांवाच्या एका मराठा भक्तानें त्यांच्यासाठीं कपभर कॉफी व बासुकाका साठे यांनीं नैवेद्य आणण्याचा रोजचा नियम धरला. यांतलें कांहींहि महाराज खात नसत; पण पुढें सांईबाबांचा निरोप आल्यावरून सायंकाळच्या सुमारास ते थोडी कॉफी घेत व अन्नापैकीं एक-दोन घांस खाऊन बाकीचें कुत्र्यांना खाऊं घालीत. नंतर लवकरच गुरुपौर्णिमेच्या दिवशीं सांईबाबांची एक धीट भक्तीण चंद्राबाई पूजेचें साहित्य व नैवेद्य घेऊन महाराजांकडे आली; परंतु पूजा करण्यास महाराज कांहीं केल्या आपणांस परवानगी देत नाहींत असें पाहून तिनें जबरदस्तीनें एक एक पाय बाहेर ओढून महाराजांची पूजा केली. दुधाचें भांडेंहि त्यांच्या तोंडाला लावल्यासारखें करून नैवेद्याचा हट्टहि कसाबसा पुरा केला! शेवटीं त्या बाईला समजुतीनें घालवून दिल्यावर नानासाहेब चांदोरकर महाराजांकडे येऊन प्रेमानें म्हणाले, "बाबांनीं तुम्हांला सगळ्या योग्यांपेक्षां श्रेष्ठ योगी

बनविलें आहे." यावर, याला कांहीं आधार आहे काय असें महाराजांनीं विचारल्यावर नानासाहेबांनीं सांगितलें कीं, सांईबाबा गुप्त रीतीनें काय करतात तें जाणण्याची विद्या त्यांनीं मला दिली आहे; तुम्ही 'पूर्ण योगी पुरुष' होणार व शेंकडों जणांचें कल्याण तुमच्याकडून होणार. नंतर महाराजांनीं केव्हांतरी भाकरी खावीशी वाटते असें सांगितल्यावरून, नानासाहेबांनीं रोज भाकरीचा नैवेद्य पाठविण्याचीच व्यवस्था केली.

याप्रमाणें बाळाभाऊ कांहीं महिने नियमानें भाकरी आणीत; महाराज क्वचित् त्यांतला कांहीं अंश खात व उरलेला सर्व नैवेद्य कुत्र्यांना-कावळ्यांना घालून टाकीत. पुढें एकदां दुर्गाबाई करमरकर या आपल्या एकनिष्ठ भक्तिणीला सांईबाबांनीं महाराजांची सेवा करण्याबद्दल सूचना केली. त्यावर दुर्गाबाई म्हणाली, "ते कोणास तिकडे येऊं देत नाहींत; रागावतात." तेव्हां सांईबाबांनीं सांगितलें कीं, "बळेंच जावें, रागावले तरी हरकत नाहीं. आतांपासून तूं त्यांचें पहात जा; म्हणजे मी तेथेंच आहें." यानंतर दुर्गाबाई मधून मधून कांहींतरी खाण्याचा पदार्थ महाराजांना आणून देत असे. वाड्यांतलें जेवण सुटल्यावर पांच-सात महिने महाराज कधीं कॉफी, कधीं भाकरी असें कांहीं घेत व बाकीचे दिवस संपूर्ण उपासच करीत. त्या वर्षीच्या ( शके १८३४ : इ. स. १९१२–१३ ) संक्रांतीपासून मात्र सर्वच अन्न बंद झालें व महाराजांच्या अवस्थेंत महत्त्वाचा फरक दिसूं लागला. अन्नाला ते स्पर्शहि करीनासे झाले. पण इतक्यावरहि कोणीं कांहीं आणलेंच तर तें ताटच्या ताट उचलून सरळ बाहेर फेकून देत असत !

पण या काळांतल्या इतर कांहीं महत्त्वाच्या घटना मुद्दाम नमूद केल्या पाहिजेत. महाराज देवळांत दिवसां व रात्रीं एकटेच असत. रात्रीं तर तेथें कोणी येण्याचा संभवहि नसे. रात्रींच्या वेळीं महाराज एकटे पडलेले असतांना जमिनींतून किंवा देवळाच्या गाभाऱ्यांतून भयंकर किंकाळ्या फोडल्यासारखे किंवा असेच इतर भयानक आवाज त्यांना ऐकूं येत आणि कांहीं वेळां अक्राळविक्राळ देखावेहि दिसत असत. लेंडीला जातांना सांईबाबा रस्त्यावर थोडा वेळ थांबत तेव्हां, दिवसांतून एकदां, महाराज दर्शनाला जात असत. अशाच एका दर्शनाच्या वेळीं सांईबाबांनीं विचारलें,

"तूं देवळांत एकटाच असतोस कीं कोणी सोबत असतें ?" त्यांना महाराजांनीं सांगितलें कीं, माझ्याशिवाय कोणीहि नसतें. त्यावर सांईबाबा म्हणाले, "कोणी नसतें तर नसूं दे. घाबरूं नकोस. मी तेथें नेहमीं तुला सोबत आहेंच." बाबांच्या वचनावर पूर्ण श्रद्धा ठेवून महाराज खंडोबाच्या देवळांत सुमारें तीन वर्षें एकटे रहात होते. या अवधींत अनेक वेळां महाराजांच्या अंथरुण-पांघरुणांतूनहि सर्प-विंचू निघत होते, पण महाराजांच्या केसालाहि धक्का लावण्याचें सामर्थ्य त्यांना नव्हतें !

महाराज खंडोबाच्या देवळांत राहूं लागल्यानंतर कांहीं काळानें एक कुत्री नियमानें येऊन देवळासमोर, पण देवळाच्या बाहेर मधोमध, बसूं लागली. प्रारंभीं तिचें रूप मोठें विचित्र होतें. दोनहि डोळ्यांनीं जवळ जवळ आंधळी, बांधा थोराड, रोड झाल्यामुळें हाडन् हाड बाहेर पडलेलें, रंग भगवा आणि शक्ति नसल्यानें साधें चालणेंहि जवळ जवळ अशक्य असा तिचा थाट होता. कितीहि हांकलली तरी जरा वेळ इकडे-तिकडे करून ती पुन्हां आपली ठराविक जाग्यावर येऊन बसत असे. दाराशीं एखादें कुत्रें सारखें येऊं लागलें, तर त्याला कांहींतरी खाऊं घालावें, तो जीव आपला ऋणानुबंधी असतो अशी शिकवण महाराजांना मिळालेली होती. त्याप्रमाणें तिच्या शक्तीनुरूप महाराज तिला थोडी कॉफी व अन्नहि देऊं लागले. कांहीं दिवसांनीं ती चांगली लठ्ठ झाली व तिनें महाराजांना विशेष प्रकारचें ज्ञान देऊन ती त्यांची गुरूच झाली. तिच्याबाबत महाराज पुढें असें सांगत कीं, "तिच्यापासून मला पुष्कळ ज्ञान झालें. तिनें पुष्कळशा गोष्टी मला शिकविल्या; पण त्या सांगतां येण्यासारख्या नाहींत. तो आमचा अनुभव आम्हांस माहीत. दुसऱ्यास सांगून उपयोग नाहीं. परमार्थामध्यें शिकण्याच्या पुष्कळ गोष्टी असतात व शिकविणारेहि पुष्कळ आहेत. ...... कोणत्याहि हीन वस्तु असोत. त्यांपासून पुढें पुढें ईश्वरी इच्छेनें पुष्कळसें अदृष्ट ज्ञान होऊं लागतें." महाराजांनींच सांगितल्याप्रमाणें वऱ्हाडांतील शेगांवामध्यें होऊन गेलेले प्रसिद्ध सत्पुरुष श्रीगजाननमहाराज यांनीं त्या कुत्रीच्या रूपानें तेच स्वतः आहेत असें प्रत्यक्ष रीतीनें महाराजांना दाखविलें. कधीं कधीं ती कुत्री महाराजांना त्यांच्या सासूच्या रूपानें वा इतरहि पुष्कळ रूपांनीं

दिसे. गजानन महाराज, त्या सासूबाई व ही कुत्री हे आम्ही सर्व एकच आहोंत असें ज्ञान त्या कुत्रीनें प्रत्यक्ष देखावा दाखवून दिलें, असें महाराज सांगत असत. कपारींतील तपश्चर्येनंतर झालेल्या साक्षात्कारांत महाराजांच्या अंगाचें कातडें सोलून त्यांना आंतलें दिव्य शरीर दाखविणारे दोन पुरुष होते, एक मुसलमान व एक हिंदु. त्या दृष्टीनें महाराजांना कृतार्थ करणारे दोन सत्पुरुष सांईबाबा व गजानन महाराज, म्हणजे एक मुसलमान व एक हिंदु असे होते, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. मात्र कातडी सोलून आंतील दिव्य शरीर दाखविणारा हिंदु पुरुष म्हणजे गजानन महाराज हा तर्क आहे. स्वतः महाराजांनीं तसें कोठें सांगितलेलें नाहीं. कुत्रीच्या रूपानें महाराजांना ज्ञान देण्याहून श्रेष्ठ अशी विशेष प्रकारची कृपा गजानन महाराजांनीं महाराजांवर केलेली आहे; तिचा वृत्तान्त पुढें येईलच.

महाराजांनीं गांवांत जाण्याचें आतां सोडलेंच होतें. रोजची स्नानसंध्या बसल्या ठिकाणींच आटोपून मग ते पंचदशीचें मनन करीत बसत. इतक्यांत त्या सुमारास त्यांना एका भक्तानें अष्टावक्र-गीतेचें पुस्तक प्रेमानें भेट म्हणून दिलें. सबंध भगवद्गीता, रामगीता व विष्णुसहस्रनाम नित्यनियमानें म्हणण्याचा महाराजांचा क्रम होता. त्यांत आतां पंचदशी, अष्टावक्र-गीता व अध्यात्मरामायण यांच्या वाचनाची भर पडली.

एके दिवशीं दिवाळीच्या सुमारास एक वृद्ध, शुचिर्भूत व गौरवर्ण ब्राह्मण गृहस्थ काखेंत एक मोठें पुस्तकांचें गाठोडें घेऊन महाराजांकडे आले. हे गृहस्थ शास्त्रीय पद्धतीनें सामुद्रिक विद्या जाणणारे अनुभवी पंडित होते व त्यांना अभ्यास म्हणून महाराजांच्या शरिरावरील चिन्हें, रेष इत्यादि गोष्टी पहावयाच्या होत्या. हें समजतांच महाराज म्हणाले, " अहो आजोबा, माझें सामुद्रिक काय पहातां ? ... मला आतां काय दिग्विजय करावयाचे आहेत ? ... अहो आजोबा, तुमच्या पहाण्याच्या अगोदर मीच माझें सामुद्रिक सांगून देतों. " एवढें बोलून महाराजांनीं आपल्या दुःखमय ऐहिक जीवनाचें चित्र त्यांच्यापुढें उभें केलें व त्या दिवशीं त्यांना चालतें केलें. पण आजोबांना महाराजांच्या शरिरावर सत्पुरुष-अवस्थेचीं चिन्हें दिसूं लागल्यामुळें ते पुन्हां दुसऱ्या दिवशीं हजर झाले व एकदां आपलें सर्व शरीर मला तपासून पाहूं द्या अशी ते महाराजांसमोर अगदीं गयावया

करूं लागले. या आजोबांनीं स्वतःची ओळख करून दिली ती अशी : 'ईश्वरकृपेनें ही सामुद्रिक विद्या मजजवळ आहे. पुष्कळ दिवसांपासून मी हाच उद्योग करतों. मोठमोठ्या संसारी लोकांचीं चिन्हें मीं पाहिलीं; पण सत्पुरुष, महात्मे यांचीं चिन्हें दिसलीं कीं हा धंदा सोडणें आहे. माझी ही आशा पूर्ण करा.' शेवटीं महाराजांनीं एकदांची अनुज्ञा दिली व त्या आजोबांनीं महाराजांच्या पायांपासून डोक्यापर्यंत सर्व शरिरावरील रेषा व खुणा पाहून, मोजून कांहीं टिपणेंहि केलीं. डोळे, जीभ, कान यांचीहि त्यांनीं कसून पहाणी केली व हा एकंदर कार्यक्रम तीन-चार दिवस चालला. शेवटीं 'झालें माझें सर्व पहाणें' असें म्हणून आजोबांनीं महाराजांना साष्टांग नमस्कार घातला. महाराजांनीं त्याबाबत नापसंती दाखवितांच आजोबा म्हणाले, "पुढें शेंकडों-हजारों लोक साष्टांग नमस्कार घालतील अशी स्थिति तुमच्या चिन्हांवरून मला दिसून आली ... माझ्या व्यवसायाच्या योगानें साक्षात् परमेश्वरानें मला दर्शन दिलें. पूर्ण सत्पुरुष, पूर्णत्वास पोहोंचलेला महात्मा, पूर्ण परब्रह्म, सच्चिदानंद अवस्था ज्या पुरुषांत येते त्यांचीं जीं ठरलेलीं चिन्हें आहेत तीं मला कोठेंतरी दिसावीं व त्या रूपानें परमेश्वराचें दर्शन होऊन कृतार्थ व्हावें यासाठीं मी प्रयत्न करीत होतों. ... जगांत उदयास न आल्यामुळें पूर्ण सच्चिदानंदपणाची आपणांस जाणीव नाहीं. तथापि पूर्ण सत्पुरुष, पूर्ण सच्चिदानंद अवस्थेचीं जीं लक्षणें आहेत, तीं आज मला आपल्या ठिकाणीं पूर्णपणें दिसलीं." इतकें बोलून व पुन्हां साष्टांग नमस्कार घालून आजोबांनीं महाराजांना एकदम मिठी मारली. महाराजांनाहि गहिंवर आला. जरा वेळानें आजोबा म्हणाले, "पुष्कळ दिवसांपासून आपल्यावर सत्पुरुषांचे गुप्त प्रयोग होत आहेत व पूर्णता होण्याचा काळ जवळ आलेला आहे; आणि ती सांईबाबांच्या द्वारानें होईल." शेवटीं ते असेंहि म्हणाले कीं, "अद्वैत अवस्था तुमच्यांत येणार म्हणून हें चिन्ह (मनुष्याचा आकार व पशूचा आकार एक झालेलें चिन्ह) आहे.

... शेंकडों जे सत्पुरुष महात्मे होऊन गेले त्यांची रहाण्याची मठीच तुमचें हें शरीर आहे असें समजा. म्हणजे जशी एखादी धर्मशाळा अगर एखादा डाक-बंगला असतो व त्या ठिकाणीं त्या

त्या योग्यतेचे लोक वाटेल त्या वेळीं येऊन रहातात व वाटेल ते कारभार करतात, तसे सत्पुरुष, महात्मे, श्रीतुकाराम, रामदास इत्यादि किंवा मुक्ताबाई, मीराबाई इत्यादि सती साध्वी स्त्रिया ज्या गुप्त असतात, त्यांना वारंवार जगाच्या कल्याणासाठीं कोणाच्या तरी स्थूल शरिराच्या द्वारें ये-जा करावी लागते, त्यासाठीं हें आपलें शरीर त्यांची मठी आहे ! ”

यावर महाराजांनींहि मोठ्या प्रेमानें आजोबांना साष्टांग नमस्कार केला व आजोबा महाराजांचा निरोप घेऊन नरसोबाच्या वाडीला जातों म्हणून सांगून निघून गेले. ते पुन्हां कधींहि भेटले नाहींत.

दिवाळीपासून महाराजांची स्थिति बदलत चालली व त्यांना बाह्यतः अर्धवट भ्रमिष्टपणाची अवस्था येत चालली. पडून राहून फार त्रास वाटूं लागल्यामुळें, भिमाबाई नांवाच्या एका बाईकडून त्यांनीं एक जातें मागून घेतलें; त्यावर ते अनेक आया-बायांचें दळण मधून मधून दळून देत असत. पण पुढें त्यांची स्थिति लक्षांत घेऊन बायकाच त्यांना दळण देईनाशा झाल्या.

संक्रान्तीपासून, आत्मिक प्रगतीमुळें महाराजांचा बाह्य जगाशीं असलेला संबंध हळूहळू तुटूं लागला व त्या प्रमाणांत मानवी सृष्टींतील त्यांचे व्यवहारहि संपुष्टांत येऊं लागले. सद्गुरूंचे त्यांच्यावर जे प्रयोग होत होते त्यांची तीव्रता वाढली व महाराजांना ईशसृष्टींतील गूढ अनुभव येण्यास प्रारंभ झाला. एक दिवस महाराजांना त्यांच्या ब्रह्मीभूत आजोबांचें समक्ष दर्शन होऊन, आजोबांनीं महाराजांना एका विलक्षण पद्धतीनें कांहीं ज्ञानोपदेशहि केला. एकदां सायंकाळीं महाराज देवळांत संध्या करीत आहेत इतक्यांत महाराजांचे आजोबा देवळाच्या पायरीवर उभे असून आपल्याकडे हात करीत आहेत असें त्यांनीं पाहिलें. महाराज आपल्याकडे पहात आहेत असें दिसतांच आजोबांनीं ‘अहंमदनगर’ हा शब्द सावकाश उच्चारला. पण त्याचा अभिप्राय महाराजांच्या लक्षांत येत नाहीं हें पाहून आजोबांनीं अहं, मदन, गर असा तो शब्द तुकडे पाडून उच्चारला. तरींहि महाराजांना त्याचा अर्थबोध होईना. तेव्हां पुढें केलेला हात जोरानें हालवून ‘ अरे, अहम्, मदन, गर ’ असें जोरानें बोलून आजोबांनीं तोंड

फिरविलें व ते एकदम अदृश्य झाले! कांही क्षण विचार केल्यावर आजोबांच्या बोलण्याचें मर्म महाराजांच्या ध्यानांत येऊन ते गहिंवरून गेले व त्यांच्या डोळ्यांवाटे अश्रुप्रवाह सुरू झाला.

> ' अहम् म्हणजे सर्व प्रकारचा अहंकार, मीपणा – मापलेली अवस्था; मदन म्हणजे सर्व प्रकारच्या वासना, कामना; व गर म्हणजे विष. अहंकार-अभिमान, सर्व प्रकारच्या वासना हें गर म्हणजे विष आहे. '

असा आजोबांच्या शब्दाचा अर्थ-प्रकाश झाल्याबरोबर महाराजांची अवस्था एकदम विलक्षण झाली. या प्रसंगाची आठवण सांगतांनाहि पुढें त्यांची तशीच अवस्था होत असे. या दृष्टान्तांत प्रत्यक्ष आजोबाच आले किंवा त्यांच्या रूपानें सांईबाबाच आले, त्यांच्यांत व यांच्यांत कांहीं फरक नाहीं, दोन्ही आतां एकरूप झाले असें श्रीसांईबाबांनीं दाखविलें, असा या साक्षात्काराचा अर्थ महाराज सांगत असत.

मकरसंक्रान्तीच्या दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं सांईबाबांकडून महाराजांवर पूर्ण गुरुकृपेचा एक महत्त्वाचा प्रयोग झाला. या प्रयोगामुळें महाराजांच्या ठिकाणची पुरुषपणाची जाणीव पूर्ण नष्ट होऊन आपण स्त्रीरूप आहोंत अशीच जाणीव त्यांना होऊं लागली! महाराजांना स्त्रीत्वाचा अनुभव पूर्णपणें येऊं लागला व ते बायकांसारखे चाळेहि करूं लागले. ' मला कुंकूं आणून द्या, बांगड्या घाला, माझें पोर कोठें गेलें ? ' इत्यादि प्रकारची भाषा ऐकून ते वेडे झाले असेंच लोकांना वाटूं लागलें! भगवान् श्रीरामकृष्ण परमहंसांना मधुरभावसाधना करतांना जे विशिष्ट अनुभव आले त्यांची आठवण या ठिकाणीं जाणत्या वाचकांना सहजच होईल. वरील तऱ्हेचे जे गुरुकृपेचे गुप्त प्रयोग असतात त्याबद्दल बोलतांना महाराज पुढें एकदां म्हणाले कीं,

> " यांत सर्व अदृश्य गुप्त गोष्टी असल्यामुळें स्थूल दृष्टीनें पहाणाऱ्यांना गुप्त उघड करून सांगितल्यास त्यांचा विपरीत परिणाम होण्याचा संभव आहे; म्हणून अधिकार प्राप्त झाल्याशिवाय या गुप्त गोष्टी बोलूं नयेत हें उत्तम. "

यानंतर महाराजांच्या अनुभवांची संख्या व पातळी सारखी वाढतच गेली. एकदां महाराज दोन प्रहराच्या वेळीं शौचास बसले असतां त्यांना एक चमत्कारिक दृश्य दिसलें. त्यांनीं असें पाहिलें कीं, एकाएकीं आकाश, पृथ्वी, सूर्यनारायण, सगळें जग व सभोंवतीं दूर दृष्टि जाईल तितक्या लांबपासून सर्व वस्तु एकदम सगळ्या गरगर फिरत आहेत. परंतु महाराज त्या चक्राच्या बाहेर असून तें चक्र फिरत फिरत महाराजांजवळून वेढे घेत घेत व संकुचित होत होत अगदीं संकुचित होऊन एके ठिकाणीं येऊन पीळ खाऊन नाहींसें झालें. कितीतरी कोसांचें अंतर असेल असें फार लांबच्या लांब अंतर दिसत होतें व सूर्य, पृथ्वी, सर्व जग, नेहमीं लोक प्रदक्षिणा घालतात त्याच्या उलट दिशेनें म्हणजे उजवीकडून डावीकडे फिरत राहिलें. हें फिरणें सावकाशपणें अंदाजें अर्धा तास चालू होतें. त्या चक्राकार दृश्याच्या वेळीं स्वतः आपण कोठें व कशाच्या आधारावर आहोंत याची कल्पना महाराजांना येईना. पुढें याबाबत बोलतांना महाराज एकदां म्हणाले कीं, "भ्रममूलमिदं जगत्" ही अवस्था जोंपर्यंत व्यक्तिमात्रांत आहे तोंपर्यंत जगाच्या रहाटीप्रमाणें सुख-दुःख चालू असतें. भ्रम म्हणजे जग व जग म्हणजेच भ्रम. भ्रम म्हणजेच एक परिभ्रमण. ज्याला जगाच्या बाहेर पडण्याची योग्यता प्राप्त झाली असेल त्याला जगरूप भ्रमापासून अलग केलें जातें. सर्व जग आपल्यापासूनच बाहेर पडून व आपण त्या जगाच्या बाहेर, स्थिर दृष्टीनें आपल्या ठिकाणीं स्वतःच्या शारीरिक अवस्थेचा अनुभव न घेतां, केवळ नुसते निश्चल वृत्तीनें त्या जगरूप भ्रमाचा त्याच्या गुणधर्मासुद्धां अलग रीतीनें अनुभव घेतों. अशी समज तो देखावा निघून गेल्यानंतर थोड्या वेळानें आली व त्याच वेळीं ज्ञानोदयास सुरुवात झाली. या प्रसंगानंतर महाराजांच्या मनाची स्थिति अगदीं बदलून गेली. जगरूप भ्रम नाहींसा झाला खरा; पण त्यांना आतां भ्रमिष्टपणाची अवस्था प्राप्त झाली व जगाचें स्वरूप वास्तविक पूर्वीप्रमाणेंच असतांना तें त्यांना उलटेंच्या पालटें दिसूं लागलें. आकार व अंतर यासंबंधींच्या नेहमींच्या मर्यादा ओलांडून त्यांना एका निराळ्याच अवस्थेचा अनुभव येऊं लागला.

एकदां दोन प्रहरीं कडक ऊन पडलेलें असतांना महाराज पाटाच्या पाण्यांत स्नान करून तेथेंच ओलेत्यानें संध्या करूं लागले. हातांत पाणी घेऊन सूर्यनारायणाचें प्रतिबिंब त्यांत पाहून अर्घ्यप्रदान करीत असतां, पहातां पहातां सूर्यनारायणाचें प्रतिबिंब एकदम काळेंठिक्कर दिसूं लागलें; वर पहातात तों आकाशांतील सूर्यबिंबहि तसेंच काळें ! हा प्रकार पाहून महाराज थोडे घाबरले व आपण ठिकाणावर गेलेलें बरें असें वाटून ते देवळांत आले; पण देवळांत पोहोंचेपर्यंत तो काळा सूर्यगोल वाढत वाढत जाऊन त्यानें सर्व अवकाशच व्यापून टाकला व त्याचें तोंड मिटल्यासारखें होऊन महाराज त्यांत अडकले ! त्या वेळीं शब्द-स्पर्शादि व्यवहार महाराजांना समजत होते, पण खालीं-वर, मागें-पुढें सर्वत्र काळोख भरून राहिला होता. नैवेद्य आणणाऱ्या एका मुलाला महाराजांनीं कंदील लावून आणण्यास सांगितलें, तेव्हां तो म्हणाला कीं, " महाराज, या वेळीं तर चक्क दिवसाचा उजेड आहे, मग कंदील कशाला ? तुम्हांला कांहींतरी झालें आहे ! " तथापि त्यानें कंदील लावून आणला, पण महाराजांच्या सभोंवार पसरलेल्या काळोखांत त्यांच्या दृष्टीनें काडीइतकाहि फरक पडला नाहीं ! सायंकाळीं अस्तमान झाल्याची जाणीव महाराजांना झाली, तथापि महाराजांची मनःस्थिति मात्र अगदीं उदास झाली.

होतां-होतां दोन प्रहर रात्र झाली, व दुपारीं अर्घ्य देतांना प्रथम जसे सूर्यकिरण स्पष्टपणें डोळ्यांत शिरत होते, तशा किरणांची ये-जा महाराजांच्या डोळ्यांसमोर सुरू झाली. ही भूतचेष्टा तर नाहीं ना ? या-मुळें आतां आपण आंधळे होणार कीं काय ? इत्यादि शंका महाराजांच्या मनांत येऊं लागल्या. कांहीं वेळानें एकदम पुष्कळशा किरणांचा समूह पावसांच्या धारांप्रमाणें ये-जा करीत करीत एकदम महाराजांच्या डोळ्यांच्या आंत घुसल्यासारखा झाला व हा सर्व खेळ एकदम बंद होऊन पुन्हां दुपारप्रमाणें सर्वत्र घनदाट अंधार पसरला !

आतां महाराजांना देवळांत एकट्यानें धीर धरवेना, तेव्हां ते तसेच अंधारांतून चाचपडत गांवांत गेले व त्यांनीं गो. क. दीक्षितांना सोबती-करितां देवळांत बोलावून आणलें. दीक्षित शेगडी पेटवून ठेवून तेथेंच झोंपले व पुन्हां महाराज एकटेच राहिले. महाराज कसेतरी अस्वस्थपणें

पडून राहिले असतां महाराजांना अतीव सूक्ष्म असे किंचित् प्रकाशणारे असंख्य परमाणु दिसूं लागले, व हळूहळू वाढतां वाढतां त्या एक-एका परमाणूच्या चवली, पावली, अधेली, रुपया, पापड, भाकरी इत्यादि क्रमानें गोलाकृति तयार होऊन त्या सर्व किंचित् प्रकाशमय आकृति एकमेकांत न मिसळतां सारख्या फिरूं लागल्या. हीं चक्रें फिरत असतांनाच, तसलेंच एक कल्पनेच्या पलीकडे मोठें असें चक्र तयार झालें व तें दिसतां-दिसतां एकदम आकुंचित होऊन महाराजांच्या मस्तकांत शिरलें; आणि त्याबरोबर महाराजांना स्वतःच्या डोक्यांत सूर्यनारायणाचा प्रकाश दिसूं लागला एकदम आश्चर्यचकित होऊन महाराज म्हणूं लागले, " अरे हें काय ? सूर्य येथें आंत कसा आला ? व तो आणि मी वाढत कसे चाललों ? " यानंतर महाराज लगेच आकाशाकडे पाहूं लागले तेव्हां त्यांच्यांतील सूर्य आकाशांत दिसूं लागला व दुपारच्या वेळेसारखें कडक ऊन व प्रकाश त्यांच्या अनुभवास येऊं लागला. ही स्थिति सुमारें पंचवीस-तीस मिनिटें टिकली असेल. पुढें कांहीं वर्षांनीं या अनुभवासंबंधीं महाराज सांगत कीं, जगांतून जगाच्या बाहेरील अवस्थेंत जात असतां, त्या बाहेरील अवस्थेच्या व जगाच्यामधील असा हा खेळ आहे. तो कोणाला कांहीं सांगण्यासारखा नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं सांईबाबा लेंडीला जात असतां सडकेवर जाऊन नेहमींप्रमाणें महाराजांनीं सांईबाबांचें दर्शन घेतलें व म्हणाले, " मला फार त्रास होऊन राहिला आहे. माझ्याच्यानें अगदीं सोसवेना. " त्यावर सांईबाबा हंसून म्हणाले, " अरे, होऊं दे त्रास झाला तर, घाबरूं नकोस, तुला सांभाळावयास मी जवळच आहें. अजून तुला रात्रंदिवस फार त्रास होईल, व जितकें दुःख आणि त्रास तूं सोसशील, तितकें सुख होईल. ... एकीकडे दुनिया व एकीकडे तूं असें सुख तूं भोगशील. " तेथूनच आपल्या गुरूच्या निशाणाकडे बोट दाखवून सांईबाबा पुढें म्हणाले, " तें बघ गुरूचें निशाण; तुझें निशाण तसें कायम फडकत राहील. हजारों लाखों लोक तुझें दर्शन घेत आहेत व तुझ्या अंगाला तर बोटभर चिंधीहि नाहीं ! जा आतां, ठिकाणावर जाऊन स्वस्थ बैस. " ' चालतां सद्गुरुवचनपंथें । झालें ब्रह्मांड पालथें । तरी जयाच्या शुद्ध भावार्थें ।

पालट न धरिजे ॥ ' या अग्निदिव्यासारख्या भयंकर कसोटींतून महाराज चालले होते व त्यांचा 'शुद्ध भाव' कनवाळू माता-पितरांप्रमाणें सांईबाबांच्या रूपानें त्यांचें रक्षण करण्यास तत्परतेनें सदैव सिद्ध होता.

यानंतर महाराज एक-दोन दिवसांनीं एकदां देवळांतून बाहेर पडून दहा-वीस पावलें गेले असतील नसतील तोंच त्यांच्या मस्तकाच्या मध्यांतून एक कांहींतरी तत्त्व निघालें व उंचच उंच जाऊन शेवटीं तें ब्रह्मांडाबाहेरील तत्त्वांत मिसळून गेलें ! हें जें तत्त्व गेलें त्याचा कोण-त्याहि प्रकारचा शब्द झाला नाहीं किंवा डोळ्यांनाहि कांहीं दिसलें नाहीं, तर फक्त त्याचें ज्ञान झालें. या अनुभवानंतर आपली मनुष्यावस्था जणुं नाहींच व आपण जगाच्या बाहेर गेलों असें ज्ञान महाराजांना होऊन द्वैत-भाव अगदीं नाहींसा झाला व सर्वत्र एकच भासूं लागलें.

वेदांतील महावाक्यांचा अनुभव महाराजांना येऊं लागला, व प्रत्येक अनुभवाच्या उत्पत्तीबरोबर त्या ग्रंथांत जसा अनुभव लिहिला असेल तशीं त्यांतील वाक्यें आठवूं लागलीं आणि स्वतःला त्या अवस्थेचा साक्षात् अनुभवहि येऊं लागला.

यानंतर महाराजांना अनेक फिरते देखावे दिसत, ते चक्राकार येऊन महाराजांच्या छातीला स्पर्श करून पुढें जात व एकदम गुप्त होत. अशा प्रकारच्या देखाव्यांत महाराजांच्या अनेक पूर्वजांचें त्यांना दर्शन होई, व ज्ञानोदय झालेला असल्यामुळें हे असुक असुक होते असें महाराजांना कळतहि असे. महाराजांच्या आजोबांचें दर्शन महाराजांना एकंदर चार वेळां झालें. एकदां तर एका अर्ध-वर्तुळांतून अर्ध-चंद्राकार गतीनें आजोबा आले व महाराजांच्या छातीला प्रत्यक्ष स्पर्श करून गेले ! ही गोष्ट महाराजांनीं अगदीं जागेपणीं दिवसा अनुभवलेली आहे.

हे जे नवीन देखावे दिसूं लागले त्यांचें वैचित्र्य व त्रास सारखा वाढतच चालला; हें अनुभवचक्र आतां फार वेगानें काम करूं लागलें. या ठिकाणीं त्याबद्दल सविस्तर लिहिणें अर्थात् अशक्य असल्यानें केवळ कांहीं महत्त्वाच्या गोष्टींचा नुसता उल्लेख करून पुढें चाललें पाहिजे. एकदां महाराजांनीं असें पाहिलें कीं, दोन दांडग्या माणसांनीं महाराजांचें डोकें कापून घेतलें व त्याच्या आंतील भागाची आमटी करून ती ते खात

बसले आणि डोक्याची कवटी त्यांनीं फेंकून दिली ! हें पाहून महाराज घाबरले व ‘ माझें डोकें मला परत द्या. माझें डोकें, माझें डोकें ’ असें ओरडत राहिले. तरीहि डोकें मिळेना म्हणून रडूं लागले. एकदां पाटाच्या पाण्यांत आपलें स्वतःचें पोट वहात चाललेलें पाहून, महाराज घाबऱ्या घाबऱ्या ‘ माझें पोट वहात चाललें ’ असें म्हणत ओरडत सुटले ! महाराजांना जगाच्या किंवा ब्रह्मांडाच्या बाहेरचे विविध अनुभव येत होते व त्यांच्या व्यावहारिक दृष्टीनें विचित्र दिसणाऱ्या बाह्य प्रतिक्रिया पाहून लोक म्हणूं लागले कीं, यांना आतां मात्र पुरतें वेड लागलें ! !

एकदां एक मोठें चक्र म्हणजे वर्तुळ आलें, त्यांत संन्याशी, गोसावी, ब्रह्मचारी, सांई-फकीर, महात्मे व सत्या, योगिनी अशा परमार्थांत मोठ्या अधिकारी असलेल्या अनेक व्यक्तींची सभा दिसली. त्या सभेंत जगासंबंधीं विशेष महत्त्वाच्या वाटाघाटी चालल्या होत्या, पण निर्णय लागेना; शेवटीं खिस्ती धर्मापैकीं एका फार मोठ्या महात्म्याला घेऊन सांईबाबा तेथें आले व नंतर सांईबाबांनी जो निकाल सांगितला, तो मान्य होऊन सभा संपली आणि वर्तुळहि संपलें.

नंतर एकदां असें वर्तुळ आलें कीं, त्यांत एक धिप्पाड स्त्री एक मोठा वजन करण्याचा काटा समोर ठेवून व सांईबाबांना एका पारड्यांत बसवून त्यांच्याबरोबर कोणी तोललें जातें का हें पहात होती. समोर दिसणाऱ्या गर्दींतून अनेक माणसांची अशी परीक्षा झाली, पण सांईबाबांचें पारडें आपलें खालींच. शेवटीं एक मुलगी धांवत आली व तिनें महाराजांना हातानें धरून नेऊन बळेंच दुसऱ्या पारड्यांत बसविलें, आणि काय आश्चर्य ? सांईबाबा व महाराज एकमेकांबरोबर सारखे तोलले जातांच ती तोलणारी बाई महाराजांच्या व ती मुलगी सांईबाबांच्या पारड्यांत शिरली आणि सर्व देखावा एकदम बंद झाला.

एकदां एका वर्तुळांत सांईबाबांनीं महाराजांना आपल्या गुरूंचें दर्शन घडविलें. नंतर त्यांतच महाराजांसारखाच दिसणारा एक पुरुष सांईबाबांनीं मारून टाकला. त्याबद्दल महाराजांनीं विचारतांच सांईबाबा म्हणाले, “ तो तूंच; परंतु पापरूपानें तूं होतास, म्हणून त्याला काढून त्याचा नाश केला. ... तुझ्या-माझ्या योगानें पुष्कळ कामें व्हावयाचीं

ग्रा. क्र. ७०८६४



आहेत; मग पाप जवळ असून कसें चालेल ? ... पापपुरुष गेला, आतां तुला सर्व कांहीं आपोआप समजेल; सांगण्याचें काम राहिलें नाहीं. " पूर्ण अवस्थेला पोहोंचण्याकरितां मानवी देहांतील पापपुरुषाचा नाश व्हावा लागतो. भगवान् श्रीरामकृष्ण परमहंसांच्या चरित्रांत अशाच एका घटनेचा स्पष्ट उल्लेख आहे.

एकदां एका चक्रामध्यें सांईबाबांच्या आज्ञेनें एका स्त्रीनें महाराजांच्या हातीं एक दिवा देऊं केला, पण महाराज म्हणाले कीं, नंतर घेईन. इतक्यांत सांईबाबा तेथें आले व म्हणाले, " तुला असा दिवा मिळाला कीं, ज्या दिव्याचा प्रकाश सूर्यचंद्रांच्या प्रकाशापेक्षां जास्त आहे. सूर्यचंद्र इत्यादि प्रकाशणाऱ्या वस्तु या दिव्याच्या प्रकाशानें दिसणार. " यावर महाराजांनीं तो दिवा सांभाळण्याची भानगड आपल्याला नको असें सांगतांच, सांईबाबा म्हणाले, " अरे, सांभाळण्याचें काम नाहीं; नुसता घ्यावा. ... जो सांभाळणारा असतो, त्याला सांभाळण्यास दुसरा कशाला ? ... त्या प्रकाशापासून तूं तर कोठें अडणार नाहींसच; परंतु शेंकडों लोकांना प्रकाश दाखविशील. "

जसा महाराजांनीं पापपुरुष काढून टाकलेला पाहिला, तसाच एकदां त्यांनीं हुबेहूब त्यांचीच स्वतःची मूर्ति असा एक ऐश्वर्यशाली पुरुष ( पुण्यपुरुष ) पाहिला. त्याबाबत सांईबाबा म्हणाले, " तूं यांच्या ( पापपुरुष व पुण्यपुरुष ) पलीकडचा आहेस, व मी जो तोच तूं आहेस. "

एकदां एक वर्तुळ आलें, तें महाराजांच्या भावी चरित्राचें निदर्शक व म्हणून विशेष महत्त्वाचें आहे. दोन मुली आल्या व त्यांनीं महाराजांना जबरदस्तीनें एका मोठ्या चऱ्हाटानें एका प्रचंड खांबाशीं ( ब्रह्मस्तंभ ? ) बांधून टाकलें. तो खांब वर किती उंच असेल हें दृष्टीला समजत नव्हतें व त्याच्या खोलीचीहि कल्पना येत नव्हती. कांहीं वेळानें त्यांना त्या खांबासमोरच्या मैदानांत बारा ते वीस वर्षें वयाच्या कित्येक मुली जमल्या आहेत व विविध खेळ खेळत आहेत असें दिसलें. कांहीं दिवसांनीं त्यांतीलच दोन मुलींनीं येऊन महाराजांना स्तंभापासून सोडलें व त्या मुलींच्या मेळाव्यांत नेऊन बसविलें. त्या सर्व मुली महाराजांना म्हणाल्या, " आमच्यासारखे स्त्रीजात होऊन जा ! " " पण हें कसें होऊं

शकेल ? " असें म्हणून महाराजांनीं त्याला नकार दिला. तथापि मुलींनीं दहशत घातल्यानें पुढें महाराज त्यालाहि कबूल झाले; व लगेच मुलींनीं महाराजांच्या दोनहि हातांत कधींहि न फुटणाऱ्या पक्क्या बांगड्या भरल्या. त्याबरोबर महाराजांच्या ठिकाणीं एकदम स्त्रीत्व येऊन पंधरा-वीस वर्षांच्या मुलीप्रमाणें ते बनले ! इतकें झाल्यावर तेथील प्रमुख मुलीनें महाराजांना एक चामड्याची पिशवी दिली व एक एक मुलगी महाराजांना एक एक गोष्ट सांगूं लागली. याप्रमाणें अपूर्व व अति महत्त्वाच्या आणि प्रत्यक्ष देखावे अनुभवास आणून देणाऱ्या अशा त्या मुलींनीं सांगितलेल्या हजारों गोष्टी त्या पिशवींत भरून, ती मोहोरबंद करून, महाराजांच्या ताब्यांत देण्यांत आली; आणि वर्तुळ संपलें ! याबाबत महाराज पुढें सांगत कीं, " ती पिशवी अद्याप माझ्याजवळ आहे. त्यांतील महत्त्वाच्या गोष्टी ऐकण्यासारखे कोणीतरी उत्पन्न व्हावे अशी मी वाट पहात आहें. " शिवाय वरील साक्षात्काराबाबत ते म्हणत, " माझ्या हातांत पक्की बांगडी आहे. मी अखंड सौभाग्यवती आहें. माझा पति निरंतरचा अजरामर आहे. "

महाराज शिर्डीस आल्यावर सुमारें एक वर्षानंतर हे वर्तुळांचे अनुभव सुरू झाले व ते जवळ जवळ दोन वर्षें सतत चालू होते. महाराजांचे स्त्री-पुरुष वगैरे पूर्वीचे जन्म किती झाले व कोठें, कोणत्या जन्मांत काय व्यवहार झाला, त्या जन्मांचा प्रत्यक्ष काळ कोणता होता, या साऱ्या अवस्थांचा अनुभव त्यांना येत असे. जगांतील दगडासारख्या जड व इतर चैतन्ययुक्त वस्तूंत महाराजांचा प्रवेश होऊन व ती जाणीव कायम राहून, सर्व वस्तु आपणच आहोंत असा अनुभवहि महाराजांना येऊं लागला !

शिर्डीला येऊन महाराजांना दोन वर्षें होऊन गेलीं होतीं व अन्नपाणी सुटण्याला सुमारें सव्वा वर्ष झालें होतें. या सुमारास सांईभक्त डॉ. पिल्ले यांनीं एकदां महाराजांच्या छातीचे ठोके मोजले, ते मिनिटास सुमारें चाळीस भरले ! तरी अन्नपाणी न घेण्याचा त्यांचा नियम तसाच पुढें चालू होता.

एकदां शिर्डीच्या वार्षिक जत्रेंत कांहीं मुसलमान लोक महाराजांच्या समोर देवळाच्या अंगणांत नमाज पढावयास आले. त्याबाबत महाराजांनीं रागावून नापसंती दाखवितांच त्यांच्यापैकीं कोणी धर्माचें तत्त्व जाणणारे होते ते पुढें झाले व म्हणाले, " हमारे शास्त्रकुराणमेंभी ऐसा है कि जो पूरा सांई-मौला अल्लारूप बना है, और पूरा भगवान्-रूप बम्मन हुवा होगा, ओ दोन्होकी आपसमें अदलाबदल हो जाती. बम्मनका भगवानरूप सांईमें जाता और सांईमेका निराकार अल्ला बम्मनमें जाता है. " त्यांच्या दृष्टीनें महाराज आतां खरे खरे सांई-मौला झाले होते !

महाराजांचें अन्नपाणी बंद होऊन सुमारें अडीच वर्षें झालीं, तेव्हां त्यांचें शरीर म्हणजे केवळ हाडें व कातडें एवढेंच शिल्लक होतें; ना रक्त ना मांस. तथापि त्या वेळींहि त्यांच्या अंगावर एक प्रकारची कांति दिसे आणि विशेष म्हणजे या काळांत ते नांगर ओढण्यासारखीं किंवा ओझीं वहाण्याचीं व कष्टाचीं कामेंहि सहजपणें करीत असत. मात्र बहुतेक वेळ संपूर्ण मौन व कधीं हंसणें तर कधीं रडत बसणें या गोष्टींवरून ते भ्रमिष्टच बनले आहेत अशी लोकांची कल्पना होऊन बसली. तथापि डॉ. पिल्ले किंवा त्यांच्यासारखे कोणी जाणते भक्तिमान् गृहस्थ आले तर महाराज त्यांच्याशीं ज्ञानाच्या गोष्टी मोकळेपणानें बोलत असत. ' महाराजांवर सांईबाबांची पूर्ण कृपा होऊन, महाराज पूर्ण परब्रह्म अवस्थेंत गेले ' असें सर्व भक्त व जाणते लोक समजूं लागले. भानावर असले तर महाराज स्नान-संध्या इत्यादि नित्याचीं कृत्यें त्यांच्या पूर्वींच्या ठाकठिकीनें करीत. गीता व विष्णुसहस्रनाम यांचा नित्यपाठ अशा वेळीं ते करीत. महाराज गीतापाठ करीत बसले म्हणजे प्रत्यक्षांत जवळ कोणी नसूनहि, आपल्या शेजारीं बसून आपल्याबरोबर कोणी गीतापाठ म्हणत आहे व आपण म्हणण्याचें बंद केलें तर तें शेजारीं चाललेलें म्हणणेंहि बंद पडत आहे असा अनुभव महाराजांना पुष्कळ वेळां येई. कोणी बळानें गुरु म्हणून पायां पडूं लागले तर महाराज स्पष्टपणें बजावीत कीं, " मला गुरूसारखें मानूं नका व मीहि कोणाचा गुरु नाहीं, व होऊं शकत नाहीं. "

एकदां सांईबाबांनीं मुद्दाम प्रसाद म्हणून पाठविलेला एक आंबा केवळ त्याचा वास घेऊन व नंतर डॉ. पिल्ले यांच्या आग्रहावरून एका फोडीला जिभेनें स्पर्श करून तो महाराजांनीं परत दिला व म्हणाले, " मला नसला प्रसाद तरी चालेल, परंतु आतां अन्नपाणी न खातां अखेर कसें काय होतें तें मला पहावयाचें ! " नंतर महाराजांची नाडी पाहून डॉ. पिल्ले म्हणाले, " महाराज, आपल्या हाताच्या नाडीचे ठोके एका मिनिटांत पंधरा-सोळापर्यंत येऊन ठेपले, तरी आपल्या वृत्तींत वा शरिरावर कोणत्याहि प्रकारें विपरीत चिन्हें दिसत नसून, आपली तेजोमयी मूर्ति दिसते ... पण लोक कसे आंधळे आहेत ? " त्यावर महाराज म्हणाले, " अहो, आतां पंधरा-सोळापर्यंत आले. होतां होतां एका ठोक्यापर्यंत आलें म्हणजे संपलें ! " त्यावर डॉक्टरसाहेब लगेच उद्गारले कीं, " आपलें संपणें कधींहि होणारच नाहीं. आपल्या हातून जगाचीं पुष्कळ मोठमोठीं कामें होणार अशी आमची पक्की खात्री झाली आहे. " एकदां महाराजांनीं आपल्याला मारलें म्हणून बापूसाहेब जोग यांनीं त्यांना चऱ्हाटाने बांधून ठेवलें व नंतर सांईबाबांपुढें महाराजांना उभें करून आपली तक्रार त्यांना सांगितली. त्यावर सांईबाबांनीं उत्तरादाखल इतकेंच सांगितलें कीं, " तो मोठ्या अल्लाचा आहे, त्याच्या वाटे कोणी जात जाऊं नका. "

आतां महाराज शिर्डी येथें आल्याला चार वर्षें भरत आलीं व तेथील नाना तऱ्हेच्या त्रासाला तेहि अगदीं कंटाळून गेले. इतक्यांत डॉक्टर पिल्ले यांचे एक डॉक्टर स्नेही गणपतराव पंडित यांची नागपुराजवळ शिंदी नांवाच्या गांवीं सरकारी दवाखान्यांत बदली झाली, व ते नव्या कामावर रुजू होण्यापूर्वी सांईबाबांच्या दर्शनाला आले. गणपतरावांनीं ' आमच्या घरीं येऊन रहावें व आमच्याकडून सेवा घ्यावी ' अशी विनंती डॉ. पिल्ले यांच्यामार्फत महाराजांना केली. त्यावर बराच विचार होऊन शेवटीं ' गुप्तपणें मला न्याल व गुप्तपणेंच ठेवाल तर मी तुमच्याबरोबर येण्याचें मनांत आणीन ' असा निर्णय महाराजांनीं दिला. तो त्या उभयतांनीं मान्य केला व एका रात्रीं बारानंतर बैलगाडींत बसून गणपतराव डॉक्टरांबरोबर महाराजांनीं शिर्डीचा निरोप घेतला. महाराजांची गाडी चितळी स्टेशनच्या रोखानें चालू झाली व डॉ. पिल्ले एकटेच रडत रडत

आपल्या ठिकाणावर परत आले. त्या दिवशीं श्रावण शुद्ध पंचमी, शके १८३७ (इ. स. १९१५) हा दिवस होता. या वेळीं महाराजांना सेहेचाळिसावें वर्ष सुरू होतें.

महाराज शिंदीला गेल्यावर दोन-चार दिवसांनीं ते कोठें दिसत नाहींत, कोठें गेले असावेत इत्यादि चर्चा शिर्डी येथें सुरू झाली. एकदां कोणीतरी याबाबत स्वतः सांईबाबांजवळच गोष्ट काढली, तेव्हां ते डॉ. पिल्ले यांच्याकडे हात करून म्हणाले, " या भाऊनें त्याला लपवून ठेवलें. त्याला सर्व माहिती आहे, पण तो कोणाला सांगत नाहीं. " दुसऱ्या एकानें सांईबाबांना विचारलें, " बाबा, तुमच्या म्हणण्याप्रमाणें त्यांना (महाराजांना) म्हाळसापति पावला कीं नाहीं ? " त्यावर सांईबाबांनीं उत्तर दिलें कीं, " त्यानें लई तप केलें; बारा वर्षें याहिपेक्षां कठीण असें तप त्यानें केलें होतें व चार वर्षें बाकी राहिलें होतें, तें मीं त्याचें आतां पुरें करून घेतलें. त्याच्यासारखें आहे कोणाचें ? म्हाळसापतीच काय, सर्वच त्याला पावलें. " हीं बारा वर्षें कोणतीं याचा उलगडा मात्र कोठें झालेला दिसत नाहीं.

♣ ♣ ♣

## खड्गपुरांतील गूढ जीवनक्रम : ६

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

शिंदीला गेल्यावर डॉक्टर गणपतरावांकडे कांहीं दिवस राहून महाराज डॉ. पिल्ले यांच्याबरोबर नागपुरास परत आले. पण आपल्या-बद्दल कोणाला माहिती देऊं नये अशी महाराजांची पिल्ले यांना सक्त ताकीद होती; त्यामुळें नागपुरास पंधरा दिवस त्यांना विश्रांति मिळाली. नंतर गणेशचतुर्थीच्या उत्सवाच्या निमित्तानें गणपतरावांनीं महाराजांना आग्रहानें परत शिंदीला नेलें. शिर्डी सोडण्याच्या अगोदर कांहीं दिवस महाराज रोज रात्रीं फक्त एकदां थोडी कॉफी

मात्र घेत असत, इतर कोणतेंहि अन्न वर्जच होतें. मात्र गणेशचतुर्थीच्या दिवशीं सण म्हणून गणपतरावांनीं त्यांना दोन घांस वरणभात व दोन घांस पुरणपोळी आग्रहानें खाऊं घातली; पण त्याचा परिणाम फार वाईट झाला. महाराजांच्या आंतड्यांना पचनाची संवय राहिली नव्हती, त्यामुळें रोज थोडें थोडें अन्न पोटांत जाऊं लागल्यावर मळ सांचून पोट दुखूं लागलें व शौचाला न झाल्यामुळें त्यांतून भयंकर असा मूळव्याधीचा विकार उद्‌भवला. शस्त्रक्रियेशिवाय यांतून सुटण्यास मार्ग नाहीं असें दिसतांच गणपतरावांनीं वर्ध्याच्या सिव्हिल सर्जनना शस्त्रक्रियेसाठीं बोलावलें. महाराज शस्त्रक्रियेला कबूल होते, पण क्लोरोफॉर्मशिवाय ती करीत असाल तरच करा, नाहींतर मीच काय तें करीन असा महाराजांचा निश्चय पाहिल्यावर, नाइलाजानें क्लोरोफॉर्मशिवायच शस्त्रक्रिया झाली. शस्त्रक्रियेचें काम बराच वेळ चाललें, पण तो सर्व वेळ महाराज अगदीं निश्चल पडून होते ! शस्त्रक्रिया उत्तम प्रकारें पार पडली; महाराजांचें दुःख सहन करण्याचें विलक्षण सामर्थ्य पाहून सिव्हिल सर्जनहि थक्क झाला !

थोडें बरें वाटतांच महाराज पुन्हां नागपुरास आले व डॉक्टर पिल्ले यांच्या घरीं राहूं लागले. कांहीं दिवसांनीं रोज सायंकाळीं खापरांत भिक्षा मागण्याचा उपक्रम त्यांनीं चालू केला. त्यापैकीं कांहीं अन्न ते खात व बाकीचें राहील तें सर्व लोक प्रसाद म्हणून वांटून घेत. पुढें कांहीं दिवसांनीं डॉ. पिल्ले यांचे बंधु चिन्नास्वामी दुर्गापूजेच्या सुट्टींत नागपुरास आले. ते खड्‌गपुरास नोकरीनिमित्त रहात असत. ते सात्त्विक वृत्तीचे असल्यानें त्यांची महाराजांच्या ठिकाणीं विशेष श्रद्धा जडली व त्यांनीं महाराजांनीं खड्‌गपुरास यावें अशी त्यांना विनंती केली. " महाराजांच्या मर्जीप्रमाणें वागावें व त्यांना नीट सांभाळावें " असें बंधूंना नीट बजावून डॉ. पिल्ले यांनींहि महाराजांच्या जाण्याला संमति दिली व त्याप्रमाणें आश्विन शुद्ध त्रयोदशीच्या दिवशीं खड्‌गपुरास जाण्याकरितां महाराजांनीं नागपूर सोडलें. नागपूर सोडल्यापासून तिसऱ्या दिवशीं म्हणजे आश्विन शुद्ध पौर्णिमेस महाराज खड्‌गपुरास येऊन पोहोंचले. गाडीच्या सर्व प्रवासांत महाराज एके ठिकाणीं सारखे बसून होते; खाण्याकरितां किंवा बोलण्याकरितांहि या दोन दिवसांत त्यांनीं तोंड उघडलें नाहीं.

'माझे बंधु डॉ. पिल्ले यांचे महाराज हे स्नेही असून, आजारी असल्यानें हवापालट म्हणून त्यांना इकडे आणलें आहे. त्यांचें डोकेंहि भ्रमिष्टासारखें झालेलें आहे,' अशा तऱ्हेनें आपणाबद्दल कोणी माहिती विचारल्यास त्यांना सांगावी, असें महाराजांनीं चिन्नास्वामींना पढवून ठेवलें होतें. चिन्नास्वामींहि लोकांना महाराजांची ओळख त्याप्रमाणेंच करून देत असत.

चिन्नास्वामींच्या घरीं महाराज सुमारें तीन महिने होते. या अवधींत त्यांचें सर्व वागणें शिर्डीपेक्षां निराळें खरें, पण विलक्षणच असे. 'बालोन्मत्तपिशाचवत्' या शब्दांनीं परमहंसपदावर आरूढ झालेल्या कांहीं सत्पुरुषांच्या विचित्र जीवनक्रमाचें वर्णन करतात; तोच महाराजांच्या वागण्याचा नमुना होता. ते क्षणांत चिन्नास्वामींच्या घरीं भाताचें भूस भरलेल्या पोत्याच्या गादीवर शांत पडून असत, तर क्षणांत नारसिंहावतार धारण करून व अद्वातद्वा शिव्या देऊन आणि मारहाण करून समोर आलेल्या माणसांची दाणादाण उडवून देत; क्षणांत भक्तांबरोबर ज्ञानाच्या गोष्टी बोलत, तर क्षणांत वेड्याचें सोंग घेऊन खापराच्या तुकड्यांत भिक्षा मागत गांवांत घरोघर हिंडत असत; क्षणांत कोणा व्यक्तीवर भयंकर क्रुद्ध झाल्यासारखे दिसत, तर दुसऱ्या क्षणींच सर्व राग नाहींसा होऊन अनुकंपा त्याची जागा घेई व लगेच महाराजांच्या तोंडांतून अमृतमयी वाणीचा अस्खलित ओघ सुरू होत असे! तात्पर्य असें कीं, त्यांचा जीवनक्रम या वेळीं बांधलेला असा नसे, त्यांच्या मनाच्या लहरीप्रमाणें सर्व कारभार चाले. त्यांच्या या विचित्र वागण्यामुळें प्रथम प्रथम लोकांच्या गर्दीचा त्रास त्यांना झाला नाहीं; पण झांकलेल्या कस्तुरीचा वास जसा हळूहळू सगळीकडे पसरावा तशी स्थिति होऊन महाराजांची सिद्धावस्था क्रमानें लोकांतहि प्रकट होऊं लागली. महाराजांना पूर्ण परब्रह्म समजून कांहीं लोक त्यांना त्याप्रमाणें मान देऊं लागले व पूजा वगैरेहि करूं लागले; पण महाराजांचें सर्वांना एकच उत्तर कीं, माझें डोकें भ्रमिष्ट झालेलें व मी शरिरानें अतिशय अशक्त. मी नागडाउघडा गांवभर हिंडतों व वाटेल तसे अपशब्द माझ्या तोंडून निघतात. असें असतां तुम्ही लोक दर्शनाचा लाभ व्हावा म्हणतां या गोष्टीला काय म्हणावें?

दिवाळीच्या अमावास्येला तिन्हीसांजा महाराजांनीं चिन्नास्वामींच्या घरचे बाहेरचे सर्व दिवे मालवले, पणत्या फोडून टाकल्या व सर्वत्र अंधार करून चिन्नास्वामी आणि त्यांच्या पत्नी सुवर्णाबाई यांना घराबाहेर हांकून दिलें ! नंतर थोड्या वेळानें शांत होऊन त्यांना परत बोलावलें व दिवा लावावयास सांगितला. नंतर महाराज चिन्नास्वामींना म्हणाले, “ घाबरूं नका. आज तुमच्यावर देवाची कृपा झाली. तुमच्या घरांतील खोटा उजेड देवानें घेतला व जन्मोजन्मींचे जे तुम्ही अंधारांत पडलां होतां तो अंधेर काढून टाकून जो खरा उजेड, कधीं नाहींसा न होणारा, अशा स्वयंप्रकाशाचें बीजारोपण तुमच्या ठिकाणीं आज देवानें केलें. पुढें तुमचें फार चांगलें आहे ! ”

यमुनाबाई नांवाच्या एका स्त्रीचा नवरा दुर्दैवानें थोड्या दिवसांच्या आजारानें वारला. ही यमुनाबाई महाराजांची भक्त असून, महाराजांवर तिची खरी निष्ठा होती. तिचें सांत्वन करतांना जमलेल्या सर्व बायका-मंडळींना उद्देशून महाराजांनीं प्रारब्ध-क्षयाबद्दल एक महत्त्वाचा सिद्धान्त त्यांना सांगितला. महाराज म्हणाले,

“ खरें पाहूं गेलें तर असें आहे कीं, आपल्या बायकांच्या जातीला प्रारब्ध नसतें. कारण शास्त्रांत व मुळांत पाहिलें तर आपल्या-सारख्या स्त्री-जातीला क्रियाकर्तृत्व-व्यवहार नाहीं; व प्रारब्धाची उत्पत्ति क्रियाकर्तृत्व व्यवहाराशिवाय होत नाहीं. पुरुषांच्या ठिकाणीं क्रियाकर्तृत्व-व्यवहार असतो, म्हणून पुरुष लोक आपल्या कर्मांच्या योगें प्रारब्ध बनवितात; त्याप्रमाणें भोग भोगतात व तो कर्म-भोग भोगण्यासाठीं नेहमीं जन्ममरण असतेंच. असें हें रहाटगाडगें पुरुषांचें कधीं संपत नसल्यामुळें त्यांना ईश्वरपण येऊन खऱ्या सुखाचा लाभ होत नाहीं. म्हणून त्यांना ईश्वरपण येण्याकरितां स्त्री-जातीची गरज असते. म्हणून पुरुष लोकांनीं लग्न करून बायको करावी लागते ... याच जन्मांत स्त्रीनें आपल्या पतीला परमेश्वर समजून इमानें-इतबारें खऱ्या प्रेमानें त्याच्या प्रारब्धाची सेवा करून म्हणजे त्याचें प्रारब्ध आपल्यांत मिसळून घेऊन जर त्या पतीचें सर्व प्रारब्ध खलास झालें, तर ते दोघेहि स्त्री-पुरुष प्रारब्धरहित

झाल्यामुळें परमेश्वररूप होतात. ... ते दोघेहि स्त्री-पुरुष लक्ष्मी-नारायणच समजावे. त्या स्त्रीनें पतीला प्रारब्धरहित करून परमेश्वररूप केल्यामुळें तो तिचा पति अजरामर झाला. अजरामर अवस्था परमेश्वराशिवाय आणखी कोणाचीहि नसते. ... सारांश, जोंपर्यंत प्रारब्धभोग आहे तोंपर्यंत अजरामर अशी परमेश्वरी अवस्था नाहीं, आणि प्रारब्धभोग संपला म्हणजे मनुष्यावस्था नाहीं. मग अजरामर अशी परमेश्वरी अवस्थाच नेहमीं असते. अशा स्थितींत पति अजरामर झाला म्हणून ती त्याची स्त्री अखंड सौभाग्यवती झाली. स्त्रियांना अखंड सौभाग्याची अत्यंत जरूरी आहे; आणि त्यांतच त्यांची खरी महती आहे. ”

महाराजांची ही शिकवण ऐकल्यावर, “ स्त्री काय, पुरुष काय, प्रारब्धामुळेंच तर प्रत्येकाला जन्म येतो, मग ‘ स्त्रियांच्या जातीला प्रारब्ध नाहीं ’ हें कसें ? ” असा प्रश्न कोणीहि सहजच विचारील. त्याचें उत्तर महाराजांच्याच सिद्धान्तांच्या आधारें थोडक्यांत असें देतां येईल :—

स्त्रियांना प्रारब्ध नाहीं याचा अर्थ ‘ स्त्री-अवस्थेला प्रारब्ध नाहीं.’ आमच्या तत्त्ववेत्त्यांनीं केलेल्या मांडणीप्रमाणें स्त्रीधर्माचें यथाशास्त्र आचरण झाल्यास प्रारब्ध बनूं शकत नाहीं. स्वातंत्र्याभिमान धरून जीवाकडून जो क्रियाकर्तृत्व-व्यवहार होतो त्यानें प्रारब्ध बनत असतें. तत्त्ववेत्त्यांनीं स्त्रियांच्या ठिकाणीं स्वातंत्र्य ठेवलेलें नाहीं. अर्थात् खऱ्या स्त्रीधर्माप्रमाणें स्त्रियांकडून सतत निष्काम सत्कर्म, सत्क्रिया होत राहिल्यास त्यांच्या ठिकाणीं खरी स्त्री-अवस्था उत्पन्न होते. अशा अवस्थेंत असणाऱ्या स्त्रिया स्वतःच्या प्रारब्धाचा तर नाश करतातच, पण त्याचबरोबर पतीच्या प्रारब्धाचाहि नाश करूं शकतात. अर्थातच शास्त्रनियमाप्रमाणें न वागणाऱ्या व स्वतंत्रपणें पुरुषाप्रमाणें क्रियाकर्तृत्व-व्यवहार करणाऱ्या स्त्रिया स्वतःच्या वा दुसऱ्या कोणाच्या प्रारब्धाचा नाश करूं शकणार नाहींत; कारण त्या स्वतःच प्रारब्ध निर्माण करीत असतात. महाराज सांगत असत कीं, ‘ मूळ अवस्थेंत पाहिलें तर तशीच मांडणी आहे. ’

ब्राह्मणधर्माविषयीहि महाराज असेंच सांगत. ब्राह्मणाकडून जर निःस्पृहतेनें व निष्कामतेनें सतत शास्त्रशुद्ध आचरण होत राहिलें, तर त्यायोगें तो ब्राह्मण सत्त्वगुणविशिष्ट स्त्रीप्रमाणें प्रारब्धरहित बनतो व दुसऱ्यांच्याहि प्रारब्धाचा नाश करूं शकतो. म्हणून समाजांत कर्मनिष्ठ सात्त्विक ब्राह्मण व कुटुंबा-कुटुंबांत सत्त्वगुणविशिष्ट धर्मशील स्त्रिया निर्माण होण्यांतच सर्व समाजाचा उद्धार आहे असें ते शिकवीत.

महाराजांच्या चरित्रांत ब्राह्मणधर्म व स्त्रीधर्म या दोन गोष्टींना अतिशय महत्त्व आहे. समाजांत धर्माची धारणा पक्की होण्यास सर्व ब्राह्मण आणि सर्व स्त्रिया यांनीं आपापले विहित धर्माचार पाळून, शुद्ध सत्त्वगुणाची बाजू पुरी करीत जाणें अत्यंत जरूरीचें आहे; कोणत्याहि कारणांनीं असोत, पण ब्राह्मण व स्त्रिया अधर्मानें वागूं लागल्या आणि त्यांचा धर्माचार सुटत चालला, तर ती समाजाच्या अधोगतीची निशाणीच समजावी अशी महाराजांची शिकवण आहे. तेव्हां या दृष्टीनें आणि महाराजांच्या चरित्रांत पुढें साकोरी येथें कन्याकुमारी स्थानाची स्थापना होऊन, महाराजांच्या मागें त्या धर्मपीठाची सर्व व्यवस्था श्रीसती गोदावरी यांच्याच हातीं सोंपविण्यांत आली त्या दृष्टीनेंहि, महाराजांचे वरील उद्गार अत्यंत मननीय आहेत. या ठिकाणीं महाराजांनीं जें तत्त्व सांगितलें आहे त्याचें आकलन नीट झालें, तरच साकोरी येथें महाराजांनीं पुढें जें धर्मकार्य केलें त्याचें रहस्य स्पष्टपणें उलगडेल. एका दृष्टीनें ब्राह्मणधर्म व स्त्रीधर्म यांबाबतची महाराजांची ठाम भूमिका समजून घेणें म्हणजेच महाराजांचें चरित्र खऱ्या अर्थानें समजून घेण्यासारखें आहे.

चिन्नास्वामींचें घर सोडून एक दिवस महाराज कोणाला न सांगतां एकाएकीं भागू महारणीच्या चोहों बाजूंनीं पडझड झालेल्या चंद्रमौळी घरांत रहावयास गेले. यापूर्वींहि ते भागूला तिच्या घरचें धुणें धुण्यास पुष्कळ वेळां साहाय्य करीत असत व लहर लागली तर तुझ्या घरीं येईन असें तिला त्यांनीं वचनहि दिलें होतें. महाराज भागूच्या घरीं रहावयास आले, तरी अनेक स्त्रिया व पुरुष दर्शनाला तेथेंहि येतच असत व कित्येक स्त्रिया नैवेद्यहि आणीत असत. गुरुवारीं महाराजांना स्नान घालण्यासाठींहि अनेक स्त्रिया येत; परंतु या साऱ्या गोष्टी महाराजांची लहर लागली तरच

नीटपणीं होत, नाहीं तर रागावून, शिव्यागाळी करून ते सर्वांना हांकलून लावीत असत. तरीपण त्यामुळें लोकांचें येणेंहि कमी झालें नाहीं किंवा निष्ठाहि कमी झाली नाहीं.

एकदां खड्गपूरच्या राम-मंदिरांत एका परस्थ हरिदासांचें कीर्तन चालू असतां बोलावणें आल्यावरून महाराज तेथें गेले, व तेथें पडलेला एक बूट घेऊन त्यांनीं तो हरिदासांच्या डोक्यावर भर कीर्तनांत तीन वेळां जोरानें मारला आणि आपण शिव्या देत देत तेथून निघून गेले ! हा प्रसाद मिळाल्यानें हरिदासबुवांना फार आनंद होऊन त्यांच्या डोळयां-वाटे आनंदाश्रु आले. या हरिदासबुवांनीं तेथेंच सर्व लोकांना सांगून ठेविलें कीं, " महाराज हे पूर्ण जीवन्मुक्त स्थितींत असून त्यांचे जे जे बोल तोंडांतून निघतात ते सर्व उपनिषदांतील वाक्यांच्या तोडीचे आहेत. तेव्हां त्यांचे बोल फुकट जाऊं नयेत म्हणून होईल तोंपर्यंत ते सर्वच्या सर्व बोल टिपून ठेवीत जा व रोज त्यांचें जसें जसें आचरण दिसत जाईल व ते जें जें कांहीं करतील त्या सर्वांची रोजची डायरी ठेवीत जा. " असें सांगितल्यावरून श्री. खासनीस यांनीं रोज सर्व गोष्टी लिहून ठेव-ण्याचें काम चालू केलें.

भागू महारणीच्या घरीं मुक्काम असतांनाच अनेक प्रकारांनीं गलिच्छ असलेल्या भंगीवाड्यांत महाराजांच्या फेऱ्या मधून मधून सुरू झाल्या. इतर कोठें कष्टाचें काम न दिसल्यास ते स्वतः भंग्याचें म्हणजे संडास साफ करण्याचें काम अगदीं मन लावून करीत किंवा कधीं कधीं भंगी लोकांच्या रहाण्याच्या चाळी व सभोंवारची घाण जागाहि स्वतःच्या हातांनीं स्वच्छ करीत ! लोकांनीं कितीहि नको म्हटलें, तरी महाराजांच्या या कार्यक्रमांत खंड पडला नाहीं. एकदां भक्त-मंडळींसमोर बोलत बसले असतां भागू महारीण व तिचा नवरा नामदेव यांच्याबद्दल महाराज म्हणाले, " माझ्या पूर्वजन्मांत 'ओंनामासी'चा पाढा ज्या गुरूनें मला शिकविला ... तोच हा नामदेव महार व त्याची बायको जी भागू तिच्याच रूपानें मी आहें. आतां या गुरूला व त्याच्या बायकोला म्हणजे भागूला माझ्याहिवर उद्धारगति करण्यासाठीं माझी कामगिरी आहे. ... अर्थात् तुमचाहि कांहीं ऋणानुबंध असेल म्हणून त्या नामदेव-

भागूच्या उद्धाराबरोबर तुम्हीं जर पक्कें धरूनच ठेवलें तर तुमचाहि उद्धार होऊन जाईल. तुम्हीहि खऱ्या ॐकारस्वरूपांत जाल." पुढें भागूच्या झोपडींतूनहि महाराजांचा मुक्काम हालला व या वेळींहि कोणाला न सांगतां अंगावरील एका फाटक्या पोत्याच्या तुकड्यानिशीं शके १८३८ च्या चैत्र शुद्ध पंचमीपासून ( दि. ७ एप्रिल, १९१६ ) महाराज भंग्यांच्या चाळींतच रहावयास गेले.

या वेळेपर्यंत खड्गपूरचे अनेक स्त्रीपुरुष महाजांना सत्पुरुष मानून आपापल्या मताप्रमाणें त्यांना भजत होते. त्यांतील कांहीं मंडळी तर महाराजांना पूर्ण परब्रह्म योगीपुरुष असें समजत असत. परंतु 'मी वेडावांकडा, दरिद्री, भीकमाग्या. माझ्या पूर्वकर्मांमुळें असा झालों म्हणून काय मी विरक्त आणि परब्रह्म होईन काय?' असें ठराविक उत्तर महाराज सर्वांना देत व भंग्यांच्या चाळीसारख्या घाणेरड्या जागेंत न येण्याबद्दल सर्वांना पुन्हां पुन्हां सांगत. तथापि दर्शनाला येणारे, नैवेद्य आणणारे आणि महाराजांना स्नान घालण्याकरितां येणारे यांची गर्दी मात्र सारखी वाढतच चालली. एकदां बोलतां बोलतां महाराज असें म्हणाले कीं, "ही जागा वरून अपवित्र दिसते, परंतु ही सर्वांपेक्षांहि शुद्ध आणि पवित्र समजा. या जागेचें माहात्म्य माझ्या लक्षांत येऊन गेलें. या जागेंत साक्षात् शंकराची वसति आहे ... म्हणून या व्हरांड्यांतच मी येऊन बसलों." महाराज स्वतः जरी भंग्यांच्या जागेंत रहावयास गेले, तरी भक्तांना 'तुम्ही वर्णाश्रमधर्माप्रमाणेंच बरोबर वागा' असें नेहमीं बजावीत असत.

रामनवमीच्या नंतर द्वादशीला महाराजांच्या निमित्तानें भक्त-मंडळींनीं गोरगरिबांसाठीं एक मोठा भंडारा केला. हजारों गरीब लोक तेथें जेवून शिवाय बरोबर अन्न घेऊन गेले. "ईश्वरी संकेतानेंच गोरगरिबांना अन्नदान करून प्रत्यक्ष देवानें अन्न खाल्ल्याचें पुण्य मिळतें" असें महाराजांनीं लोकांना सांगितलें. या मोठ्या भंडाऱ्यांत सुद्धां महाराजांच्या सांगण्यावरून प्रत्येकाला एक एक आणा दक्षिणा देण्यांत आली. त्या भंडाऱ्यानंतर महाराज खड्गपूरला होते तोंपर्यंत अनेक भक्तांनीं मोठमोठे भंडारे केले. महाराजांनीं अन्नदानाचें महत्त्व अनेक वेळां सांगितलेलें

असून, पुढें साकोरीला महाराज स्थायिक झाल्यावरहि अन्नदानाची प्रथा मोठ्या प्रमाणावर तेथेंहि चालू झाली.

कांहीं दिवसांनीं सीताबाई आमटे या बाईच्या सोळा सोमवारांच्या व्रताचें उद्यापन महाराजांच्यासमोर भंग्यांच्या चाळींतच झालें आणि तेथेंच ब्राह्मणांपासून भंग्यांपर्यंत सर्व लोकांनीं प्रसाद घेतला व जेवणहि केलें ! या अघटित लीलेमुळें महाराजांची कीर्ति सगळीकडे पसरली व सकाळ-संध्याकाळ त्यांच्या दर्शनाकरितां स्त्री-पुरुषांच्या झुंडी सारख्या येऊं लागल्या. एकदां एका गुरुवारीं महाराजांना स्नान घालण्यापूर्वी भंगी-वाड्यांतील सुमारें दोनशें लहान मुलींना महाराजांच्या स्त्रीभक्तांनीं बोलावून आणलें व त्यांना उत्तम प्रकारें न्हाऊं घालून हळद-कुंकू लावून, चांगलीं वस्त्रें नेसवून, त्यांना शिरा व खिचडी असें खावयास घातलें. हळुहळू दर गुरुवारच्या या कुमारी-पूजनाचा थाट वाढतच गेला. कधीं कधीं महाराजांसहि त्या मुलींच्याबरोबरच भक्तमंडळी स्नान घालीत असत. असें होतां होतां खड्गपूरच्या बहुतेक लोकांना महाराजांच्या दर्शनाचा ध्यासच लागला व त्यांना तेथें संतसमागमाच्या विलक्षण आनंदाची प्राप्ति होऊं लागली. अक्षय्यतृतीयेला अनेक आयाबायांनीं जमून महाराजांनाच गौरीसारखें सजविलें व पार्वती-गौरी म्हणून त्यांची यथासांग पूजा केली. यानंतर महाराजांच्या अगम्य लीलांची कीर्ति ऐकून बाहेरगांवचे अनेक लोकहि महाराजांच्या दर्शनास येऊं लागले व खड्गपुरास एखाद्या यात्रेचें स्वरूप येऊं लागलें.

वटसावित्रीच्या दिवशीं ब्राह्मणांच्या व इतर सर्व आयाबायांनीं महाराजांनाच वटवृक्ष समजून त्यांची यथासांग पूजा केली व मोठ्या समारंभानें त्यांच्यासमोर गाणीं वगैरे म्हणून तो दिवस मजेंत घालविला. एकदां सोनूबाई नांवाची एक मुलगी महाराजांच्या व्हरांड्यांतच रहाण्याचा हट्ट धरून बसली व घरीं जाण्याबद्दल कितीहि सांगितलें, तरी रात्रीं तेथेंच झोंपली. सकाळीं उठल्यावर ती म्हणाली " रात्रीं मला एक देखावा दिसला. एक मोठें मैदान असून तेथें अतिशय मोठा प्रकाश होता. तो प्रकाश सूर्याचा, चंद्राचा किंवा कोणत्याहि दिव्याचा नव्हता. तो कसा होता हें सांगतां येत नाहीं. त्या प्रकाशांत मी होतें तोंपर्यंत मला इतका आनंद

होत होता कीं, त्याचें वर्णन करतां येत नाहीं." सोनूबाई चार दिवस महाराजांजवळ होती, तोंपर्यंत रोज तिला या विलक्षण आनंदाचा अनुभव येत होता.

एक दिवस भंगी लोकांची एक लहान शेळी महाराजांसमोर बसली असतां ते म्हणाले, "ही शेळी रोज येथें येऊन बसत असते. हिचा कांहींतरी ऋणानुबंध असला पाहिजे. या शेळीचा महिमा साधारण नसून मोठा असावा. ... कोणी हिला शेरडी म्हणतात. मला या शेरडींत सर्व देवता दिसतात. ... ही शेरडी बसल्या बसल्या हजारों कारभार करते व हजारों ठिकाणीं तिचें गमन थोड्या वेळांत होत असतें." मंगरूळकर नांवाच्या एका गृहस्थांस शेरडी या शब्दावरून शिर्डीची व सांईबाबांची आठवण झाली. त्यावरून ते खड्गपुराहून शिर्डीला आले व येथील लोकांना महाराजांच्या लीला सांगून, "ते डॉक्टर पिळ्ळयांच्याकडून तेथें आलेले आहेत" असें सांगतांच, खड्गपूरचे महाराज म्हणजेच आपले उपासनी महाराज असले पाहिजेत असें लोकांनीं ओळखलें. मंगरूळकर खड्गपूरला परत गेल्यावर व महाराज खरे कोण आहेत हें त्यांनीं लोकांना सांगितल्यावर महाराज फार चिडले व रागावून एवढेंच म्हणाले कीं, "जें झालें तें बरें झालें. आतां या खड्गपूरचा व माझा ऋणानुबंध संपल्यासारखाच समजा."

एकदां महाराजांच्या विरुद्ध असलेले कांहीं लोक कपटबुद्धीनें रात्रीं हातांत कंदील घेऊन महाराजांच्याबरोबर बोलणें करण्यास आले. महाराज व्हरांड्यांत पुष्कळ मंडळींत बोलत बसले होते; परंतु असा चमत्कार झाला कीं, त्या लोकांनीं दोन-चार वेळां सर्व व्हरांडा तपासूनहि त्यांना महाराज किंवा कोणीहि भक्तमंडळी दिसूं शकली नाहींत ! या लोकांनीं पुढें सरकारांत अर्ज करून महाराजांच्या विरुद्ध खोट्यानाट्या गोष्टी लिहून कळविल्या. परंतु नंतर एक युरोपियन साहेब प्रत्यक्ष चौकशीला आला तेव्हां त्याचें मत महाराजांच्याबद्दल फार चांगलें झालें व अर्ज करणाऱ्या लोकांना 'तुम्ही मूर्ख आहांत' असें सांगून साहेब निघून गेला !

खड्गपूर सोडून जाण्याचा विचार मात्र महाराजांनीं कोणालाहि कळूं दिला नाहीं. कारण तेथील हजारों लोक आतां महाराजांचे एकनिष्ठ

भक्त बनल्यामुळें, उघडपणें निघून जावयाचें तर त्यांना फार त्रास झाला असता. श्रावण शुद्ध चतुर्थीच्या दिवशीं नेहमींप्रमाणें संध्याकाळीं महाराजांचें बोलणें-चालणें व खाणेंपिणें वगैरे झालें. रात्रीं महाराज व्हरांड्यांतच निजले व मध्यरात्रींनंतर पंचमीचा दिवस सुरू झाला न झाला तोंच महाराज तेथून गुप्त झाले.

♣ ♣ ♣

## मध्यंतर आणि तीर्थयात्रा : ७

* * * * * * * * * * * * *

खड्गपुराहून महाराज गुप्त झाले व त्याच वेळीं रात्रीं नागपुरास डॉ. पिल्ले यांच्या घराच्या बाहेर व्हरांड्यांत येऊन तेथें पडून राहिले. खड्गपुराहून नागपुरास येण्यास त्या वेळीं आगगाडीनें तीन दिवस लागत. अशा स्थितींत महाराज कांहीं क्षणांतच हें अंतर तोडूं शकले हा त्यांच्या योगसामर्थ्याचाच प्रभाव म्हटला पाहिजे. पुढेंहि कांहीं प्रसंगीं महाराजांचें श्रेष्ठ यौगिक सामर्थ्य प्रकट झालेलें आहे.

महाराज आल्याचें पाहून डॉ. पिल्ले व त्यांच्या कुटुंबांतील मंडळी यांना अत्यंत आनंद झाला. डॉ. पिल्ल्यांच्या घरीं महाराज जवळ जवळ श्रावण महिनाभर होते. पुढें शिंदी येथें डॉ. गणपतराव यांच्याकडे जाऊन, कार्तिक शुद्धांत महाराज नागपुरास परत आले. तेथें शंकरराव कोचिंग क्लार्क यांच्या घरीं महाराजांचा मुक्काम होता. या मुक्कामांत एका आसन्नमरण माणसावर महाराजांची कृपा होऊन, तो चार-पांच दिवसांतच हिंडूंफिरूं लागला. मार्गशीर्षअखेर महाराजांनीं नागपूर सोडून जाण्याचा निश्चय केला व चिन्नास्वामींबरोबर महाराज नागपुराहून शिंदीस जाण्यास निघाले. भक्तांच्या मोठ्या समुदायाबरोबर महाराज चालूं लागतांच पोलिसांचा एक मोठा अधिकारी महाराजांसमोर येऊन, शहरांतून नग्न जाण्याला सरकारी कायद्यानें बंदी आहे असें त्यानें महाराजांस सांगितलें. त्याच्याकडे

पाहून महाराज एवढेंच म्हणाले कीं, " मी तुम्हांस नागवा दिसतों काय ? " पोलिस-अधिकारी त्यांच्याकडे पहातो तर महाराज उत्तम प्रकारचा पीतांबर नेसलेले व चतुर्भुज मूर्ति असे त्याच्या दृष्टीस पडले ! तेव्हां महाराजांना तेथेंच साष्टांग नमस्कार घालून तो पोलिस-अधिकारी निघून गेला. शिंदीहून महाराज कोपरगांवास आले व तेथें डॉ. पिल्ले वगैरे शिर्डीहून आलेल्या मंडळींना भेटून ते पुण्यास आपल्या बंधूंकडे आले. कांहीं दिवस पुण्यास व कांहीं दिवस मुंजवाड गांवीं आपल्या धाकट्या बंधूंकडे राहून महाराज परत शिर्डीला आले. त्या वेळीं शके १८३८ च्या माघ महिन्याचा ( जानेवारी—फेब्रुवारी १९१७ ) सुमार होता.

शिर्डीस आल्यानंतर महाराजांचा मुक्काम पूर्वीप्रमाणें खंडोबाच्या देवळांतच झाला. खड्गपूरची महाराजांची लीला व तेथील चमत्कार यांवरून महाराजांची कीर्ति सगळीकडे पसरल्यामुळें, महाराजांच्या दर्शनाकरितां येणाऱ्या मंडळींची गर्दी सारखी वाढूं लागली. राहत्याचे खुशालसिंग वाणी, त्यांचे चिरंजीव दौलूशेठ, साकोरी येथील शंकर पाटील, सखाराम पाटील इत्यादि मंडळी या वेळीं नेहमीं दर्शनास येत व " बाबा आमच्या गांवाला चला " अशी ते महाराजांना वारंवार विनंती करीत. त्यांच्या विनंतीवरून महाराज मधून मधून साकोरीला एखादा दिवस जात असत. एकदां भाद्रपद महिन्यांत ते दौलूशेठच्या राहतें येथील बगीच्यांत जाऊन राहिले होते. दौलूशेठनीं महाराजांचें वर्तमान खड्गपुरास लिहून कळविलें, त्यावर " आम्हीं सर्व लोक दुर्गापूजेच्या सुटींत राहत्यास येतों " असें त्यांनीं शेठजींना कळविलें. पुढें सर्वांच्या विचारानें महाराजांच्या निमित्त आश्विनाच्या नवरात्रांत एक मोठा उत्सव-सप्ताह करण्याचें ठरलें. त्याप्रमाणें खड्गपूरचे शेंकडों स्त्री-पुरुष भक्त राहत्यास येऊन मोठ्या थाटानें हा सप्ताह साजरा झाला. आश्विन शुद्ध द्वादशीला अन्नसंतर्पण होतें, त्या दिवशीं व नंतर दोन दिवसांत मिळून सुमारें चाळीस हजार लोकांनीं सप्ताहाचा प्रसाद घेतला.

दुर्गाबाई करमरकर या नांवाच्या एक विधवा बाई सांईबाबांच्या सेवेंत पुष्कळ वर्षें होत्या व सांईबाबांची त्यांच्यावर कृपा होती. एकदां बोलतां बोलतां सांईबाबा दुर्गाबाईना म्हणाले, " त्याच्या ( उपासनी

महाराज ) हाडाचीं काडें झालीं आहेत, त्याचे हातपाय सगळे बोरूसारखे होतील. मला आतां त्याच्यांतच जावयाचें आहे. आतां माझी सेवा येथें जी तूं करते आहेस, ती तेथें त्याचीच करीत जा, म्हणजे माझी केल्या-सारखें होईल." गुरूंची ही आज्ञा शिरसावंद्य मानून पूर्वी उपासनी महाराज शिर्डीला असतांनाच त्यांना रोज नैवेद्य नेण्याचा नियम दुर्गा-बाईनीं धरला व तो अखंड चालविला. आतां महाराज राहत्यास येऊन राहिले तरी, शिर्डीहून रोज चालत येऊन दुर्गाबाई महाराजांना नैवेद्य आणीत असत. कांहीं दिवसांनीं दुर्गाबाईची स्थिति लक्षांत घेऊन, दौलू-शेठ आपल्या बैलगाडींतून त्यांना शिर्डीला पोहोंचते करीत. "तुझ्या हातून पुष्कळ मोठींमोठीं कामें व्हावयाचीं आहेत" असें सांईबाबांनीं दुर्गाबाईना सांगितलें होतें, ते त्यांचे शब्द पूर्णपणें खरे ठरले; कारण उपासनी महाराजांनीं उभारलेल्या साकोरी येथील नव्या धर्म-केंद्राची सर्व व्यवस्था अनेक वर्षे दुर्गाबाईकडे होती.

या वेळीं महाराज शिर्डीस आल्यानंतर, त्यांच्या बोलण्याचें महत्त्व जाणून कांहीं कांहीं लोक तें बोलणें लिहून ठेवूं लागले.

राहत्याचा मुक्काम संपल्यानंतर कांहीं दिवसांनीं महाराज साकोरीला गेले व तेथें एका लहानशा धर्मशाळेंत त्यांनीं मुक्काम केला. राहत्यास प्लेग उद्भवून तेथें व आजूबाजूच्या खेड्यांत प्लेगानें पटापट माणसें मरूं लागलीं; परंतु साकोरीस मात्र प्लेग झाला नाहीं. प्लेगाच्या भयानें साकोरींतील सर्व माणसें शेतांत रहावयास गेलीं, पण महाराज एकटेच गांवाच्या चावडींत राहिले. या अवधींत एका आठवड्यांत त्यांनीं सर्व साकोरी झाडून काढली. कोणीं विचारलें तर, "मी प्लेगाला झाडून टाकतों आहें," असें महाराज उत्तर देत. प्लेग संपल्यावर गांवकरी मंडळी परत घरोघर आली आणि महाराज तेथून निघून शिर्डीला खंडोबाच्या देवळांत येऊन राहिले.

येथें आल्यापासून पुन्हां दर्शनाला येणाऱ्या लोकांचा व महाराजांचा उत्कर्ष सहन न होणाऱ्या लोकांचा असा दुहेरी त्रास महाराजांना होऊं लागला. तेव्हां सांईबाबांची आज्ञा घेऊन व दुर्गाबाईस बरोबर घेऊन फाल्गुन महिन्यांत महाराज शिर्डीहून गुपचूप निघाले व मिरजेच्या

वॉनलेस साहेबाच्या दवाखान्यांत आले. तेथें महाराजांचें मूळव्याधीचें ऑपरेशन झालें व नंतर तेथीलच सरकारी दवाखान्यांत महिनाभर औषधोपचार करून थोडें बरें वाटतांच, दुर्गाबाईसह शके १८३९ च्या रामनवमीच्या (१ एप्रिल, १९१७) सुमारास कोल्हापुरास महालक्ष्मीच्या देवळांत येऊन उतरले. महाराजांनीं नऊ प्रदक्षिणा घालून जगन्मातेपुढें साष्टांग नमस्कार घातला; इतक्यांत दर्शनार्थी लोकांची गर्दी झाली, तेव्हां पुरुषोत्तम महादेव खाडिलकर यांचा पत्ता काढून महाराज त्यांच्या घरीं रहावयास गेले. पुढें ती जागा लहान पडल्यानें कुंभारस्वामींची भक्तीण येसूआक्का हिच्या माडीवर महाराज राहूं लागले व तेथेंहि शेंकडों लोक महाराजांच्या दर्शनाकरितां, पूजनाकरितां व त्यांचा उपदेश ऐकण्याकरितां गर्दी करूं लागले. तेथें सुमारें महिनाभर राहून महाराजांनीं कोल्हापूर सोडलें व ते पुणें, मुंजवाड या मार्गानें सप्तशृंग पर्वतावर श्रीअंबाबाईच्या दर्शनास गेले.

आजारी स्थितींतहि महाराज त्या डोंगराचा प्रचंड पहाड अंधार पडल्यावरहि चढून गेले. दुसऱ्या दिवशीं अष्टादशभुजा नवदुर्गादेवीची ती भव्य मूर्ति पाहून, महाराजांस प्रेमाचा उमाळा आला व ते किती वेळ तरी डोळ्यांतून अश्रु गाळीत गाळीत जगन्मातेच्या ध्यानांत निमग्न झाले. आठ-नऊ दिवस तेथें राहून, नाशिकला देवदर्शन करून महाराज चितळीला आले आणि शंकर पाटलांच्या आग्रहावरून त्या दिवशीं शिर्डीला न जातां साकोरीस मुक्कामाला राहिले. पाटलांचा आग्रह फारच वाढल्यामुळें पुढें महाराजांनीं तेथेंच मुक्काम करण्याचें ठरविलें व ते म्हणाले कीं, "ईश्वराच्या इच्छेनें म्हणा कीं सांईबाबांच्या इच्छेनें म्हणा आपल्याला दिवस काढावयाचे आहेत; आपण आपले स्वतंत्र राहिलों नाहीं. सांईबाबांनीं आपल्यासंबंधीं येथून पुढें जसेंजसें भविष्य ठरविलेलें असेल तसेंतसें होईल." लोकांचा संबंध नको म्हणून व आपल्यापासून कोणाला उपद्रवहि होऊं नये म्हणून साकोरी गांवाच्या बाहेर स्मशानभूमीमध्यें पडीत जागेंत महाराज जाऊन बसले आणि पुढें गांवच्या लोकांनीं त्यांना त्याच जागेवर एक लहान झोंपडी बांधून दिली. या झोंपडींतच महाराज व दुर्गाबाई अशीं दोघेंहि राहूं लागलीं." साकोरीच्या आजच्या प्रसिद्ध धर्मपीठाचा प्रारंभ वरील छोट्या

झोंपडीपासून झालेला आहे. या झोपडीवरच पुढे हल्लींचा मोठा सभामंडप बांधला गेला. श्रीबाबांच्या समाधीजवळ आणखीहि एक सभामंडप आहे.

महाराज साकोरीला राहूं लागतांच तेथें भक्त-मंडळी जमून मोठमोठे नामसप्ताहादि उत्सव उत्साहानें व निष्ठेनें करूं लागली; आणि दिवसानुदिवस साकोरीकडे विविध हेतूंनीं येणाऱ्या दर्शनार्थी लोकांची अखंड रीघ लागली. श्रीसांईबाबा शके १८४० मध्यें दसऱ्याच्या दिवशीं ( १५ ऑक्टोबर, १९१८ ) समाधिस्थ झाले. त्यानंतरच्या रामनवमीला साकोरी येथें एक जंगी सप्ताह करण्यांत आला व त्याच वेळीं महाराजांच्या झोंपडीसमोर भक्त मंडळींनीं एक छोटेसें देवालय करून त्यांत सांईबाबांचा व महाराजांचा फोटो आणि पादुकाहि ठेवल्या. सांईबाबांचे एकनिष्ठ भक्त श्री. कमलाकर दीक्षित यांची शिर्डी येथें सांईबाबांच्या समाधीची पूजा करण्यासाठीं नेमणूक झाली होती, पण त्यांनीं तें काम स्वतः होऊन सोडून दिलें व ते साकोरी येथें राहून नव्या छोट्या देवळांत नियमितपणें पूजा-अर्चा करूं लागले.

हळुहळू साकोरीची कीर्ति दूरवर पसरूं लागली व महाराजांच्या प्रभावामुळें लवकरच तें एक धर्मक्षेत्र बनलें. नामसंकीर्तन, अनुष्ठानें व अन्नसंतर्पण हीं तेव्हां साकोरीचीं वैशिष्ट्यें होतीं. हजारों लोक तेथें वारंवार येऊन महाराजांच्या दर्शनाचा व बहुमोल उपदेशाचा लाभ घेऊं लागले आणि तेथें चालणाऱ्या धार्मिक व परोपकाराच्या कामासाठीं पैसे देऊन वा अन्य रीतीनें मनःपूर्वक साहाय्य करूं लागले.

येथें महाराजांच्या साधकावस्थेचा वृत्तान्त संपला. श्रीसांईबाबांनीं प्रतिज्ञा केल्याप्रमाणें त्यांनीं महाराजांना पूर्ण परब्रह्म अवस्था प्राप्त करून दिली व श्रीसद्गुरुपदावर आरूढ होऊन महाराज आपल्या अलौकिक ज्ञानानें व सामर्थ्यानें जगदुद्धाराचें कार्य करूं लागले. हें श्रेष्ठ कार्य त्यांनीं सुमारें पंचवीस वर्षें केलें. परंतु तो सर्व वृत्तान्त येथें सांगणें स्थलाभावीं शक्य नसल्यानें, त्यांतील विशेष महत्त्वाच्या कांहीं गोष्टी सांगून हें चरित्र आतां आवरतें घ्यावयाचें आहे.

♣ ♣ ♣

## श्रीबाबांचें गुरुकार्य : ८

* * * * * * * * * *

साकोरीच्या परिसरांत महाराजांना 'बाबा' म्हणण्याचा रिवाज होता; म्हणून यापुढें महाराजांचा उल्लेख येथें 'बाबा' असा केला आहे.

श्रीसांईबाबा समाधिस्थ झाल्यावर सुमारें दोन वर्षांनंतर बाबा काशीला जाण्यास निघाले; परंतु ते जातांना अगदीं एकटेच होते. अंकाई, ॐकारमांधाता, उज्जयिनी या मार्गानें तें अगदीं अल्प काळांत प्रयागास पोहोंचले. तेथें एक-दोन दिवस राहून ते एका रात्रीं प्रयागास गुप्त होऊन, दुसऱ्या दिवशीं पहांटेच्या शांत वेळीं काशी येथें गंगेच्या पुलाखालीं एका एकान्त स्थळीं आले. या निवान्त स्थळीं बसून, श्रीसांईबाबांसंबंधीं व इतर महात्म्यांसंबंधीं त्यांना जें कांहीं कर्तव्य होतें तें त्यांनीं केलें. त्यासाठीं चार दिवसपर्यंत अन्नपाण्याशिवाय ते तेथें निश्चल स्थितींत बसून होते. पांचव्या दिवशीं उठून गंगास्नान करून, पुन्हां दिवसभर तेथेंच बसून त्यांनीं आपलें काम पुरें केलें व नंतर ते संध्याकाळीं शहरांत फिरावयास गेले. तेथें श्री. रामकृष्ण दीक्षित यांच्या वाड्यांत बाबा राहूं लागले व इतक्यांत साकोरीहून बाबांच्या संमतीनेंच निघालेली त्यांची पुष्कळ भक्त-मंडळी काशी येथें येऊन पोहोंचली. श्रीसद्‌गुरु सांईबाबांच्या व इतर समाधिस्थ संतांच्या प्रीत्यर्थ म्हणून, बाबांच्या भक्त-मंडळींनीं तेथें फार मोठा उत्सव केला. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून श्रीरामनवमीपर्यंत ( शके १८४३ ! ) रोज सकाळपासून बारा वाजेपर्यंत चाळीस विद्वान् वैदिक ब्राह्मण बसवून अध्यात्मरामायण, भगवद्गीता, सप्तशती, विष्णुसहस्रनाम, रामगीता यांचीं पारायणें व गायत्री-पुरश्चरण करावयाचें आणि शेवटीं शतचंडी हवन करावयाचें असें ठरलें. हा सर्व कार्यक्रम उत्तम प्रकारें पार पडला व मोठ्या प्रमाणावर अन्नदानहि करण्यांत आलें. मोठमोठ्या धनिकांना शक्य न होणारी गोष्ट बाबांच्या कृपेनें तेथें घडून आल्यानें, बाबांच्या दर्शनार्थ तेथेंहि लोकांची रीघ सुरू झाली.

पौर्णिमेनंतर बाबांनीं आपल्या भक्त-मंडळींना घरीं परतण्याची आज्ञा केली, त्याप्रमाणें लोक हळुहळू परतले, पण खासनीस तेथेंच

राहिले. त्यांना काशीक्षेत्रांत बाबांच्या चरणांजवळ बसून बोलतां-बोलतां मृत्यु आला. नंतर दुर्गाबाईंना बरोबर घेऊन बाबा गयेची यात्रा करून परत काशीस आले व पुन्हां एकान्तांत तीन दिवस राहून ते अयोध्येला गेले. तेथून निघून प्रयागाला तीन दिवस राहून, ते मनमाडावरून दौलताबादेस श्रीघृष्णेश्वराच्या दर्शनाला गेले व तेथून साकोरीला परत आले- बाबा काशीहून परत आल्याचें समजतांच साकोरीला दर्शनासाठीं अखंड यात्राच सुरू झाली.

यानंतर साकोरी येथें छायेकरितां पक्का मंडप, यात्रेकरूंना रहाण्या साठीं खोल्या इत्यादि बांधकाम सुरू झालें. या कामाच्या गडबडीमुळें बाबा दक्षिणभागीं असलेल्या स्मशानभूमींतच जाऊन बसत असत; रात्रींचेहि ते एकटेच तेथें रहात व तिकडे कोणालाहि येऊं देत नसत. पुढें लोकांनीं स्मशानांतहि बाबांसाठीं एक नवी झोंपडी बांधून दिली व मग बाबा रात्रंदिवस त्या झोपडींतच राहूं लागले. या स्मशानवासाबद्दल पुढें एकदां बाबांनीं सांगितलें कीं, " शेंकडों वर्षांच्या मेलेल्या माणसांचा या स्मशानांतून उद्धार झाला नाहीं, म्हणून ते सर्व भुतावळे होऊन येथें राहिले होते. माझ्याकडे कामगिरीच आली आहे कीं, मेलेल्या जीवांचा उद्धार करणें ... आतां त्या सर्वांना सद्गति झाली आहे, म्हणून आतां तुम्ही कोणी इकडे आल्यास कोणाला भीति नाहीं. " बाबांचें महासमाधिस्थान आतां येथेंच आहे.

सांईबाबांचे एक परमभक्त बापूसाहेब जोग साकोरी येथें कायमचे रहाण्यास आल्यावर बापूसाहेबांस असा प्रत्यक्ष साक्षात्कार झाला कीं, उपासनीबाबांचें दर्शन घेत असतां त्यांच्या जागीं ते न दिसतां सांईबाबाच दिसूं लागले व ते सांईबाबांकडे पहात आहेत, तोंच तेथें त्यांना पुन्हां उपासनीबाबा दिसूं लागले ! हा प्रकार अनेक वेळां होत असे. बाबांची ही लीला पाहून बापूसाहेब डोळ्यांवाटे आनंदाश्रु ढाळीत हात जोडून बसून रहात; पण बापूसाहेबांचें याबाबतचें म्हणणें ऐकल्यावर बाबांनीं म्हणावें, " बापूसाहेब, तुम्ही जें कांहीं म्हणतां तें मला कांहीं समजत नाहीं. ... तुम्ही जसे चारजण त्याचप्रमाणें मी एक साधारण माणूसच तर आहें. बरें, माझ्या ठिकाणीं जसें जसें, ज्याला ज्याला दिसून येईल त्याचप्रमाणें परमेश्वरहि

अनुभव देईल. " साधकांना त्यांच्या त्यांच्या निष्ठेप्रमाणें तंतोतंत अनुभव देऊनहि, कोणतेंहि कर्तृत्व स्वतःकडे न घेतां अगदीं निरहंकारी वृत्तीनें रहावयाचें व आपल्या खऱ्या योग्यतेचा शक्य तों कोणाला पत्ता लागूं द्यावयाचा नाहीं ही बाबांची खास रीत होती. तथापि बाबांच्या प्रवचनांतून आणि भक्तांच्या अनुभवांतून ही योग्यता वारंवार प्रकट होतच असे व तिकडे जाणत्या साधकांचें अर्थातच लक्ष असे.

साकोरीस राहूं लागल्यावर सुमारें दोन वर्षांनीं बाबांनीं पांडोबा मिस्त्रीकडून कोणालाहि समजूं न देतां गुप्तपणें एक लाकडी पिंजरा करवून तो आपल्या झोंपडींत बसवून घेतला व त्यांत स्वतःला कोंडून घेतलें ! ही घटना मार्गशीर्ष शुद्ध एकादशी शके १८४४ ( दि. ३० नोव्हेंबर, १९२२ ) या दिवशीं घडली. आंत-बाहेर जाण्यायेण्यासाठीं पिंजऱ्याला कोठेंहि दरवाजा अगर खिडकीहि ठेवलेली नव्हती व दर चार बोटांच्या अंतरावर लाकडी गज पक्के करून साडेतीन हात लांबीचा व सव्वा दोन हात रुंदीचा हा पिंजरा वर झोंपडीला भिडवून दिलेला होता. महाराजांना पिंजऱ्यांत अडकलेले पाहून अनेक भक्तांच्या मनाला धक्का बसला व ते व्याकुळ झाले. त्यांचीं नाना प्रकारचीं बोलणीं ऐकून बाबा इतकेंच म्हणाले कीं, " मी बाहेर होतों तेंच मला दुःखासारखें वाटत होतें, आतां पिंजऱ्यांत आहें हेंच मला बरें वाटतें. मला तरी परमेश्वरी हुकूम सुटला असेल म्हणून असें करावें लागलें असेल. ... त्याचें कारण ... मलाहि ठाऊक नाहीं. " ' किती दिवस पिंजऱ्यांत अडकलेले रहाणार ? ' या प्रश्नाला बाबांनीं उत्तर दिलें, " तेंहि मला सांगतां येत नाहीं. त्याची मुदत मला माहीत झालेली नाहीं. ईश्वराचा हुकूम होईल तेव्हां बाहेर पडेन. ... तुमच्या सर्वांच्या कल्याणाकरितांच मला अडकून घेण्याची परमेश्वरी संकेतानें पाळी आली असावी." बाबा पिंजऱ्यांतून लवकर बाहेर यावे म्हणून बाबांच्या स्त्रीभक्तांनीं लवकरच अखंड नामसप्ताह सुरू केला व अनेक सप्ताह झाले तरी भक्तांच्या उत्साहामुळें तो महिनेन् महिने चालूच राहिला. यांतूनच पुढें अहोरात्र टाळ-भजनाचा पहारा बसविण्याची कल्पना निघाली. त्याप्रमाणें अद्यापपर्यंत श्रीदत्त-मंदिरांत हा पहारा चाललेला आहे व तें साकोरीचें आजहि एक वैशिष्ट्य आहे. नामसप्ताह सुरू झाल्यावर पुढील चैत्र महिन्यांत श्रीसांईबाबांच्या

पादुकांवर चोवीस तास अखंड रुद्र, महिम्न, अथर्वशीर्ष, विष्णुसहस्र-नाम इत्यादि मंत्रावर्तनांची संततधार पुरुष भक्तांनीं चालू केली. परंतु पुढें ब्राह्मणांची संख्या कमी पडूं लागल्यानें श्रीबाबांच्या हयातींतच अखंड अभिषेकाची प्रथा बंद झाली.

सुमारें साडेचौदा महिने बाबा पिंजऱ्यांत अडकलेले होते. स्नान, खाणें-पिणें, शौचविधि, विश्रांति हे सर्व विधि पिंजऱ्यांतच होत असत ! पिंजऱ्यांत असतांना व पिंजऱ्यांतून बाहेर पडल्यानंतरहि भक्तांना उपदेश करण्याच्या निमित्तानें बाबा तासचे तास बोलत रहात असत व ते त्यांचे बोल ऐकणारांना दुःखाचा लगोलग विसर पडून स्वस्थता व शांतता लाभत असे. हैदराबादेचे प्रसिद्ध रंगराव वकील म्हणजे 'वकीलमामा' यांनीं, बाबांचे हे बोल, बाबा बोलत असतांनाच लिहून घेण्याचें काम सुरू केलें व तें अत्यंत निष्ठेनें वर्षांनुवर्षें चालविलें. वकीलमामांच्या या तत्परतेमुळेंच बाबांच्या प्रवचनांचे पांच भाग ओळीनें प्रसिद्ध होऊं शकले. बाबांची श्रीसांईबाबांच्या ठिकाणीं असलेली परम श्रद्धा ध्यानांत घेऊन, या प्रवचनांना 'सांई-वाक्सुधा' असें अन्वर्थक नांव देण्यांत आलें आहे. श्रीबाबांच्या या बोलांचें वर्णन करावयाचें झाल्यास, 'खास सच्चिदानंद अवस्थेंत साक्षात् प्रत्यक्ष अनु-भवास येणारें व तेंच आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना सहज रीतीनें व्यवहारांत असूनहि सहज समजेल अशा सोप्या भाषेंत बोललें गेलेलें ज्ञान ' असें करतां येईल. हीं प्रवचनें प्रवचनांच्या रूढ पद्धतीहून अगदीं निराळ्या प्रकारचीं असत. बाबांच्या बोलण्यांत वेदान्ताचें व अध्यात्माचें सारच जणुं सहजपणें ऐकावयास मिळे आणि श्रोत्यांच्या हृदयांत ज्ञानाचा प्रकाश पडून परमार्थांतील अतिशय कठीण सिद्धान्तहि त्यांना सुलभतेनें समजत. या प्रवचनांत अनेक श्रोत्यांच्या कितीतरी शंकांना आपोआप उत्तरें मिळून ते चकित होत व एकंदरीनें सर्वच श्रोते ज्ञानानंदांत निमग्न होत असत.

माघ शुद्ध सप्तमी ( रथसप्तमी ) शके १८४५ ( दि. १२ फेब्रुवारी, १९२४ ) या दिवशीं संध्याकाळीं बाबांनीं पिंजऱ्याला एक खिडकी करून घेतली व तेथून ते बाहेर पडले. यानंतर ते मधून मधून बाहेर पडत व बाकीचा वेळ पूर्वीप्रमाणें सारखे पिंजऱ्यांतच पडून रहात. अशाहि

स्थितींत कांहीं वर्षें गेल्यावर बाबांची जुनी झोंपडी मोडकळीस आल्यामुळें तेथें नवी झोंपडी बांधली गेली, आणि शके १८४९ च्या अखेरीस बाबा आजारी पडून नाशकास गेले, तेव्हा जुना पिंजरा मुंग्यांनीं पोखरून पोकळ केल्यामुळें त्याच जागेवर भक्त-मंडळींनीं नवा बांबूचा पिंजरा व त्याच्या बाहेर तसाच चांदीचा पिंजरा करून बसविला. शके १८४६ च्या फाल्गुनांत ( फेब्रुवारी-मार्च १९२५ ) बाबा बऱ्याच मंडळींसमवेत एकदां सकाळींच शिर्डी येथें गेले होते; तेथें श्रीसांईबाबांच्या समाधीचें दर्शन करून आणि जातां-येतां आपल्या पूर्वीच्या तपश्चर्येच्या स्थळाला म्हणजे खंडोबाच्या देवळाला भेट देऊन ते दुपारीं परत साकोरीला आले.

साकोरी येथे बाबांनीं ज्या नवीन गोष्टी सुरू केल्या त्यांत तेथील कन्याकुमारी-स्थानाची निर्मिति ही सर्वांत प्रमुख आहे. श्रीबाबा वैदिक परंपरेचे कट्टे अभिमानी व गृहस्थाश्रमांत असतांना अत्यंत आचरणशील असे निष्ठावान् ब्राह्मण होते व सर्व समाजाच्या उद्धाराकरितां, कल्याणाकरितां वैदिक परंपरेचें पुनरुज्जीवन झालें पाहिजे, म्हणजेच ब्राह्मणांनीं विहित शास्त्राचार पाळून, शुद्धसत्त्वगुण आचरून अखंड पुण्यकर्मे करीत राहिलें पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. म्हणून बाबांनीं अशा पद्धतीचे आदर्श ब्राह्मण तयार व्हावेत यासाठीं बरीच खटपट केली. पण साकोरींतल्या आचरणपद्धतीनें व तपस्यावृत्तीनें रहावयास फारसे कोणी तयार झाले नाहींत आणि जे कोणी प्रथम पुढें आले ते शेवटपर्यंत टिकले नाहींत. मात्र * " साकोरींतल्या कन्या मूलतःच अत्यंत सात्त्विक व दैवी गुणांनीं युक्त होत्या. त्यामुळें त्या वर्षानुवर्षें अधिकच कडक तपाचरणशील बनत गेल्या. तेव्हां बाबांनीं त्यांनाच आदर्श ब्राह्मण बनविलें. बाबांच्या मतें खरा विशुद्ध ब्राह्मण हा कन्या-अवस्थेंतच असतो. त्यामुळें अनायासानें उपलब्ध झालेल्या व तपाचरणास उत्सुक असलेल्या कन्यांनाच त्यांनीं ब्राह्मण्याचे अधिकार दिले आणि ब्राह्मणांचीं यज्ञयागादिक सर्व कर्मे यथासांग कशीं करावींत याचें सुयोग्य शिक्षण त्या कन्यांना देण्यांत आलें. स्वतः प्रारब्धरहित बनत सतत पुण्यकर्म करीतच रहावें व इतरांच्या प्रारब्धक्षयासहि

---

* यापुढें कांहीं ठिकाणीं मजकुराला अवतरणें घातलीं आहेत; असा मजकूर श्रीगुरुपदसेवक यांच्या वा अन्य पुस्तकांतील उतारा आहे.

कारण व्हावें; हें सर्व कर्म निष्कामबुद्धीनें व अनासक्तीनें करीत गेल्यास त्यांतूनच स्वतःचा उद्धार होऊन सर्व समाजाला सुखाची प्राप्ति होते, समाज तेजस्वी बनतो व त्यांतूनच विश्वकल्याणहि साधतें; हें तत्त्व या कन्यांच्या मनांत बिंबविण्यांत आलें." या कन्यांच्या थोर धर्मकार्याविषयींची हकीकत सांगण्यापूर्वी बाबांच्या धर्मपीठाची परंपरा उत्कृष्ट रीतीनें आजपावेतों अखंडपणें चालविणाऱ्या, सर्व कन्यांच्या प्रमुख श्रीसती गोदावरीमाता यांची थोडी माहिती सांगणें आवश्यक आहे.

♣ ♣ ♣

## श्रीसती गोदावरी व 'कन्याकुमारी स्थान' : ९

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

इ. स. १९२४ सालीं म्हणजे श्रीबाबा पिंजऱ्यांतून बाहेर पडले त्याच वर्षी, वऱ्हाडांतून हातिवलेकर नांवाचें एक ब्राह्मण कुटुंब बाबांच्या दर्शनास आलें. त्या मंडळींत गोदावरी नांवाची एक दहा वर्षांची मुलगी होती. ती मुलगी दर्शनास येतांच बाबांनीं तिची योग्यता व तिचें भावी जीवनकार्य लक्षांत आणून तिला उचलून मांडीवर घेतलें, आपल्या गळ्यांतील हार तिच्या गळ्यांत घालून तिला एक पेरू दिला, आणि सभोंवारच्या भक्तमंडळींकडे व इतर पसाऱ्याकडे बोट दाखवून ते तिला म्हणाले, "हे सर्व लोक आपलेच आहेत. हें जें सर्व आहे तें तुझेंच आहे. येथली व्यवस्था तूं पहात जा." एका दहा वर्षांच्या अजाण दिसणाऱ्या बालिकेला बाबा ही एवढी मोठी कामगिरी सांगत होते, हा वरकरणी मोठा चमत्कारच होता. तथापि बाबांनीं ज्ञानदृष्टीनें पाहून जें कांहीं सांगितलें त्यांतील अक्षरन् अक्षर महत्त्वाचें होतें. श्रीसती गोदावरीमाताजी आजपर्यंत जें थोर धर्मकार्य करीत आल्या आहेत व साकोरीच्या स्थानासंबंधीं त्यांनीं जें विशेष जोखमीचें काम यशस्वी रीतीनें पार पाडलें आहे तें पाहिलें असतां, पूर्ण अवस्थेंतील सत्पुरुषांच्या दैवी वाणीचें सामर्थ्य प्रत्ययास

येतें. माताजींच्या बाबतींत श्रीबाबांनीं अनेक वर्षांपूर्वीं सांगितलेल्या गोष्टी अक्षरशः खऱ्या ठरलेल्या आहेत.

" कुमारी गोदावरी हातिवलेकर साकोरीला आली आणि साकोरीची स्वामिनी बनून कायमची तेथेंच राहिली. श्रीबाबांनीं महिन्या-दोन महिन्यांतच या दहा वर्षांच्या मुलीचें लग्न श्री. विष्णुपंत चांदोरकर नांवाच्या अनुरूप वराशीं लावून दिलें. याप्रमाणें ही मुलगी कुमारी व सुवासिनीहि बनली. पारमार्थिक दृष्टीनें श्रीबाबांना ती सुवासिनी बनणें फार आवश्यक वाटत होतें. तथापि गोदावरी सासरीं अशी कधीं गेलीच नाहीं; सतत श्रीबाबांच्या सेवेला राहिली. श्री. विष्णुपंत नेहमीं परगांवीं म्हणजे मुंबईला असत."

कांहीं कालानंतर गोदावरीची तीव्र तपश्चर्यावृत्ति पाहून तिला बाबांच्या सेवेलाच अर्पण करावें असे विचार विष्णुपंतांच्या मनांत येऊं लागले. त्याप्रमाणें शके १८४९ च्या फाल्गुन महिन्यांत (मार्च १९२८) बाबा हवा पालटण्याकरितां नाशिक-पंचवटीस गेले असतां, विष्णुपंतांनीं सर्वांसमक्ष हातांत तुलसीदल व पाणी घेऊन यथाविधि गोदावरीस बाबांच्या चरणांवर अर्पण केलें व तिला मातुःश्री समजून तेथेंच साष्टांग नमस्कार घातला! पण ही गोष्ट आपल्या अंगावर न घेतां बाबा म्हणाले, "तुमच्या दोघांचा इतका दृढ निश्चय होऊन जर तुम्हीं पाणीच सोडलें आहे, तर त्याचें पुण्यफल देण्यास माझा अधिकार नाहीं. म्हणून याची पूर्णता होण्यास माझ्याहिपेक्षां काय, पण सर्व त्रिभुवनांत श्रेष्ठ, बारा ज्योतिर्लिंगांपैकीं 'जागृत' असें त्र्यंबकेश्वराचें स्थान जवळच आहे, तेथें जाऊन त्याच्या पिंडीवरच हिला अर्पण करून द्या व तिचें सौभाग्य हातांत पाणी घेऊन त्या पिंडीवर सोडून द्या. म्हणजे सर्व त्रिभुवनाचा जो साक्षात् प्रत्यक्ष परमात्मा त्याची ती झाली व त्याच्याच कारणांत आणि जगाच्या कल्याणासाठीं तिचा उपयोग होईल. पुढें मी या आजाराच्या अत्यवस्थ स्थितींतून जगलों-वांचलों, तर मजकडून योग्य त्या रीतीनें सांभाळ करून तिचा जसा पुढील भावी योग असेल त्याप्रमाणें ईश्वरी मार्गांत तिला लावण्याची व्यवस्था करतां येईल." पुढें बाबांच्या सांगण्याप्रमाणें त्याच दिवशीं त्र्यंबकेश्वराच्या मंदिरांत जाऊन विष्णुपंतांनीं गोदावरीस ईश्वरार्पण

केलें. तो दिवस शके १८४९ मधील फाल्गुन वद्य एकादशीचा ( रविवार, १८ मार्च, १९२८ ) होता.

शके १८५० चा चैत्र महिना ( इ. स. १९२८ ) संपण्याच्या सुमारास उरण येथील स्वामी जीवन्मुक्त महाराज बाबांच्या समाचारास आले होते. त्या वेळीं परस्पर दर्शनें झाल्यावर बाबांची सेवा करणाऱ्या गोदावरीकडे पाहून स्वामीजी म्हणाले, " महाराजांची चांगली सेवा करीत जा. तुझ्यावर परमेश्वराची कृपा होऊन तुझें फार कल्याण होईल. " ज्येष्ठ शुद्ध एकादशीस गोदावरी त्र्यंबकेश्वराच्या मंदिरांत दर्शनास गेली असतां, तेथें त्र्यंबकेश्वराच्या पिंडीस वाहिलेली बारीक रुद्राक्षांची माळ तेथील ब्राह्मणानें गोदावरीच्या हातांत दिली व तिला ती गळ्यांत घालण्यास सांगितलें. घरीं आल्यावर गोदावरीनें ती माळ बाबांना दाखविली व सर्व हकीकत त्यांना सांगितली. तेव्हां बाबा म्हणाले, " आज तुझ्यावर साक्षात् ज्योतिर्लिंग परमेश्वराचा प्रसाद होऊन तुला ही माळ मिळाली. तुझें मंगलसूत्र शंकराच्या पिंडीवर अर्पण झालें व त्याच शंकराच्या पिंडीवरची रुद्राक्षाची माळ तुझ्या गळ्यांत आली. यावरून साक्षात् परमेश्वरानेंच तुझा अंगीकार केलेला आहे व म्हणून तुझा अधिकार फार मोठा होईल. " इतकें बोलल्यावर महाराजांनीं ती माळ स्वतः गोदावरीच्या गळ्यांत घातली.

बाबांचे एक भक्त श्री. सुंदरराव काशिनाथ वर्दे यांची अकरा-बारा वर्षांची मुलगी प्रेमाबाई ही बाबा साकोरीला असतांनाच आईबापां-कडून वाचादत्त म्हणून त्यांच्या चरणीं अर्पण केलेली होती. पुढें तिचाहि यथासांग अर्पणविधि झाला.

साकोरीला परत आल्यानंतर आरतीच्या वेळीं गोदावरीहि पिंजऱ्यांत बाबांच्याबरोबर बसूं लागली. नंतर एकदां स्वतः बाबांनींच आपला अधिकार गोदावरीला दिल्याचें सर्वांना स्पष्टपणें दर्शवून तिला गादीवर बसविलें ! या गोष्टीवरून गोदावरीचा पारमार्थिक अधिकार केवढा मोठा आहे हें भक्त-मंडळींना समजून चुकलें आणि बाबांच्या पीठावरील उत्तराधिकारी तीच आहे हेंहि स्पष्ट झालें. यापुढें गोदावरीला भक्त-मंडळी 'सती गोदावरी' व नंतर 'माताजी' असें म्हणूं लागली ! आपणहि त्यांना आतां 'माताजी' असेंच म्हणणें योग्य होईल.

" श्रीसती माताजी या बालपणापासूनच अत्यंत सात्त्विक, मौनप्रिय व कडक तपाचरणप्रिय होत्या. त्यांचा आदर्श इतर कन्यांपुढें असे. श्रीबाबांच्या प्रोत्साहनानें, त्यांच्या कडक शिस्तींत व मार्गदर्शनाखालीं य सर्वच कन्या तपश्चर्यासंपन्न बनत गेल्या; यावरून त्यांचें पूर्वार्जित पुण्य खरोखरी मोठें असलें पाहिजे. ... या कन्या जसजशा मोठ्या होऊं लागल्या तसतशी त्यांच्या शिक्षणाची सोयहि साकोरी येथें लावण्यांत आली. या मुलींना प्रथम संस्कृत भाषा शिकविण्यांत येऊन, नंतर षोडशोपचार पूजेसारखीं नित्याचीं धार्मिक कृत्यें यथाशास्त्र कशीं करावीं याचें शिक्षण देण्यांत येई; नंतर यथाकाल हळुहळू वेदविद्येचा अभ्यासहि सुरू होई. यज्ञासंबंधींचे सर्व मंत्र व तंत्र तर त्यांना अतिशय काळजीनें शिकविण्यांत येत. तेथील अनेक कन्यांचें हें सात्त्विक व तपश्चर्यासंपन्न असें जीवन पाहून, नवीन येणाऱ्या अनेक कन्यांना आपणहि सर्वस्वाचा त्याग करून असेंच परमार्थसाधनाच्या आनंदांत रहावें असें वाटे.

तथापि लवकरच देवदासी-कायदा पास झाला आणि पूर्वीप्रमाणें चालत आलेल्या अर्पणविधीची ( श्रीकृष्णाच्या मूर्तीशीं लग्न करून ईश्वरार्पण होण्याची ) सोय राहिली नाहीं. यावर कांहींतरी तोड काढणें आवश्यक वाटूं लागलें. तेव्हां श्रीबाबा हे परमेश्वरस्वरूपच आहेत या अगोदरपासून दृढ होत गेलेल्या समजुतीप्रमाणें मग अर्पण होऊं इच्छिणाऱ्या कन्यांचीं लग्नें श्रीबाबांशींच लावण्यांत आलीं. यांत त्या कन्यांच्या पुढील आयुष्याला सामाजिक व नैतिक दृष्टया स्थैर्य प्राप्त व्हावें हाहि एक व्यावहारिक हेतु होता. "

या ठिकाणीं कन्यांच्या अर्पणविधीबद्दल थोडा खुलासा करणें जरूर आहे. कोणत्याहि क्रियाकर्तृत्वाची बाजू, कोणताहि अहंकार बाबा स्वतः-कडे कधीं घेत नसत. म्हणून तपस्विनी होऊं इच्छिणाऱ्या कन्यांचा ब्रह्म-तत्त्वाशीं संबंध जोडतांना प्रथम श्रीकृष्णाच्या मूर्तीची मध्यस्थी बाबांनीं ठेवली. परंतु पुढें यावरूनच श्रीबाबांच्या निंदकांनीं अनेक कारवाया केल्यामुळे व देवदासी कायदा पास झाल्यामुळें, मध्यस्थी काढून टाकून जगाच्या व्यवहारापासून पूर्ण अ-लिप्त झालेल्या बाबांनाहि कन्यांचे संबंध तत्त्वासाठीं कां होईना पण स्वतःशींच जोडणें भाग पडलें. श्रीकृष्णाला

तीन-चारच कन्या अर्पण झालेल्या होत्या, परंतु तोहि सर्व व्यवहार कायद्याच्या चौकटींत बसविण्याच्या दृष्टीनें त्यांचे आणि नवीन आलेल्या कन्यांचेहि विवाह श्रीबाबांशींच लावण्यांत आले.

अशा रीतीनें हें कन्याकुमारी-स्थान स्थापन करून व त्याच्या संचलनाची पक्की व्यवस्था करून वेदविद्या, यज्ञोपासना आणि ब्राह्मण्य यांच्या जोपासनेची, अन्यत्र कोठेंहि न आढळणारी अशी सोयच बाबांनीं करून ठेवली. यावरून बाबांच्या एका चरित्रकारानें त्यांना 'क्रांतिकारक सत्पुरुष' असें म्हटलें आहे तें योग्य वाटतें.

"पुढें श्रीबाबांनीं साकोरीला प्रथम स्वतः गणेशयाग केला. ... याचा परिणाम म्हणूनच कीं काय पुढें साकोरींत अखंड यज्ञपरंपराच सुरू झाली. रामयाग, गणेशयाग, चंडीयाग, सूर्ययाग, विष्णुयाग व रुद्रयाग असे यज्ञ ठराविक वेळीं वर्षभर साकोरींत नियमितपणें होत रहावेत अशी प्रथा सुरू झाली. श्रीबाबांच्या कडक शिस्तींत सर्व कन्या यज्ञकर्मांत प्रवीण बनल्या. पुढें पुढें साकोरींतील व बाहेरच्या ठिकाणचेहि सर्व यज्ञयाग या कन्याच शास्त्रशुद्ध रीतीनें स्वतंत्रपणें करूं लागल्या! अशा तऱ्हेची अखंड यज्ञोपासना हेंहि साकोरीचें एक खास वैशिष्ट्य आहे. साकोरींतील कन्यांकडून हे जे यज्ञयाग होत असतात, ते केवळ सर्व जगाच्या कल्याणासाठींच होत असतात. कारण त्यांत कोणताहि कामनिक हेतु नसावा, अशीच शिकवण श्रीबाबांनीं देऊन ठेवली आहे."

साकोरींत कन्यांच्या हस्तें यज्ञयागादिक धर्मकृत्यें सुरू होण्याच्या सुमारास तेथें देवतार्चन, यज्ञयाग, नामसप्ताह, वेदाध्ययन इत्यादिकांची एकच गर्दी उसळली व साकोरी हें एक पुण्यक्षेत्रच बनून यात्रेकरूंचा अखंड असा ओघ तेथें सुरू झाला. लोकांची गर्दी इतकी वाढली कीं, तेथें चालू असलेल्या परमेश्वरी कार्याच्या दृष्टीनें ती एक उपाधीच वाटूं लागली; तेव्हां एका अगदीं अनपेक्षित घटनेनें ही उपाधि हळूहळू कमी झाली. श्रीबाबांनीं कन्यांशीं जे विवाह केले त्यांविरुद्ध आणि त्यांच्या कन्याकुमारी-स्थानाच्या कार्याविरुद्धहि समाजांतील स्वतःला बुद्धिमान् व म्हणून सर्वज्ञ समजणाऱ्या अज्ञानी लोकांनीं टीकेची झोड उडवून दिली आणि बाबांच्या विरुद्ध सर्वथैव खोटा आणि वेडावांकडा प्रचारहि सुरू केला. समाज-

सुधारणेची कड घेऊन ही मंडळी एका थोर समाजोद्धारकावरच तुटून पडली. शेवटीं त्याची परिणति सर्वसंगपरित्याग करून परमहंस अवस्थेंत अखंड आनंदांत असणाऱ्या बाबांवर फिर्याद करण्यांत झाली! परंतु त्यांत निंदकांची फटफजिती होऊन श्रीबाबांच्या सत्कीर्तीचा परिमल सगळीकडे पूर्वीपेक्षां अधिक दरवळूं लागला. या सर्व वावटळींतहि स्वतः बाबा त्यांच्या निंदकांबद्दल क्षमाशीलच राहिले. समाजांत वरकरणीं ढोंग दाखवून, देवाच्या नांवावर दुराचार करणारे कोणी लबाड असतातच; त्यांचें सत्य स्वरूप लोकांना कळावें म्हणून अशा निंदकांचीहि जरूर असतेच असें ते म्हणत. यासंबंधीं, खड्गपुरास असतांना अशाच एका प्रसंगीं बाबांनीं सांगितलेला सिद्धान्त महत्त्वाचा आहे. "ते विरुद्ध जे लोक झाले तशा विरुद्धांची जरूरीच असते. विरुद्धाच्या योगानें सुरुद्ध बाजू पक्की होत जात असते. ते जसजसा विरुद्धपणा करीत जातील व तुम्ही त्यांना जुमानीत न गेलां म्हणजे तुम्ही पक्के झालां व तो पक्केपणा त्या विरुद्धांमुळेंच होत असल्यानें, विरुद्ध लोकांचेंहि कल्याण आहे. म्हणून आम्हांला दोन्ही सारखेंच आहे!" निंदकांच्या आरडाओरडीचा एक फायदा असा झाला कीं, त्यामुळें अभक्तांचा फापटपसारा पार उडून गेला व कांहीं नवे सद्भक्त आणि पारमार्थिक अधिकारी साकोरीकडे ओढले गेले.

♣ ♣ ♣

## महासमाधि : १०

* * * * * * *

असाधारण कडक अशी तपश्चर्या करून बाबांनीं साधनांची परम सीमा गांठली, व श्रीगुरुपदावर आरूढ होऊन त्यांनीं सुमारें पंचवीस वर्षें धर्मजागृतीचें श्रेष्ठ कार्य केलें. त्यांच्या कृपेचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन धन्य झालेली हजारों भक्त-मंडळी महाराष्ट्रांत व भारतांत इतरत्रहि आहेत. स्वतःला कशाचीहि जरूर राहिलेली नसतांना केवळ पोत्याचा एक तुकडा

अंगावर घेऊन वर्षानुवर्षें जगावर बोधामृताचा अखंड वर्षाव करणारा हा महापुरुष ही अर्वाचीन महाराष्ट्राला लाभलेली एक ईश्वरी देणगीच होय यांत शंका नाहीं.

" हजारों-लाखों लोकांनीं त्यांच्या दर्शनाचा लाभ घेतला. सर्व धर्मांचे व सर्व जातींचे असंख्य स्त्री-पुरुष त्यांचे भक्त बनले. श्रीबाबा सर्वव्यापी व सर्वसाक्षी आहेत अशी त्या सर्वांची श्रद्धा होती व कांहींचा तसा अनुभवहि होता. आयुष्यभर श्रीबाबांनीं या सर्वांना सद्धर्मानें व आचरणशीलत्वानें वागत रहाण्याचाच उपदेश केला. असें वागत रहाणाऱ्या सद्भक्तांना त्यानीं सांगून ठेवलें आहे कीं,

> " मी अखंड व शाश्वत सुखांत अजरामर अवस्थेंत आहें. जेथें मी तेथें तुम्ही. तुमच्या पितरांसह तुम्हां सर्वांचा उद्धार होऊन तुम्ही माझ्या ठिकाणीं येऊन पोहोंचणार आहांत असें निश्चयानें समजा ! "

श्रीबाबांनीं मृत्युपत्र सांगतांना, त्याचा शेवट या वाक्यांनींच केलेला आहे व बाबांच्या वेळी आंब्याच्या झोंपडीवर हीं वाक्यें संगमरवरी दगडांत खोदून ठेवल्यामुळें सद्भक्तांना तो त्यांचा अमर संदेशच झाला आहे.

" कन्यांसह बाबांनीं अनेक ठिकाणीं प्रवास केला. श्रीक्षेत्र काशी, हैदराबाद, नागपूर, सुरत इत्यादि ठिकाणीं त्यांचे आश्रमहि स्थापन झाले. समाधीपूर्वी कांहीं महिने बाबा आळंदीला श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या दर्शनालाहि येऊन गेले. सटाणें व साकोरी येथें श्रीबाबांच्या हातून सुंदर देवालयें बांधलीं गेलीं, व साकोरीच्या धर्मपीठाची आदर्श परंपरा चालू रहाण्याचीहि व्यवस्था झाली. ... श्रीबाबा सन १९४१ च्या दिवाळीनंतर, प्रवासास बाहेर पडले व शेवटीं सटाणें येथील देवालयांत श्रीरामचंद्र, श्रीहनुमान यांची व बारा ज्योतिर्लिंगांची स्थापना करून घाईघाईनें साकोरीस परत आले. त्याच रात्रीं छातींत कळ येऊन श्रीबाबांची प्रकृति अस्वस्थ झाली व दुसऱ्या दिवशीं शके १८६३ च्या पौष शुद्ध सप्तमीला बुधवारीं ( २४ डिसेंबर, १९४१ ) सकाळीं आठ वाजण्याच्या सुमारास आपला कारभार श्रीमाताजींच्या हातीं देऊन, श्रीबाबांनीं आपल्या नश्वर

देहाचा निरोप घेतला. ... त्यांचा देह साकोरी-सिद्धपीठांतील पिंजऱ्या-पुढील समाधिस्थानांत उतरविण्यांत आला व त्या समाधिस्थानावर निर्गुण पादुकांची स्थापना झाली. ”

♣ ♣ ♣

## ग्रंथरचना आणि शिष्यसंप्रदाय : ११

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

ज्या मालेंत हें पुस्तक प्रसिद्ध होत आहे त्या ‘संतचरित्रमाले’च्या पद्धतीप्रमाणें आतां श्रीबाबांच्या ग्रंथरचनेचा आणि शिष्य-संप्रदायाचा विचार केल्याशिवाय या चरित्राला पूर्णता येणार नाहीं.

“ श्रीबाबांनीं कोणते ग्रंथ लिहिले ? ” या प्रश्नाला “ त्यांनीं एकहि ग्रंथ लिहिलेला नाहीं ” असेंच उत्तर द्यावें लागेल. परंतु ग्रंथरचनेनें जें उद्दिष्ट साध्य करावयाचें तें श्रीबाबांच्या प्रवचनांच्या पुस्तकांनीं निःसंशय साध्य झालेलें आहे. श्रीबाबांनीं प्रसंगानुसार वेळोवेळीं आपल्या भक्त-मंडळींना जो उपदेश केला, तो लिहून घेण्याचें काम अनेक भक्तांनीं तत्परतेनें वर्षानुवर्षें केलें, आणि त्यांच्याच उद्योगामुळें श्रीबाबांचीं अनुभवानें आणि ज्ञानानें पूर्ण भरलेलीं अशीं शेंकडों प्रवचनें आज लोकांना उपलब्ध झालीं आहेत. श्री. रंगराव वकिलांसारख्या प्रवचन-लेखकांचे हे बाबांच्या भक्त-मंडळींवर मोठेच उपकार आहेत यांत शंका नाहीं. त्यांनीं हीं प्रवचनें लिहून घेतलीं नसतीं तर श्रीबाबांच्या शिकवणीचा अभ्यास करणें सर्वथा अशक्य झालें असतें.

आपले गुरु श्रीसांईबाबा यांच्याविषयीं बाबांना अर्थातच परा-कोटीचा प्रेमादर असे व तो बाबांच्या बोलण्यांतूनहि अनेक वेळां प्रकट होई. स्वतःच्या हातून होणाऱ्या सर्व गोष्टींचें कर्तृत्व श्रीसांईबाबांकडे आहे अशीच त्यांची धारणा असे, व ती ते बोलूनहि दाखवीत. तेव्हां प्रवचनांतील त्यांची शिकवण हीसुद्धां सांईबाबांचीच वाणी आहे अशा रास्त विश्वासानें

बाबांच्या प्रवचनांना भक्त-मंडळींनीं 'श्रीसांई-वाक्सुधा' असें नांव सहेतुकच दिलेलें आहे; या वाक्सुधेला 'सर्व-शास्त्र-सिद्धान्त' असेंहि एक पर्यायी नांव दिलेलें आहे, त्यावरून बाबांच्या शिकवणीचें क्षेत्र किती व्यापक व खोल आहे हें सहज लक्षांत येईल. 'श्रीसांई-वाक्सुधा' या ग्रंथाचे एकंदर पांच भाग प्रसिद्ध झालेले असून, यांचेंच रूपांतर पुढें 'श्रीउपासनी-वाक्सुधा' या ग्रंथांत अध्यायवार केलेलें आहे. हे सर्व ग्रंथ बरेच विस्तृत असल्यामुळें, या ग्रंथांतील सिद्धान्तांचा आणि शिकवणीचा नव्या पिढीला सूत्ररूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचा प्रयत्न कोणीं केल्यास तो स्वागतार्ह ठरेल. आपल्या वैदिक धर्माचें रहस्य सहज व थोडक्यांत समजण्यास अशा संक्षिप्त ग्रंथाचा निःसंशय मोठाच उपयोग होईल.*

बाबांच्या शिष्यसंप्रदायाचा विचार करूं लागल्यास येथेंहि, त्यांच्या ग्रंथरचनेबद्दल वर जें म्हटलें आहे तसेंच कांहींतरी उत्तर द्यावें लागेल. कारण 'मी कोणाचा गुरु नाहीं व माझा कोणी शिष्य नाहीं' असेंच बाबा नेहमीं सर्वांना सांगत असत. तेव्हां ज्या शेकडों-हजारों लोकांना बाबांकडून पारमार्थिक मार्गदर्शनाचा लाभ झाला ते सर्व त्यांचे भक्त होते, शिष्य नव्हते, असेंच म्हणावें लागेल. परंतु हें म्हणणें शब्दार्थाप्रमाणें बरोबर झालें. मी कानांत उपदेश देणारा गुरु नाहीं असें सांईबाबांनीं एका भक्ताला बजावलें होतें, तोच प्रकार श्रीउपासनीबाबांच्या शिकवणींतहि दिसतो. त्यांनीं गुरुत्व पत्करलें नसलें तरी गुरुपदावर आरूढ झाल्यानंतरचीं त्यांचीं प्रवचनें म्हणजे ज्ञानोपदेशाचा अखंड वर्षावच होय. कोणींहि श्रद्धेनें तो आत्मसात् करावा व कृतार्थ व्हावें अशी स्थिति आहे. तेव्हां त्यांच्या उपदेशाप्रमाणें आचरण करणारे त्यांचे भक्त हे त्यांचे शिष्यच झाले असें हवें तर म्हणावें.

परंतु या सर्व भक्त-मंडळींत किंवा शिष्य-मंडळींत श्रीसती गोदावरी माताजी यांचें स्थान अद्वितीय आहे यांत कांहींच शंका नाहीं. त्यांना

---

* हीं सर्व पुस्तकें व्यवस्थापक, श्रीकन्याकुमारी स्थान, साकोरी, पो. राहता, जि. अहमदनगर यांच्याकडे विकत मिळतील.

श्रीबाबांच्या शिष्या म्हणावें किंवा दुसरें कांहीं म्हणावें, पण अधिकारी सत्‌शिष्य आपल्या गुरूबद्दल जें कांहीं कर्तव्य समजतो व करून दाखवितो तें सर्व माताजींनीं उत्कृष्टपणें करून दाखविलें आहे. तेव्हां येथें त्यांच्या कार्याबद्दल थोडा विचार करणें अस्थानीं होणार नाहीं.

श्रीमाताजींच्या चरित्रांतील, त्यांच्या बालपणापासून तों श्रीबाबांच्या समाधिकालापर्यंतच्या काळांतील ठळक घटनांचा उल्लेख मागें येऊन गेलाच आहे. श्रीबाबांनीं आपल्यामागें माताजींनाच सर्व अधिकार देऊन, त्यांना साकोरी धर्मपीठाच्या प्रमुख म्हणून नेमलें. व्यवहारतः मिळालेला हा अधिकार आणि तत्पूर्वीच श्रीबाबांच्या अनुग्रहामुळें व प्रत्यक्ष शिकवणुकीमुळें साध्य झालेली पारमार्थिक योग्यता यांसुळें श्रीमाताजींना एक विशिष्ट स्थान प्राप्त झालें, व या परंपराप्राप्त गुरुपीठावर बसून गेलीं वीस वर्षें माताजींनीं आपल्या गुरूंचें धर्मजागृतीचें कार्य उत्तम प्रकारें चालविलें आहे.

वऱ्हाडांतील शेगांवच्या श्रीगजानन महाराजांनीं श्री. हातिवलेकर या आपल्या भक्ताला अगोदर सूचना देऊन मुलीच्या रूपानें त्यांच्या घरांत जन्म घेतला. श्रीगजानन महाराज नेहमीं 'गंगा-गोदा' असें भजन करीत असत, त्यावरून या मुलीचें नांव 'गोदावरी' असें ठेवण्यांत आलें. या माहितीवरून व माताजींच्या पुढील प्रत्यक्ष चरित्रावरून त्या श्रीगजानन महाराजांचा अवतारच आहेत अशी भाविकांची श्रद्धा आहे.

श्रीबाबांचें कार्य पुढें चालविण्याचें काम श्रीमाताजीच करीत आल्या आहेत. या घटनेला उद्देशून श्री. गुरुपदसेवक यांनीं लिहिलें आहे कीं, बाबा त्रिगुणातीत अवस्थेंत असल्यानें त्यांना स्वतःला कांहींच करण्याची जरूरी व शक्यताहि राहिली नव्हती. पण त्यांच्या व त्यांच्या वंशांतील अनेक व्यक्तींच्या पुण्य-फल-संपत्तीचा उपयोग जगाच्या कल्याणासाठीं करण्याकरितांच माताजींचें आगमन साकोरी येथें झालें; व त्या संचित पुण्यफल संपत्तीचा विनियोग करून, त्या गुरुकार्यपरंपरा पुढें चालवीत आहेत. जाणत्या अभ्यासकांनीं या मुद्दयाचा विचार करण्यासारखा आहे.

"श्रीबाबा माताजींना म्हणत कीं, 'तुझ्या चेहऱ्याकडे पाहिलें म्हणजे श्रीदत्ताचेंच दर्शन होतें, व पायांकडे पाहिलें म्हणजे ते अखंड दिसतात.' श्रीबाबा इतकें म्हणूनच थांबले नाहींत, तर त्यांनीं श्रीदत्ताची

एकमुखी मूर्ति बनवून घेतली ती माताजींच्या स्वरूपावरून बनवून घेतलेली आहे, व साकोरींत श्रीदत्तमंदिरांत तीच मूर्ति आज अधिष्ठित आहे. "

माताजी स्वभावानें अबोल आहेत. त्या प्रवचनें वा व्याख्यानें करीतच नाहींत; परंतु सदैव उपासनामग्न असल्यामुळें साकोरींत वा अन्य ठिकाणींहि त्यांच्याशीं प्रत्यक्ष बोलण्याचा योग भक्तांना क्वचितच येत असतो. तथापि त्यांनीं चालविलेला एखादा याग पहाण्याची संधि मिळाल्यास साधकाच्या दृष्टीनें तेथें अनेक प्रवचनांचें काम थोड्या वेळांत होतें ! आपल्या सहकारी तपस्विनी कन्यांसह शास्त्रशुद्ध रीतीनें, अस्खलित वेदमंत्रांच्या घोषांत टापटिपीनें व तन्मयतेनें मोठमोठे याग पार पाडणाऱ्या माताजींकडे पहातांच ही कोणी पुराणकालीन भारतीय योगिनीच धर्मकार्याकरितां पुन्हां अवतीर्ण झाली कीं काय असें वाटून सामान्य साधकच नव्हे, तर विद्वान् ब्राह्मण व अनुभवी पारमार्थिकहि अत्यंत आनंदित व विनम्र होतात. ज्या कोणाला यज्ञसंस्थेचें महत्त्व जाणून घ्यावयाचें असेल त्याला तें सहजतेनें जाणून घेण्याची सोय साकोरी येथें सुदैवानें आजहि उपलब्ध आहे.

गुजराथेंतील १२० वर्षांचे धर्माचार्य श्रीहंसदेवजी महाराज यांनीं श्रीमाताजींचें कार्य पाहून धन्योद्गार काढले आहेत. हे स्वामी साकोरी येथें मुद्दाम कांहीं दिवस येऊन राहिले होते. श्रीक्षेत्र काशी येथील सनातनी पंडितांनीं प्रथम स्त्रियांना वेदाधिकार नाहीं या मुद्द्यावर माताजींच्या यज्ञकार्याला विरोध दर्शविला; पण प्रत्यक्ष त्यांचें यज्ञकार्य पाहिल्यावर त्यांनींहि माताजींच्याबद्दल अत्यंत गौरवाचे उद्गार काढले.

♣ ♣ ♣

## यात्रिकांसाठीं माहिती : १२

* * * * * * * * * * * *

**मार्ग** :– साकोरीस रेल्वेनें जावयाचें झाल्यास मध्य रेल्वेच्या दौंड-मनमाड मार्गावरील 'चितळी' स्टेशनावर उतरावें लागतें. चितळी ते साकोरी व साकोरी ते चितळी एस्. टी.ची बसगाडी आहे. साकोरी

येथील उपासनी स्थानांतूनच या गाड्या जातात व येतात. पावसाळ्यांत या गाड्या फक्त राहत्यापर्यंत जातात-येतात. राहता-साकोरी हें अंतर तीन ते चार फर्लांगांचें आहे. राहात्याहून साकोरीस येण्या-जाण्यास बैलगाडी, हमाल मिळूं शकतात. राहत्याप्रमाणें शिर्डीस उतरूनहि साकोरीस जाणारे पुष्कळ असतात. शिर्डी ते साकोरी हें अंतर तीन मैलांचें आहे. त्यासाठींहि वाहनांची सोय होऊं शकते. मनमाड, कोपरगांव, अहमदनगर, पुणें व संगमनेर येथून निघणारी व 'राहता' गांवावरून जाणारी एस्. टी.ची गाडी चालू असते. त्या मार्गानेंहि राहत्याहून साकोरीस जातां येतें.

**व्यवस्था :–** ब्राह्मणांच्या आचार-धर्माला प्राधान्य देऊन सनातन धर्मपद्धतीनें साकोरी स्थानांत अहोरात्र सत्कर्म घडत रहावें अशी योजना केलेली आहे. यांत भाग घेण्यासाठीं तेथील आचार-विचार-पद्धतीस अनुसरून घालून दिलेल्या नियमाप्रमाणें वागण्याची तयारी असलेल्या कोणत्याहि जातीच्या सत्प्रवृत्त स्त्री-पुरुष व्यक्तींना एकट्याने अथवा सहकुटुंब साकोरीस रहावयाचें असेल, तर त्यांची उतरण्याची व रहाण्याची सोय मर्यादित कालापुरती होऊं शकते. अशा व्यक्तींना स्वतःच्या जाति-धर्मानुसार पुण्य-कर्म करीत रहाण्यासाठीं स्थानांतील सेवकवर्ग निरपेक्षपणें सर्वतोपरी मदत करतो. तेथील पद्धतीला अनुसरून वागण्याची इच्छा व तयारी असल्यास कांहीं काळ जेवणाची सोय होऊं शकते. स्थानांत खानावळहि आहे.

**दिनचर्या :–** पहांटे पावणेचारला पहिली घंटा होते. ४॥ ते ५॥ श्रीदत्तात्रेयाच्या देवळांत कांकड-आरती होते. नंतर झोंपडींत कांकड-आरती असते. ७ ते ८ च्या दरम्यान भक्त-मंडळी देवळाच्या व झोंपडीच्या आवाराची झाडलोट व सडासंमार्जन करून स्वच्छता करतात. त्यानंतर दत्ताच्या देवळांत संततधार अभिषेक चालू होतो. संध्या, पूजापाठ, पारायण, पुरश्चरण, भजन असें जो तो आपआपल्या रिवाजानुसार व आवडीनुसार करीत रहातो. ९ ते १० झोंपडीच्या कमानींत पुरुषवर्गाचें भजन चालू असतें व आंत श्रीसद्गुरु बाबांच्या समाधीची पूजा होऊन अभिषेक चालू असतो. १० ते १०॥ पर्यंत आरती होऊन प्रवचन होतें. त्यानंतर दर्शनास मोकळीक मिळते. नैवेद्याची घंटा याच वेळीं दिली जाते व दत्ताच्या देवळांत दुपारच्या आरतीला सुरुवात होते. ११॥ पर्यंत ही आरती

संपते व लगेच झोंपडींत श्रीसद्गुरु बाबांच्या आईची व श्रीसद्गुरु बाबांची आरती होते. आरती, प्रदक्षिणा, स्तोत्रें, भगवद्गीतेचा अथवा अष्टावक्रगीतेचा एक पाठ, आणि टिपऱ्यांचें भजन हें सर्व १२॥ वाजण्याच्या सुमारास संपतें. सायंकाळीं चारच्या सुमारास देवळांत अथवा झोंपडींत, पुराण, प्रवचन अथवा कीर्तन असतें. संध्याकाळीं ६ ते ७ झोंपडीच्या कमानींत स्त्रियांचें सामुदायिक भजन होतें. नंतर संध्याकाळच्या आरत्यांना सुरुवात होते. ७ ते ८ पर्यंत दत्ताच्या देवळांत आरती, प्रदक्षिणा, गीता-पठन अथवा अष्टावक्रगीता-पठन होतें. नंतर दत्ताच्या देवळांतून दिंडी निघून झोंपडींत आरती, शेजआरती, प्रदक्षिणा, टिपऱ्यांचें भजन हा कार्यक्रम होऊन सुमारें १० वाजतां दिंडी दत्ताच्या देवळांत परत जाते.

दत्ताच्या देवळांत अहोरात्र भजनाचा पहारा असतो. दर गुरुवारीं आणि गुरु-पौर्णिमा, संक्रान्त अशा प्रसंगीं दत्ताच्या देवळांतून पालखीची मिरवणूक निघते. साकोरीस हिंदूंचे सर्व सण यथायोग्य रीतीनें पाळले जातात.

**दर्शनीय ठिकाणें :–** साकोरींत श्रीदत्तात्रेयाचें सुंदर देवालय आहे. त्याच देवळांत श्रीगजानन, श्रीहनुमान, श्रीमहादेव व श्रीशनिदेव यांच्या मूर्ति बसवून लहान देवालयें बांधलेलीं आहेत. मल्हारी-म्हाळसाकांतांचें एक स्वतंत्र देऊळ आहे. बाहेरच्या पटांगणांत बारवेजवळ श्रीसद्गुरु सांईबाबा व उपासनीबाबा यांचे एकनिष्ठ सेवक ब्रह्मीभूत श्री. बापूसाहेब जोग यांची समाधि असून, त्यावर उत्तम देऊळ बांधलेलें आहे. त्यापलीकडे झोंपडी आहे. त्यांत श्रीसद्गुरु बाबांचा पिंजरा व त्यापुढें सद्गुरु बाबांची समाधि आहे. बाहेरील सभामंडपाच्या पूर्वेस सुंदर यज्ञमंडप बांधलेला आहे व पश्चिमेस श्रीसद्गुरु बाबांच्या मातुःश्रींची समाधि आहे. श्रीबाबांच्या समाधीच्या बरोबर समोर पूर्वेस सुंदर असें कन्याकुमारी-मंदिर बांधलेलें आहे.

श्रीकन्याकुमारी उपासनीस्थान हा जुन्या साकोरी गांवाहून निराळा असा भाग आहे. साकोरी येथील स्वच्छता आणि टापटीप आदर्श अशी आहे. अशा या प्रशान्त वातावरणाचा सत्प्रवृत्त माणसावर परिणाम होऊन त्याला येथें तपश्चर्येस यावें असें साहजिकच वाटतें.

## श्रीबाबांचीं कांहीं सिद्धान्त-वाक्यें

* * * * * * * * * * * * *

" आपल्या सुखाचें साधन परमेश्वर आहे. "

" जो सोशील त्याला पूर्ण अवस्था येते. "

" मूळ अवस्था जी आहे, ती न सुखाची, न दुःखाची आहे. "

" जितक्या कांही वाईट किंवा चांगल्या क्रिया होतात, त्यांचें अव्यक्त फळ उत्पन्न होतच असतें; तें अव्यक्तच पुढें व्यक्त दशेला येतें. "

" पारमार्थिक व प्रापंचिक बाजू या एकमेकांच्या अगदीं विरुद्ध आहेत. "

" पुण्याच्या जागेवर आल्यावर संसाराचा विचार करूं नये. "

" स्त्रियांना नवरा व मुलांना बाप गुरु. "

" सत्पुरुषाचा जो आकार तोच परमेश्वराचा आकार. "

" सर्व इंद्रियांना निराहारी ठेविलें, म्हणजे ज्यापासून पापाची उत्पत्ति आहे असे विषय नाहींसे होतात. "

" आतां जें कांहीं पुण्य किंवा पाप होईल, ती पुढील जन्माची तयारी आहे. "

" परमेश्वराचें जें करावयाचें तें विनाकारण व अहेतुक करीत जावें. "

" आपल्यापासूनच परमेश्वराची उत्पत्ति. "

" आपण व आपल्याहून दुसरें मग तें कांहींहि असो, तें दुसरें म्हणजे परमेश्वर. "

" सुखदुःख, बरेंवाईट या निव्वळ कल्पना आहेत, व संवयीने वाइटापासून सुख व चांगल्यापासून दुःखहि मनुष्यास होऊं शकतें. "

" सत्पुरुषांत बरें-वाईट पूर्ण असतें. एकच गोष्ट असेल तो अपूर्ण आहे असें समजावें. "

[ ' श्रीउपासनी महाराजांनी परमार्थांतील कांही गुप्त खुणा प्रकट केल्या आहेत ', असें एका मार्मिक अभ्यासकानें म्हटलें आहे; त्या दृष्टीनें या वाक्यांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करावा. ]

ग्रं. क्र. १०९६५४
(स्थळ प्रत)

REFBK-0010964
REFBK-0010964